**वापरायच्या अटी**

खालील भाषांमध्ये उपलब्ध वापरायच्या अटी.

| | | |
|---|---|---|
| इंग्रजी | हिंदी | मराठी |
| गुजराती | पंजाबी | उर्दू |
| तमिळ | तेलुगू | कन्नड |
| मल्याळम | बंगाली | काश्मिरी |
| ओडिया | आसामी | कोंकणी |

या अटी व शर्ती (**"वापरायच्या अटी"**) **बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म** (येथे परिभाषित) द्वारे तुम्हाला (येथे परिभाषित) **बजाज फिनसर्व्ह अकाउंट** (येथे परिभाषित) होल्डर म्हणून **बजाज फायनान्स लिमिटेड** (यानंतर **"बीएफएल"** म्हणून संदर्भित) द्वारे प्रदान/ उपलब्ध करून दिलेल्या प्रॉडक्ट्स/सर्व्हिसेसच्या मुख्यतः **"बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस"** (येथे परिभाषित) तरतुदींवर अप्लाय करेल आणि रेग्युलेट करेल. या अटी व शर्तींमध्ये होणारे कोणतेही बदल https://www.bajajfinserv.in/terms-of-use वर उपलब्ध असतील आणि ते तुमच्यावर बंधनकारक असतील.

बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसच्या वापरायच्या अटींना तुमची स्वीकृती ही इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट, 2000 (त्याच्या सुधारणा आणि त्याअंतर्गत केलेल्या नियमांसह आणि संबंधित वेळी लागू असलेल्या इतर प्रचलित कायदे / रेग्युलेशन्स सह) अंतर्गत इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड म्हणून निर्माण आणि संरक्षित केली जाते आणि लायसन्स्ड यूजर म्हणून तुमच्यावर बंधनकारक असेल. बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी डाउनलोड, ॲक्सेस, ब्राउजिंग, साईन-अप प्रोसेस किंवा रजिस्ट्रेशन प्रोसेस पूर्ण करण्याद्वारे, तुम्ही बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म चा ॲक्सेस करताना संपूर्ण वापरायच्या अटी स्पष्टपणे वाचल्या, समजल्या आणि स्वीकारल्या आहेत. ॲक्सेस/वापर प्रारंभ झाल्यानंतर आणि रजिस्टर्ड मोबाईल फोनद्वारे किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक/वेब प्लॅटफॉर्मद्वारे आणि/किंवा बीएफएलला तुमच्या ईमेल आयडीद्वारे तुमची **वन-टाइम इलेक्ट्रॉनिक स्वीकृती/कन्फर्मेशन/प्रमाणीकरण** सादर करून, ती तुमची स्वीकृती मानली जाईल. यापैकी कोणत्याही वापरायच्या अटी या संदर्भात इतर कोणत्याही डॉक्युमेंट/इलेक्ट्रॉनिक रेकॉर्डशी विरोधाभासात असल्यास, पुढील बदल / सुधारणा बीएफएलद्वारे सूचित केल्या जाईपर्यंत या अटी व शर्ती प्रचलित असतील.

बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी साईन-अप प्रोसेस किंवा रजिस्ट्रेशन प्रोसेस पूर्ण करण्याद्वारे तुम्ही याद्वारे सहमत आहात आणि मान्य करता की (i) तुमचे वय किमान 18 वर्ष आहे, (ii)

तुम्ही एकतर तुमच्या वैयक्तिक क्षमतेमध्ये किंवा संस्थेचे अधिकृत स्वाक्षरीकर्ता (येथे परिभाषित) असण्याच्या क्षमतेच्या अंतर्गत योग्यरित्या अधिकृत आहात (iii) तुम्ही इंग्रजी भाषेत वर्ल्ड वाईड वेब/इंटरनेट समजू, वाचू आणि ॲक्सेस करू शकता, (iv) तुम्ही या वापरायच्या अटी वाचल्या आहेत, समजल्या आहेत आणि यासह बंधनकारक राहण्यास सहमत आहात.

या वापरायच्या अटी मध्ये, "आम्ही", "आम्हाला" किंवा "आमचे" शब्द स्वतंत्रपणे "बजाज फायनान्स लिमिटेड" किंवा "बीएफएल" संदर्भित करतात आणि "तुम्ही" किंवा "तुमचे" किंवा "कस्टमर" किंवा "यूजर" शब्द हे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म ॲक्सेस करणाऱ्या व्यक्ती आणि किंवा संस्थेच्या अधिकृत स्वाक्षरीकर्त्याला संदर्भित करतात.

**1. व्याख्या**

अन्यथा सूचित केल्याशिवाय, खाली सूचीबद्ध कॅपिटल संज्ञाचे खालील अर्थ असतील:

(क) **"सहयोगी"** म्हणजे बीएफएलची सहाय्यक कंपनी आणि / किंवा होल्डिंग कंपनी आणि / किंवा सहयोगी कंपनी, जिथे सहाय्यक कंपनी, होल्डिंग कंपनी आणि सहयोगी कंपनीचा अर्थ वेळोवेळी सुधारणा झालेल्या कंपनीज ॲक्ट, 2013 मध्ये वर्णन केल्यानुसार असेल.

(ख**) "लागू कायदा"** म्हणजेच सर्व लागू / प्रचलित केंद्रीय, राज्य व स्थानिक कायदे, कायदा, रेग्युलेशन्स, आदेश, गाईडलाईन्स आणि / किंवा निर्देश होय, जे वेळोवेळी सुधारित आणि प्रभावीपणे किंवा पुन्हा अंमलात आणले जातात, कोणत्याही सरकारी प्राधिकरणाची कायद्याची ताकद असलेल्या मर्यादेपर्यंत ऑर्डर किंवा इतर कायदेशीर कृती होय, ज्यात भारतातील प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स वरील मास्टर डायरेक्शन, नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (**"एनपीसीआय"**) च्या गाईडलाईन्स, पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम्स ॲक्ट, 2007, पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम्स रेग्युलेशन्स, 2008, प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉंडरिंग ॲक्ट, 2002 आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया द्वारे वेळोवेळी जारी प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स संबंधी अन्य कोणत्याही रेग्युलेशन्स / गाईडलाईन्स यांचा समावेश होतो परंतु त्यापुरते मर्यादित नाही.

(ग) "बजाज कॉईन्स" बीएफएल द्वारे प्रदान केलेला रिवॉर्ड सूचित करते जो केवळ बजाज फिनसर्व्ह ॲप, बजाज पे वॉलेट किंवा इतर कोणत्याही बीएफएल अधिकृत चॅनेलवर रिडीम केला जाऊ शकतो. एका बजाज कॉईनचे मूल्य 20 पैशांच्या समतुल्य असते, जे कॅश म्हणून कन्व्हर्ट करण्यायोग्य किंवा विद्ड्रॉ करण्यायोग्य नसते. बजाज कॉईन्स हे भारतीय कायद्याअंतर्गत कोणतेही कायदेशीर निविदा किंवा चलन (डिजिटल/फिजिकल) म्हणून ग्राह्य धरले जाणार नाहीत.

(घ) **"बजाज फिनसर्व्ह अकाउंट"** म्हणजे बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर यशस्वी रजिस्ट्रेशन नंतर कस्टमरला उपलब्ध करून दिलेले अकाउंट होय.

(ङ) **"बजाज फायनान्स लि"** किंवा **"बीएफएल"** म्हणजे कंपनीज ॲक्ट 2013 च्या तरतुदींतर्गत स्थापित केलेली नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी होय. जिचे रजिस्टर्ड ऑफिस मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे 411035 येथे असून भारतात प्रीपेड पेमेंट्स इन्स्ट्रुमेंट्स जारी करण्यासाठी व ऑपरेशन्स साठी आरबीआय द्वारे योग्यरित्या अधिकृत आहे आणि जी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मार्फत प्रॉडक्ट्स / सर्व्हिसेस ऑफर करीत आहे.

(च) **"बजाज पे वॉलेट"** म्हणजे तुम्हाला वेळोवेळी **परिशिष्ट - I** मध्ये अधिक पूर्णपणे प्रदान केलेल्या प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स वरील मास्टर डायरेक्शन नुसार परिस्थिती प्रमाणे बीएफएल द्वारे बँक अकाउंट, वैध क्रेडिट कार्ड किंवा फूल केवायसी वॉलेट मधून केवळ लोडिंग/ रिलोडिंग पूर्ण केलेले स्मॉल पीपीआय किंवा किमान - तपशील वॉलेट (येथे परिभाषित) म्हणून जारी प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स होय.

(छ) **"बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस"** म्हणजे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मार्फत बजाज फायनान्स लिमिटेडद्वारे प्रदान केलेल्या विविध प्रॉडक्ट्स / सर्व्हिसेस चा समावेश ज्यात पेमेंट सर्व्हिसेस जसे की बजाज पे वॉलेट, बजाज पे यूपीआय, बिल पेमेंट सर्व्हिसेस, आयएमपीएस इ. समाविष्ट आहेत परंतु त्यापुरते मर्यादित नाही आणि खालील क्लॉज 4 आणि परिशिष्ट I मध्ये अधिक स्पष्ट केल्याप्रमाणे बीएफएलद्वारे प्रदान केलेल्या इतर सर्व्हिसेस/सुविधा.

(ज) **"बजाज फिनसर्व्ह ॲप"** म्हणजे कस्टमर्सना बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस सुलभ करण्यासाठी बजाज फायनान्स लिमिटेडच्या विविध मोबाईल आधारित ॲप्लिकेशन्सचा समावेश असेल.

(झ) **"बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म"** म्हणजे कस्टमर्सना बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस सुलभ करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह ॲपच्या समावेशासह बजाज फायनान्स लिमिटेडच्या विविध मोबाईल आधारित आणि वेब-पोर्टल/ वेबसाईट/ॲप्लिकेशन्सचा समावेश असेल.

(ञ) **"बजाज फायनान्स प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेस"** म्हणजे बीएफएलद्वारे ऑफर केलेले विविध प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेस (सहाय्यक सर्व्हिसेस सह), ज्यामध्ये पर्सनल लोन्स, बिझनेस लोन्स, प्रॉडक्ट्स/ सर्व्हिसेस खरेदीसाठी लोन्स, डिपॉझिट्स आणि वेळोवेळी बीएफएलद्वारे सादर केल्या जाऊ शकतात अशा इतर प्रॉडक्ट्स/ सर्व्हिस यांचा समावेश होतो परंतु यापुरते मर्यादित नाही.

(ट) **बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेस:** यामध्ये बीएफएलच्या इच्छुक कस्टमर्ससाठी तुमची निर्दिष्ट प्रॉडक्ट्स बजाज मॉल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करणे आणि त्यांची जाहिरात करणे यांचा समावेश होतो. तसेच, पार्टींदरम्यान वेळोवेळी परस्पर संमतीने ठरविल्याप्रमाणे, बजाज मॉल प्लॅटफॉर्मशी संबंधित आणि अतिरिक्त मोबदल्यासाठी बीएफएलद्वारे ऑफर केल्या जाणाऱ्या इतर कोणत्याही सर्व्हिसेसचा यात समावेश असेल. त्याचा सार असा आहे की लोन डॉक्युमेंटेशन पूर्ण करण्यासाठी आणि तुमच्या फिजिकल स्टोअरमधून निवडलेले निर्दिष्ट प्रॉडक्ट खरेदी करण्यासाठी कस्टमरला तुमच्या स्टोअरला भेट देणे आवश्यक आहे.

(ठ) **बजाज मॉल प्लॅटफॉर्म:** याचा अर्थ आणि समावेश मोबाईल/वेबसाईट-आधारित इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्ममध्ये होतो, ज्याचे नाव [/बीमॉल किंवा बीएफएलच्या कोणत्याही इतर डोमेन] असेल, जेथे तुमची निर्दिष्ट प्रॉडक्ट्स लिस्ट आणि प्रदर्शित केली जातील. ही प्रॉडक्ट्स कस्टमर कंपनीच्या फिजिकल स्टोअरमधून लोन डॉक्युमेंटेशन पूर्ण केल्यावर खरेदी करू शकतो.

(ड) **"शुल्क"** किंवा **"सर्व्हिस शुल्क"** म्हणजे खालील क्लॉज 15 अंतर्गत अधिक विशिष्टपणे विस्तृत केल्याप्रमाणे बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी बीएफएल कडून तुमच्यावर आकारले जाणारे शुल्क होय.

(ढ) **"प्रभावी तारीख"** ही रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम लागू होणारी तारीख असेल. प्रत्येक रिवॉर्ड प्रोग्राममध्ये भिन्न प्रभावी तारीख असू शकते जी नमूद केलेल्या रिवॉर्ड प्रोग्राममध्ये विशिष्ट अटी व शर्तींमध्ये निर्धारित केली जाईल.

(ण) **"संस्था"** म्हणजे कंपनीज ॲक्ट, 1956/2013, पार्टनरशिप फर्म, मर्यादित दायित्व पार्टनरशिप, व्यक्तींची संघटना, व्यक्तींची संस्था, सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, 1860 अंतर्गत रजिस्टर्ड सोसायटी किंवा कोणत्याही राज्य, को-ऑपरेटिव्ह सोसायटी, हिंदू अविभक्त कुटुंबाच्या संबंधित तरतुदींअंतर्गत योग्यरित्या स्थापित केलेल्या कोणत्याही कंपनीचा समावेश असेल परंतु त्यापुरते मर्यादित नसेल.

(त) **"निर्दिष्ट प्रॉडक्ट्स"** म्हणजे कंपनीद्वारे बीएफएलच्या बजाज मॉल प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध आणि जाहिरात केलेल्या विविध प्रॉडक्ट्स/सर्व्हिसेसचे नाव, मॉडेल, स्पेसिफिकेशन्स, प्रतिमा, कंटेंट, किंमत आणि इतर संबंधित तपशील समाविष्ट असेल.

(थ) **"मर्चंट/डीलर"** म्हणजे कंपनी आणि कंपनीच्या फिजिकल स्टोअर लोकेशनचा समावेश, जिथून इच्छुक कस्टमर बीएफएल कडून लोन घेऊन बजाज मॉल प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध/जाहिरात केलेल्या तुमच्या निर्दिष्ट प्रॉडक्ट्सची खरेदी करू शकतात.

(द) **"एनपीसीआय"** म्हणजे नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया;

(ध) **"ओटीपी"** म्हणजे बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी तुमच्या रजिस्टर्ड मोबाईल नंबरवर प्राप्त झालेला वन-टाइम पासवर्ड होय;

(न) **"पीईपी"** म्हणजे मास्टर डायरेक्शन-नो युवर कस्टमर (केवायसी) डायरेक्शन, 2016 मध्ये आरबीआय द्वारे परिभाषित केल्याप्रमाणे पॉलिटिकली एक्सपोज्ड पर्सन होय.

(प) **"आरबीआय"** म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया.

(फ) **"थर्ड-पार्टी प्रॉडक्ट आणि सर्व्हिसेस"** म्हणजे बीएफएल व्यतिरिक्त इतर कोणत्याही पार्टीचे प्रॉडक्ट आणि/किंवा सर्व्हिस जी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मार्फत ऑफर केली जाते.

**2. अर्थ**

(क) एकवचनाच्या सर्व रेफरन्समध्ये अनेकवचन आणि त्याउलट समाविष्ट आहेत आणि "समाविष्ट" शब्द "मर्यादेशिवाय" म्हणून गृहित धरला पाहिजे.

(ख) कोणताही कायदा, अध्यादेश किंवा इतर कायद्याच्या रेफरन्स मध्ये सर्व रेग्युलेशन्स आणि इतर इन्स्टुमेंट आणि सर्व एकत्रीकरण, सुधारणा, पुनर्नियमन किंवा बदली यांचा सध्याच्या काळासाठी समावेश होतो.

(ग) सर्व हेडिंग्स, बोल्ड टायपिंग आणि इटॅलिक्स (जर असल्यास) केवळ रेफरन्सच्या सोयीसाठी इन्सर्ट केले गेले आहेत आणि मर्यादा परिभाषित करत नाहीत किंवा या अटी व शर्तींचा अर्थ किंवा व्याख्या प्रभावित करत नाहीत.

**3. डॉक्युमेंटेशन**

(क) अचूक आणि अपडेटेड माहितीचे संकलन, पडताळणी, लेखापरीक्षण आणि मेंटेनन्स ही एक निरंतर प्रोसेस आहे आणि बीएफएल कोणत्याही वेळी लागू कायदा / रेग्युलेशनचे अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याचा अधिकार राखून ठेवते. रजिस्ट्रेशनच्या वेळी किंवा अन्यथा तुम्ही प्रदान केलेल्या माहिती आणि/किंवा डॉक्युमेंटेशन मध्ये विसंगती असल्यास बीएफएल सर्व्हिसेस बंद करण्याचा/ कोणत्याही वेळी कोणत्याही/ सर्व बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी ॲप्लिकेशन्स नाकारण्याचा अधिकार राखून ठेवते.

(ख) बीएफएलला त्यांच्या सर्व्हिसेस प्राप्त करण्याच्या उद्देशाने प्रदान केलेली कोणतीही माहिती बीएफएलसह निहित असेल आणि या अटी व शर्तींनुसार लागू कायदा किंवा रेग्युलेशन नुसार सातत्यपूर्ण उद्देशासाठी बीएफएल द्वारे त्यांच्या विवेकबुद्धीनुसार वापरली जाऊ शकते.

(ग) लागू कायद्यानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे अतिरिक्त डॉक्युमेंट्स/माहिती मागवण्याचा बीएफएलला अधिकार आहे.

**4. बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस**

(क) तुम्ही अपरिवर्तनीयपणे सहमत आहात आणि समजता की एकल साईन-इन प्रोसेसद्वारे आणि बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर लॉग-इन करून तुम्ही बीएफएल द्वारे प्रदान केलेल्या विविध बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस ॲक्सेस आणि प्राप्त करू शकता आणि प्रत्येक बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेससाठी स्वतंत्र साईन-इनची आवश्यकता नाही.

(ख) तुम्ही बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्ममार्फत उपलब्ध विविध प्रॉडक्ट्स / सर्व्हिसेस ब्राउज, तपासू आणि प्राप्त करू शकता. येथे प्रदान केलेल्या अटी व शर्तींव्यतिरिक्त अशा प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेससाठी लागू असलेल्या विशिष्ट अटी व शर्तींद्वारे प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेस नियंत्रित केल्या जातील;

(ग) जर तुम्ही विद्यमान बीएफएल कस्टमर असाल, तर तुम्ही तुमचे विद्यमान लोन / इतर प्रॉडक्ट किंवा सर्व्हिस तपशील तपासू शकता आणि त्यासंबंधी लागू अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन नवीन प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेस किंवा ऑफर्स देखील प्राप्त करू शकता; आणि

(घ) खाली नमूद केलेल्या सर्व्हिसेस प्राप्त करा (त्यासाठीच्या अटी व शर्ती येथे जोडलेल्या परिशिष्टांतर्गत अधिक विशिष्टपणे तपशीलवार आहेत आणि त्याचप्रमाणे येथे प्रदान केलेल्या वापरायच्या अटी व्यतिरिक्त असतील):

| **परिशिष्ट** | **तपशील** |
|---|---|
| **I** | **बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस:**<br>**क.** बजाज पे वॉलेट सर्व्हिसेसचा लाभ घेण्यासाठी लागू अटी व शर्ती.<br>**ख.** बजाज पे यूपीआय सर्व्हिसेसचा लाभ घेण्यासाठी लागू अटी व शर्ती.<br>**ग.** बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर बिल पेमेंट सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी लागू अटी व शर्ती. |

| | |
|---|---|
| | **घ.** इमीडिएट पेमेंट सर्व्हिस ("**आयएमपीएस**") आधारित इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफरचा लाभ घेण्यासाठी लागू अटी व शर्ती.<br>**ङ. बजाज पे फास्टॅगसाठी लागू अटी व शर्ती.**<br>**च.** बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसिंग अटी |
| **II** | **बजाज फायनान्स प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेस:**<br>**क.** बीएफएल लोन प्रॉडक्ट्ससाठी अटी व शर्ती.<br>**ख.** को-ब्रँडेड क्रेडिट कार्डसाठी अटी व शर्ती.<br>**ग.** बीएफएल फिक्स्ड डिपॉझिट प्रॉडक्ट्ससाठी अटी व शर्ती.<br>**घ.** थर्ड-पार्टी इन्श्युरन्स प्रॉडक्ट्ससाठी अटी व शर्ती.<br>**ङ.** थर्ड-पार्टी प्रॉडक्ट्ससाठी अटी व शर्ती.<br>**च.** एक्स्पेन्स मॅनेजरसाठी अटी व शर्ती.<br>**छ.** लोकेटरसाठी अटी व शर्ती.<br>**ज.** ईएमआय वॉल्टसाठी अटी व शर्ती.<br>**झ.** रिवॉर्डसाठी अटी व शर्ती.<br>**ञ.** म्युच्युअल फंडसाठी अटी व शर्ती.<br>**ट.** बजाज मॉलच्या अटी व शर्ती |

**5. पात्रता**

(क) तुम्ही, बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म ॲक्सेस/लॉग-इन करून, ब्राउजिंग करून किंवा अन्यथा वापरून याद्वारे प्रतिनिधित्व आणि वॉरंट करता की, तुम्ही:

(i) भारताचे नागरिक आहात

(ii) 18 वयाचे असून सज्ञानपणाचे वय गाठले आहे;

(iii) एकतर तुमच्या वैयक्तिक क्षमतेमध्ये किंवा संस्थेचे अधिकृत स्वाक्षरीकर्ता असण्याच्या क्षमतेच्या अंतर्गत योग्यरित्या अधिकृत आहात;

(iv) कायदेशीररित्या बंधनकारक करार करण्यास सक्षम आहात; आणि

(v) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म ॲक्सेस करण्यापासून किंवा वापरण्यापासून आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करण्यापासून कायदेशीररित्या प्रतिबंधित नाही.

(vi) बजाज फिनसर्व्ह अकाउंटचे एकमेव मालक आहात आणि कोणत्याही वेळी एकापेक्षा जास्त बजाज फिनसर्व्ह अकाउंट असू शकत नाही आणि जर तुम्ही कोणत्याही व्यक्तीला तुमचे बजाज फिनसर्व्ह अकाउंट वापरण्याची परवानगी देत असाल तर असा वापर योग्य नसल्याने कोणत्याही प्रकारे

बीएफएलद्वारे परवानगी दिली जाणार नाही आणि त्याच्या कोणत्याही परिणामासाठी आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मद्वारे घेतलेल्या सर्व कृतीसाठी तुम्ही पूर्णपणे जबाबदार असाल.

(ख) वर नमूद केलेल्या आवश्यकतांव्यतिरिक्त, तुम्हाला बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर निर्दिष्ट केलेल्या अतिरिक्त निकषांची देखील पूर्तता करावी लागेल.

**6.** तुम्ही येथे दर्शविल्याप्रमाणे बीएफएलच्या अटी व शर्ती आणि वेळोवेळी त्याद्वारे सांगितलेल्या आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मद्वारे उपलब्ध करून दिलेल्या बदलांचे पालन कराल. तुम्ही सहमत आहात की बीएफएलद्वारे ऑफर केलेल्या बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करणे लागू कायद्याच्या अधीन आहेत. तुम्ही याद्वारे सहमत आहात आणि समजता की बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर प्रॉडक्ट्स/सर्व्हिसेस प्राप्त करण्याची तुमची विनंती स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार बीएफएलकडे राखीव आहे आणि या संदर्भात बीएफएलचा निर्णय अंतिम असेल. पुढे, तुम्ही सर्व आवश्यक डॉक्युमेंट्स/फॉर्मची अंमलबजावणी करण्यास आणि/किंवा सर्व माहिती सादर करण्यास आणि/किंवा वेळोवेळी बीएफएलद्वारे सांगितलेल्या सर्व आवश्यकतांचे पालन करण्यास सहमत आहात.

**7.** तुम्ही मान्य करता की बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस आणि / किंवा तुमच्याशी / तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणतीही माहिती प्राप्त करण्यासाठी किंवा पडताळण्यासाठी आणि बीएफएलला योग्य वाटेल त्याप्रमाणे कोणतीही आवश्यक किंवा प्रासंगिक कायदेशीर कृत्ये / करार / बाबी आणि त्यांच्याशी संबंधित गोष्टी प्रदान करण्यासाठी त्यांच्या ग्रुप कंपनी (कंपन्या), उपकंपन्या, मर्चंट / वेंडर्स / सर्व्हिस प्रोव्हायडर्स / बिझनेस असोसिएट्स / पार्टनर्स / सहयोगी, डायरेक्ट सेल्स एजंट (**"डीएसए"**), डायरेक्ट मार्केटिंग एजंट (**"डीएमए"**), रिकव्हरी / कलेक्शन एजंट्स (**"आरए"**), इंडीपेंडंट फायनान्शियल एजंट्स (**"आयएफए"**) (यापुढे एकत्रितपणे **"बीएफएल पार्टनर्स"** म्हणून संदर्भित) यांच्या सर्व्हिसेसचा वापर करू शकते.

**8.** तुम्ही सहमत आहात की बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार, बजाज फिनसर्व्ह अकाउंटद्वारे विशेषत: दिलेल्या कोणत्याही सर्व्हिसेस/ सुविधांमध्ये एकतर पूर्णपणे किंवा आंशिकरित्या कोणत्याही वेळी तुम्हाला सूचना देऊन सुधारणा करू शकते आणि / किंवा तुम्हाला इतर प्रॉडक्ट्स / सर्व्हिसेस / सुविधांवर स्विच करण्याचा पर्याय प्रदान करू शकते.

**9.** बजाज फिनसर्व्ह अकाउंट स्थितीमध्ये कोणताही बदल किंवा रजिस्टर्ड ॲड्रेस आणि/किंवा रजिस्टर्ड मोबाईल नंबर आणि/किंवा ईमेल ॲड्रेस आणि/किंवा डॉक्युमेंट्समध्ये बदल, ज्यामध्ये कस्टमरने बीएफएलला सबमिट केलेल्या केवायसी डॉक्युमेंट्सचा समावेश होतो परंतु त्यापुरते मर्यादित नाही, अपडेटच्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत त्वरित कस्टमरद्वारे बीएफएलला सूचित केले जाईल आणि बीएफएलच्या रेकॉर्डमध्ये योग्यरित्या बदलले/अपडेट केले जाईल, असे न केल्यास तुम्ही बीएफएलच्या रेकॉर्डमध्ये रजिस्टर्ड केलेल्या कोणत्याही कम्युनिकेशन/डिलिव्हरेबल्स/ट्रान्झॅक्शनल मेसेजेस प्राप्त न झाल्यास किंवा ते BFL च्या रेकॉर्ड मधील जुन्या ॲड्रेस/मोबाईल नंबरवर पाठविले गेले, तर त्यासाठी तुम्ही स्वतः जबाबदार असाल**. तुम्ही याद्वारे सहमत आहात आणि समजता की अवैध मोबाईल**

**नंबर रजिस्ट्रेशनच्या बाबतीत तुमच्या इलेक्ट्रॉनिक ट्रान्झॅक्शन सर्व्हिसेस / मोबाईल ॲप्लिकेशनचा ॲक्सेस प्रतिबंधित केला जाऊ शकतो.**

**10.** तुम्ही याद्वारे सहमत आहात की बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्ममध्ये साईन-इन करण्यासाठी पासवर्ड आणि/किंवा तुम्ही सेट केलेला पासकोड कोणतेही ट्रान्झॅक्शन आणि/किंवा बीएफएलद्वारे वेळोवेळी सूचित केलेल्या इतर कोणत्याही प्रक्रियेसाठी बीएफएल ने रजिस्टर्ड मोबाईल फोन नंबरद्वारे किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक/वेब प्लॅटफॉर्मद्वारे आणि/किंवा तुमच्या ईमेल आयडीद्वारे, बीएफएलला सबमिट केलेल्या, वन-टाइम इलेक्ट्रॉनिक स्वीकृती/कन्फर्मेशन/प्रमाणीकरणाद्वारे तुमची पडताळणी करण्यासाठी इंडस्ट्री स्टँडर्ड सिक्युरिटी प्रक्रियांचा अवलंब केला आहे. तुम्ही याद्वारे बीएफएलद्वारे अनुसरण केलेल्या वर नमूद सिक्युरिटी प्रक्रियेची तुमची पूर्ण समजूत आणि स्वीकृती व्यक्त करता आणि पुढे सहमत आहात आणि समजता की कोणतेही अनधिकृत प्रकटीकरण, ॲक्सेस, उल्लंघन आणि/किंवा त्याचा वापर तुमच्या अकाउंटची सिक्युरिटी रिस्क मध्ये आणू शकते.

**11.** तुम्ही याद्वारे समजता आणि सहमत आहात की बीएफएल द्वारे त्याच्या वैधानिक / रेग्युलेटरी दायित्वांचे पालन करण्यास आवश्यक तपशील सादर करण्यास अयशस्वी आणि / किंवा विलंब झाल्यास, बीएफएल द्वारे तुम्हाला सूचना दिल्याप्रमाणे परिणाम म्हणून तुमच्या बजाज फिनसर्व्ह अकाउंटचे क्लोजर आणि/ किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या वापरावर निर्बंध लागू होऊ शकतात.

**12. कस्टमरची संमती**

(क) बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस वापरण्यापूर्वी / प्राप्त करण्यापूर्वी, तुम्ही https://www.bajajfinserv.in/privacy-policy येथे प्रदान केलेल्या वापरायच्या अटी आणि प्रायव्हसी अटी काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म आणि/किंवा बीएफएल द्वारे प्रदान केलेल्या बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसचा ॲक्सेस, ब्राउजिंग किंवा अन्यथा वापरून, तुम्ही वेळोवेळी केलेल्या सुधारणा / दुरुस्ती सह वापरायच्या अटी आणि प्रायव्हसी अटी अंतर्गत सर्व अटी व शर्तींना (एकत्रितपणे "**अटी**") तुमच्या मोबाईल नंबरवर पाठविलेल्या वन टाइम पासवर्ड ("**ओटीपी**") द्वारे कन्फर्म करण्याद्वारे आणि/किंवा बीएफएल रेकॉर्डमध्ये उपलब्ध तुमच्या रजिस्टर्ड ईमेल ॲड्रेसद्वारे स्वीकृती कन्फर्म करण्याद्वारे किंवा बीएफएलद्वारे वेळोवेळी विहित केलेल्या प्रमाणीकरणाच्या इतर पद्धतीद्वारे स्वीकृती कन्फर्म करण्याद्वारे सहमती आणि स्पष्टपणे संमती देता.

(ख) तुम्ही याद्वारे सहमत आहात, संमती देता आणि स्पष्टपणे बीएफएल, त्यांच्या ग्रुप कंपन्या आणि / किंवा थर्ड पार्टीज कडून ऑन-बोर्डिंग प्रोसेस, लोन्स, इन्श्युरन्स आणि इतर प्रॉडक्ट्स च्या पूर्णत्वाशी संबंधित कम्युनिकेशन्स, नोटीस पाठवण्यासाठी, ज्यांनी बीएफएल सह पार्टनरशिप केली आहे त्यांच्याद्वारे टेलिफोन कॉल / एसएमएस / ईमेल / नोटिफिकेशन / पोस्ट / bitly / WhatsApp / bots / इन पर्सन कम्युनिकेशन इत्यादींद्वारे बीएफएल / त्यांचे प्रतिनिधी / एजंट / त्यांच्या ग्रुप कंपन्या / सहयोगींना अधिकृत करता ज्यात कोणतेही प्रमोशनल कम्युनिकेशन्स/ मेसेजेस समाविष्ट आहेत परंतु त्यापुरते मर्यादित नाही. उपरोक्त पद्धतींद्वारे बीएफएलद्वारे पाठवलेले कोणतेही कम्युनिकेशन्स तुमच्यावर बंधनकारक असतील.

(ग) बीएफएल विविध ग्रुप इन्श्युरन्स प्लॅन्स / स्कीम्स / प्रॉडक्ट्स ऑफर करते ज्यामध्ये बजाज फायनान्स लि. हा मास्टर पॉलिसीधारक आहे. या स्कीम्स बजाज फायनान्स लि. द्वारे ऑफर केलेल्या कोणत्याही प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेसच्या यूजर्स पर्यंत मर्यादित आहेत, ज्यामध्ये बजाज फिनसर्व्ह ॲपच्या लोन्स, डिपॉझिट, रजिस्टर्ड यूजर, बजाज फिनसर्व्ह वेबसाईट, बजाज पे वॉलेट, बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस, वॅल्यू ॲडेड सर्व्हिस (व्हीएएस) चे सबस्क्रायबर्स/बीएफएलद्वारे ऑफर केलेले असिस्टन्स प्रॉडक्ट्स किंवा अशा यूजरद्वारे इन्श्युरन्स प्रॉडक्ट्स व्यतिरिक्त प्राप्त कोणतेही प्रॉडक्ट किंवा सर्व्हिस यांचा समावेश होतो परंतु त्यापुरते मर्यादित नाही.

(घ) तुम्ही याद्वारे बीएफएलला जर निवडले असेल तर अशा स्कीम्स अंतर्गत नोंदणी करण्यासाठी तुम्हाला तुमच्या वतीने ग्रुप इन्श्युरन्स प्लॅन्स / स्कीम्स / प्रॉडक्ट्स व्यवस्थापित आणि ऑफर करण्यासाठी मान्यता देता, संमती देता आणि स्पष्टपणे अधिकृत करता.

## 13. संमती मागे घेणे

तुमच्याकडे बीएफएल साठी प्रलंबित करार दायित्वे, जर असल्यास, पूर्ण केल्यानंतर आणि अशा विद्ड्रॉ साठी लागू प्रचलित कायदा/ रेग्युलेशन अनुसार तुमची संमती मागे घेण्याचा पर्याय आहे. करार दायित्वे पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसचा वापर करण्यापासून परावृत्त होण्याचे स्वातंत्र्य आहे. तथापि, तुमचा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म / बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसचा निरंतर वापर / प्राप्त करणे या वापरायच्या अटी आणि त्यातील कोणत्याही सुधारणांसह, त्याच्याशी संबंधित पॉलिसीजची स्वीकृती मानली जाईल.

## 14. बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वापरताना तुमचे दायित्व

(क) तुम्ही पुढील बाबींसाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वापरण्यासाठी सहमत **नाही** आहात: (i) कोणतेही फसवणुकीचे ट्रान्झॅक्शन करण्यासाठी, आणि (ii) या वापरायच्या अटींद्वारे किंवा कोणत्याही लागू कायद्यांतर्गत बेकायदेशीर, अवैध किंवा निषिद्ध असलेल्या उद्देशांसाठी. बीएफएल, त्यांच्या विवेकबुद्धीनुसार कोणत्याही वेळी आणि कोणत्याही पूर्वसूचना किंवा दायित्वाशिवाय, अतिरिक्त आवश्यकता आणि प्रतिबंध लागू करू शकते किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस (किंवा त्याचा कोणताही भाग) वरील तुमचा ॲक्सेस निलंबित, रद्द किंवा प्रतिबंधित करू शकते.

(ख) तुम्ही तुमचे बजाज फिनसर्व्ह अकाउंट, पासवर्ड, पिन, ओटीपी, लॉग-इन तपशील इ. ("**क्रेडेन्शियल्स**") आणि तुमच्या बजाज फिनसर्व्ह अकाउंटमध्ये किंवा त्या माध्यमातून होणाऱ्या कृतीची गोपनीयता आणि सिक्युरिटी मेंटेन करण्यासाठी पूर्णपणे जबाबदार असाल. शिवाय, तुमच्या माहितीसह किंवा माहितीशिवाय तुमच्या क्रेडेन्शियल्सचा गैरवापर, यासंबंधी उद्भवणाऱ्या/त्यासंबंधी कोणत्याही प्रकारे तुम्हाला झालेल्या कोणत्याही नुकसान/हानीसाठी बीएफएल जबाबदार असणार नाही.

(ग) तुम्ही पुढे सहमत **नाही** आहात:

(i) कोणतेही मटेरियल किंवा माहिती होस्ट करणे, प्रदर्शित करणे, अपलोड करणे, सुधारित करणे, प्रकाशित करणे, प्रसारित करणे, अपडेट करणे किंवा शेअर करणे जी: (क) दुसऱ्या व्यक्तीशी संबंधित

आहे आणि ज्यावर तुम्हाला कोणताही अधिकार नाही; (ख) हानीकारक, त्रासदायक, निंदनीय, मानहानिकारक, अश्लील, पोर्नोग्राफिक, पेडोफिलिक, अब्रूनुकसानीकारक, इतर कोणत्याही व्यक्तीच्या प्रायव्हसीवर हल्ला करणारी, द्वेषपूर्ण किंवा जातीयवादी, पारंपारिकरित्या आक्षेपार्ह, अपमानजनक, मनी लाँडरिंग किंवा जुगाराशी संबंधित किंवा प्रोत्साहित करणारी किंवा कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर आहे; (ग) कोणत्याही प्रकारे अल्पवयीन मुलांना हानी पोहोचवते; (घ) अशा मेसेजच्या उत्पत्तीबद्दल पत्ताधारकाची फसवणूक करते किंवा दिशाभूल करते किंवा कोणतीही माहिती कम्युनिकेट करते जी अत्यंत आक्षेपार्ह किंवा धोकादायक आहे; (ङ) दुसऱ्या व्यक्तीची तोतयागिरी करते; (च) सॉफ्टवेअर व्हायरस, वर्म्स, ट्रोजन, स्पायवेअर, ॲडवेअर, सॉफ्टवेअर अक्षम करणारे कोड, इतर त्रुटीयुक्त किंवा अंतर्भूत सॉफ्टवेअर किंवा इतर कोणतेही कॉम्प्युटर कोड, फाईल्स किंवा प्रोग्राम जे कोणत्याही कॉम्प्युटर रिसोर्स किंवा कोणत्याही स्पायवेअरच्या कार्यक्षमतेमध्ये व्यत्यय आणण्यासाठी, नष्ट किंवा मर्यादित करण्यासाठी डिझाईन केलेले असतात; (छ) भारताची एकता, अखंडता, संरक्षण, सुरक्षा किंवा सार्वभौमत्व, परदेशी राष्ट्रांसह मैत्रीपूर्ण संबंध किंवा सार्वजनिक व्यवस्था यांना धोक्यात आणते किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त अपराधाच्या आयोगाला प्रोत्साहन देते किंवा कोणत्याही गुन्ह्याच्या तपासणीला रोखते किंवा इतर कोणत्याही राष्ट्राचा अपमान करते; (ज) बौद्धिक संपदा हक्क, कायदेशीर हक्क किंवा कोणत्याही थर्ड पार्टीच्या स्वारस्यांचे उल्लंघन करते; (झ) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या किंवा त्याच्या भागांमध्ये प्रतिकूल हस्तक्षेप करते आणि किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या कोणत्याही कार्यक्षमता आणि/किंवा सेटिंग्समध्ये बदल किंवा अक्षम करते, ज्यामध्ये बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर वापरलेल्या कोणत्याही सिक्युरिटी उपायांचा समावेश होतो.

(ii) अपलोड केलेल्या फाईलमधील कोणत्याही लेखकाची माहिती, कायदेशीर किंवा इतर वैध नोटीस किंवा मालकीचे पद किंवा मूळ लेबल किंवा सॉफ्टवेअरचे सोर्स किंवा इतर मटेरियल चुकीचे ठरवणे किंवा डिलिट करणे;

(iii) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म आणि/किंवा प्राप्त बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसच्या कोणत्याही भागासाठी किंवा त्यावर लागू असलेल्या आचारसंहिता किंवा इतर गाईडलाईन्सचे उल्लंघन करणे.

(iv) सध्या अंमलात असलेल्या कोणत्याही लागू कायद्यांचे उल्लंघन करणे;

(v) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या कोणत्याही भाग किंवा फीचरचा किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मला किंवा कोणत्याही सर्व्हर, कॉम्प्युटर, नेटवर्कला कनेक्ट असलेले इतर कोणतेही सिस्टीम्स किंवा नेटवर्क्स किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर किंवा त्याद्वारे ऑफर केलेल्या कोणत्याही सर्व्हिसेसचा हॅकिंग, पासवर्ड "मायनिंग" किंवा इतर कोणत्याही अवैध माध्यमाद्वारे अनधिकृत ॲक्सेस मिळवण्याचा प्रयत्न;

(vi) कोणत्याही प्रकारे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मचे कोणतेही भाग किंवा फीचर पुनरुत्पादित, ड्युप्लिकेट, कॉपी, विक्री, पुनर्विक्री किंवा शोषण करणे;

(vii) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मला कनेक्ट केलेल्या कोणत्याही नेटवर्कची असुरक्षितता तपासणे, स्कॅन किंवा टेस्ट करणे किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मला कनेक्ट केलेल्या कोणत्याही नेटवर्कवरील सिक्युरिटी किंवा प्रमाणीत उपायांचे उल्लंघन करणे;

(viii) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म, त्याच्या सोर्स कोड सह बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वरील कोणत्याही अकाउंटच्या कोणत्याही माहितीचा उलट तपास, ट्रेस किंवा ट्रेस करण्याचा प्रयत्न करणे, किंवा बजाज फिनसर्व्ह ॲप किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म द्वारे किंवा मार्फत उपलब्ध किंवा ऑफर केलेल्या कोणत्याही सर्व्हिस किंवा माहितीचा लाभ घेणे.

## 15. फी किंवा शुल्क

बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मद्वारे अंमलबजावणी केलेल्या ट्रान्झॅक्शन्ससाठी किंवा बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसचा वापर करण्यासाठी किंवा बजाज फिनसर्व्ह अकाउंट आणि/किंवा परिस्थितीनुसार बीएफएल किंवा अशा थर्ड पार्टीच्या कोणत्याही फीचरसाठी फी/ शुल्क भरण्यासाठी तुम्ही जबाबदार असाल. पुढे, बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसशी संबंधित लागू फी खालील **शेड्यूल I** मध्ये प्रदान केले जाते. बीएफएल कडे त्यांच्या विवेकबुद्धीनुसार बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मद्वारे अंमलात आणलेल्या ट्रान्झॅक्शनसाठी किंवा बीएफएल प्रॉडक्ट आणि सर्व्हिसेस किंवा त्यातील कोणत्याही फीचरच्या वापरासाठी लागू असलेल्या फी / शुल्काचे स्वरूप आणि प्रमाण निर्धारित करण्याचा पूर्ण अधिकार असेल. लागू फी/शुल्कामध्ये कोणताही बदल झाल्यास, तुम्ही प्राप्त करत असलेल्या संबंधित प्रॉडक्ट / सर्व्हिसच्या अटी व शर्तींनुसार ते तुम्हाला सूचित केले जाईल आणि तुमच्यावर बंधनकारक असेल.

वर्तमान शुल्क (जे आमच्या विवेकबुद्धीनुसार आणि योग्य सूचना दिल्यानंतर भविष्यात बदलले जाऊ शकतात) तुम्ही https://www.bajajfinserv.in/all-fees-and-charges वर पाहू शकता.

## 16. प्रायव्हसी अटी

तुम्ही याद्वारे मान्य करता आणि सहमत आहात की बीएफएल https://www.bajajfinserv.in/privacy-policy. येथे उपलब्ध असलेल्या प्रायव्हसी अटींनुसार तुमचा पर्सनल डाटा संकलित, होल्ड, वापरू आणि ट्रान्सफर करू शकते. तुमच्या पर्सनल डाटाचे संकलन, वापर, प्रोसेसिंग आणि स्टोरेजची पद्धत खालीलप्रमाणे असेल:

**16.1. संकलित केलेल्या माहितीचा प्रकार:** बीएफएल बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्रदान करण्याच्या विशिष्ट आणि कायदेशीर उद्देशांसाठी आवश्यक असलेली माहिती संकलित करते / संकलित करेल आणि बीएफएल हे उल्लेखित उद्देशांसह विसंगत असलेल्या पद्धतीने पुढे प्रोसेस करणार नाही. पुढे, बीएफएल खालील प्रकारची माहिती संकलित करू शकते:

**(क) तुमच्याद्वारे प्रदान केलेली माहिती:**

**(i)** जेव्हा तुम्ही बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म / बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस वापरणे सुरू करता, तेव्हा बीएफएल तुम्हाला रजिस्ट्रेशन प्रोसेस / लॉग-इन प्रोसेस / साईन-अप प्रोसेसचा भाग म्हणून काही माहिती प्रदान करण्यास सांगू शकते आणि बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मसह तुमच्या इंटरफेसच्या वेळी आणि बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करताना, बीएफएल विविध ऑनलाईन सोर्सेस द्वारे माहिती संकलित करू शकते, ज्यामध्ये बजाज फिनसर्व्ह अकाउंट रजिस्ट्रेशन फॉर्म, आमच्याशी संपर्क साधा फॉर्म यांचा समावेश होतो किंवा जेव्हा तुम्ही बीएफएलच्या सपोर्ट टीमशी संवाद साधता.

**(ii)** बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर रजिस्ट्रेशन / लॉग-इन / साईन-अप करताना आणि / किंवा बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करताना, बीएफएल खालील माहितीसह विचारू शकते परंतु त्यापुरते मर्यादित नाही:

(क) नाव (पहिले नाव, मधले नाव आणि आडनाव);
(ख) मोबाईल नंबर;
(ग) ईमेल आयडी;
(घ) जन्मतारीख;
(ङ) पॅन;
(च) कायदा / रेग्युलेशनच्या केवायसी अनुपालनासाठी आवश्यक असलेले डॉक्युमेंट्स;
(छ) वेळोवेळी बीएफएलद्वारे आवश्यक मानले जाऊ शकणारे असे इतर तपशील / डॉक्युमेंट्स.

**(iii)** बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या फीचर्सनुसार किंवा तुम्ही वेळोवेळी प्राप्त केलेल्या बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसच्या स्वरुपाच्या अनुरूप, बीएफएल लागू कायद्यानुसार ॲड्रेस, पेमेंट किंवा बँकिंग माहिती, क्रेडिट/डेबिट कार्ड, बँक अकाउंट तपशील आणि इतर कोणत्याही सरकारी ओळख नंबर किंवा डॉक्युमेंट्ससह अतिरिक्त माहिती घेऊ शकते. जर तुम्ही बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसशी संबंधित फीचर प्राप्त करण्याची निवड केली तर तुम्ही अशी अतिरिक्त माहिती प्रदान करणे निवडू शकता.

**(ख) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वापरताना/ब्राउज करताना कॅप्चर केलेली माहिती:**

i. तुम्ही मान्य करता आणि सहमत आहात की बीएफएल द्वारे संकलित केलेली सर्व माहिती "जशी आहे तशी" आधारावर आहे आणि तुम्ही प्रदान केलेल्या माहितीच्या प्रामाणिकतेसाठी बीएफएल जबाबदार असणार नाही.

ii. विविध टेक्नॉलॉजीज/ॲप्लिकेशन्सद्वारे बीएफएल बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर तुमच्या वापरानुसार आणि ब्राउजिंगनुसार तुमची माहिती संकलित करते. यामध्ये तुमच्याशी संबंधित ट्रान्झॅक्शन तपशील समाविष्ट आहे, ज्यामध्ये बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसचा वापर करण्याच्या पद्धती, तुम्ही विनंती केलेल्या सर्व्हिसेसचा प्रकार, पेमेंट पद्धत/रक्कम आणि इतर संबंधित ट्रान्झॅक्शनल आणि फायनान्शियल

माहितीचा समावेश होतो. पुढे, तुम्ही क्लेम केलेल्या/प्राप्त केलेल्या रिवॉर्ड/ऑफर नुसार, बीएफएल ऑर्डर तपशील, डिलिव्हरी माहिती इ. देखील संकलित करते.

iii. बीएफएल ला वेळोवेळी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म/ बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसच्या तुमच्या वापरादरम्यान/ ॲक्सेस दरम्यान, तुमची अतिरिक्त स्पष्ट संमती मिळाल्यानंतरच काही अतिरिक्त माहितीचा ॲक्सेस आवश्यक असू शकतो. अशा अतिरिक्त माहितीमध्ये समाविष्ट असू शकते: (i) लोकेशन पडताळणी करण्यासाठी आणि बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मची सर्व्हिस पात्रता तपासण्यासाठी तुमची लोकेशन माहिती (आयपी ॲड्रेस, रेखांश आणि अक्षांश माहिती), (ii) मोबाईल डिव्हाईस ओळख नंबर आणि सिम ओळख नंबर आणि (iii) ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर तुमच्या वर्तनासह तुमच्या क्रेडेन्शियल्सची पडताळणी करण्यासाठी तुमचा ईमेल तपशील/ ॲक्सेस.

**(ग) थर्ड पार्टीकडून संकलित केलेली माहिती:**

i. बीएफएल, तुमची संमती प्राप्त झाल्यानंतर, बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर तुमचा अनुभव अधिक पर्सनलाईज करण्यासाठी तुमच्याविषयी माहिती प्रदान करण्यासाठी काही थर्ड पार्टीला विनंती करू शकते आणि बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या सर्व युजरद्वारे ॲक्सेस केले जाऊ शकत नसलेल्या विशिष्ट सर्व्हिसेस प्रदान करू शकते.

ii. बीएफएल तुमची क्रेडिट संबंधित माहिती (क्रेडिट स्कोअरसह) थर्ड पार्टीकडून (उदा. क्रेडिट माहिती कंपन्या / माहिती युटिलिटीज / अकाउंट ॲग्रीगेटर्स) कराराअंतर्गत संकलित करू शकते.

iii. बीएफएलला तुमची अतिरिक्त माहिती प्राप्त होऊ शकते, (i) तुमच्या प्रोफाईलचा योग्य हेतू जाणण्यासाठी (ii) थर्ड पार्टी सर्व्हिस प्रोव्हायडर्स आणि/किंवा पार्टनरकडून फसवणूक आणि सुरक्षा समस्या शोधण्यात मदत करण्यासाठी, आणि (iii) पार्टनरशिपद्वारे तुमच्याविषयी आणि तुमच्या कृती किंवा बीएफएल पार्टनर नेटवर्क्सकडून तुमच्या अनुभव आणि संवादाविषयी माहिती.

**16.2 संकलित केलेली माहिती कशी वापरली जाते:**

1. तुम्हाला बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसच्या संदर्भात चांगली सर्व्हिस प्रदान करण्यासाठी आणि (जर असल्यास) लागू कायदे / रेग्युलेशन्सचे पालन करण्यासाठी तुमची माहिती संकलित केली जाते. तुम्ही याद्वारे सहमत आहात आणि मान्य करता की बीएफएल लागू कायदा / रेग्युलेशन्सद्वारे परवानगी असलेल्या मर्यादेपर्यंत, बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म ॲक्सेस करताना तुमच्याकडून बीएफएल द्वारे संकलित केलेल्या बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसशी संबंधित तुमची माहिती त्यांच्या ग्रुप कंपन्या, उपकंपन्या, सहयोगी, सर्व्हिस प्रोव्हायडर, एजन्सी आणि/किंवा कोणत्याही थर्ड पार्टीसह शेअर किंवा प्रोसेस करू शकते, ज्यामध्ये तुमच्याद्वारे सुरू केलेले ट्रान्झॅक्शन पूर्ण करण्यासाठी, तुम्हाला सर्व्हिस प्रदान करण्यासाठी आणि/किंवा तुमच्यासाठी बजाज फिनसर्व्ह सर्व्हिस मध्ये वृद्धी करण्यासाठी, अशा

संकलन, वापर आणि स्टोरेजच्या पद्धतीने नवीन प्रॉडक्ट्स इत्यादी ऑफर करण्यासाठी येथे नमूद प्रायव्हसी अटीद्वारे नियंत्रित केले जातात अशा उद्देशांचा समावेश होतो परंतु यापुरते मर्यादित नाही.

2. बीएफएल खालील उद्देशांसाठी तुमची माहिती वापरू शकते:

क) तुमच्यासाठी कस्टमाईज्ड लोन / बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस, संबंधित ऑफर आणि रिवॉर्ड तयार / ऑप्टिमाईज करणे;
ख) तुमचे फायनान्शियल ट्रान्झॅक्शन, इन्व्हेस्टमेंट आणि मागील फायनान्शियल वर्तनावर आधारित तुमच्यासाठी विशिष्ट फायनान्शियल प्रॉडक्ट / इतर प्रॉडक्ट्स तयार करणे.
ग) बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस मध्ये सुधारणा करण्यासाठी, बीएफएल इतर प्रकारची माहिती देखील संकलित करू शकते जी तुमच्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे लिंक्ड नाही आणि परिस्थितीनुसार ती एकत्रित, निनावी किंवा ओळखीची नसलेली असू शकते.
घ) तुमच्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म / बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्रदान करणे, प्रोसेसिंग करणे, मेंटेन करणे, सुधारणे आणि विकसित करणे.
ङ) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म/ बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस विषयी तुमच्याशी संपर्क साधणे किंवा आमच्या इव्हेंट किंवा नोटीस विषयी अपडेट, सपोर्ट किंवा माहिती यासारख्या कोणत्याही सामान्य शंकांचे निराकरण करणे.
च) मार्केटिंग आणि प्रमोशनल मटेरियल्स प्रदान करणे यासारख्या मार्केटिंग संबंधित कृती आयोजित करणे.
छ) बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस मध्ये सुधारणा करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या वापराविषयी सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण.
ज) लागू कायद्यानुसार त्याच्या दायित्वांचे पालन करण्यासाठी तुमची माहिती स्टोअर आणि व्यवस्थापित करणे.

3. उपक्रमांची स्पष्टीकरणात्मक लिस्ट खालीलप्रमाणे आहे (जी केवळ समावेशक आहे, परंतु स्वरूपात सर्वसमावेशक नाही), ज्याद्वारे बीएफएल तुमची माहिती खालीलसाठी वापरू शकते:

(क) **अकाउंट निर्मिती:** तुमचे बजाज फिनसर्व्ह अकाउंट सेट-अप आणि बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस प्राप्त करण्यासाठी.

(ख) **डिव्हाईस ओळखणे:** जेव्हा तुम्ही बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वापरता/ ॲक्सेस करता तेव्हा डिव्हाईस संबंधित माहिती आणि ॲप्लिकेशन संबंधित माहिती डिव्हाईस ओळखण्यासाठी वापरली जाऊ शकते;

(ग) **पडताळणी:** बीएफएल तुमची ओळख पडताळण्यासाठी माहितीचा वापर करते.

(घ) **रिस्क मॅनेज करणे आणि फसवणूक विरोधी तपासणी करणे:** डिव्हाईसशी संबंधित माहिती तसेच तुमचे संपर्क, एसएमएस, लोकेशन आणि माहिती रिस्क नियंत्रित करण्यासाठी, फसवणूक शोधण्यासाठी आणि तुम्हाला चांगल्या सर्व्हिसेस प्रदान करण्यासाठी वापरली जाऊ शकते;

(ङ) **सर्व्हिस त्रुटींचे निदान:** सर्व्हिस किंवा तांत्रिक समस्यांचे निदान करण्यास आणि सिक्युरिटी मेंटेन करण्यास मदत करण्यासाठी लॉग्सची माहिती वापरली जाऊ शकते.

(च) **डाटा विश्लेषण करणे:** तुम्हाला प्रदान केलेल्या सर्व्हिसेसची गुणवत्ता सुधारण्यासाठी बीएफएल सर्व्हिसेसच्या वापराविषयी सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण आणि विकास करण्यासाठी डिव्हाईसशी संबंधित माहिती आणि ॲप्लिकेशन संबंधित माहिती वापरली जाऊ शकते;

(छ) **अनुभव सुधारणे:** बीएफएल तुमच्यासाठी प्रॉडक्ट/ सर्व्हिस ऑफरिंग/ अनुभव सुधारण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मधून घेतलेल्या तुमच्या वापराच्या डाटाचे विश्लेषण करू शकते.

(ज) **तुमचा फीडबॅक संकलित करणे:** तुम्ही प्रदान करण्यासाठी निवडलेल्या फीडबॅकचा पाठपुरावा करण्यासाठी प्रदान केलेल्या माहितीचा वापर करण्यासाठी बीएफएल तुमच्याशी संपर्क साधू शकते आणि त्याचा रेकॉर्ड देखील ठेवू शकते.

(झ) **सूचना पाठविणे:** वेळोवेळी, अटी, शर्ती आणि धोरणांमध्ये बदल करण्याविषयी माहिती सारख्या महत्त्वाच्या सूचना पाठविण्यासाठी बीएफएल तुमची माहिती वापरू शकते.

4. बीएफएल कंझ्युमर नंबर, सबस्क्रिप्शन आयडी, बिल नंबर किंवा रजिस्टर्ड मोबाईल नंबर, रजिस्टर्ड टेलिफोन नंबर, अकाउंट आयडी/कस्टमर आयडी किंवा अशा इतर ओळखकर्त्यांसह माहितीचा वापर करू शकते. जे बिल पेमेंट सुलभ करण्यासाठी थकित पेमेंट/सबस्क्रिप्शन किंवा बिल वॅल्यू, सबस्क्रिप्शन प्लॅन, देय तारीख आणि अशी इतर माहिती प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहे.

5. बीएफएल त्यांच्या विविध प्रॉडक्ट्स व सर्व्हिसेसच्या मार्केटिंगला प्रोत्साहन देण्यासाठी तुमचे नाव, फोन नंबर, ईमेल ॲड्रेस आणि बजाज फिनसर्व्ह अकाउंट तपशील (जर असल्यास) वापरू शकते. तुम्हाला grievanceredressalteam@bajajfinserv.in वर ईमेल पाठवून बीएफएलकडून जाहिरातपर संवाद प्राप्त न करण्याचा अधिकार असेल.

6. बीएफएल तुम्हाला लागू कायदा आणि रेग्युलेशन्स सह अनुपालनात पेमेंट सर्व्हिसेसचा ॲक्सेस आणि वापर करण्यास सक्षम करण्यास पेमेंट सर्व्हिसेसचा भाग म्हणून माहितीचा वापर करू शकते आणि अशी माहिती तुमच्या अखंड अनुभवासाठी थर्ड-पार्टी सर्व्हिस प्रोव्हायडर्स सोबत शेअर करू शकते.

## 17. कुकीज

बीएफएल बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस संबंधी मदत आणि विश्लेषण करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या काही भागांवर "कुकीज" इ. सारख्या डाटा कलेक्शन डिव्हाईसचा वापर करते. बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या तुमच्या ॲक्सेस किंवा संवादावर आधारित बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस तुम्हाला देऊ शकतात. स्पष्टतेसाठी, "कुकीज" या वेब / मोबाईल प्लॅटफॉर्मवर ॲक्सेस असणाऱ्या लहान फाईल्स आहेत आणि / किंवा सर्व्हिसेस प्रदान करण्यास मदत करणाऱ्या तुमच्या डिव्हाईस हार्ड-ड्राईव्ह / स्टोरेजवर ठेवल्या जातात. कृपया लक्षात घ्या की बीएफएल हे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मद्वारे काही वैशिष्ट्ये ऑफर करू शकतात जे फक्त "कुकी" चा वापर करूनच उपलब्ध असू शकतात.

## 18. बजाज फिनसर्व्ह अकाउंटचे टर्मिनेशन / सस्पेन्शन:

(क) जर तुम्ही येथे नमूद कोणत्याही कराराचे उल्लंघन केल्यास, बीएफएल कडे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मध्ये तुमच्याद्वारे वापरले जाणारे बजाज फिनसर्व्ह अकाउंट ॲक्सेस किंवा डिलिट करण्याचा अधिकार राखीव आहे आणि / किंवा बीएफएल तुम्हाला असे बजाज फिनसर्व्ह अकाउंट / बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस वापरण्यापासून किंवा ॲक्सेस करण्यापासून मनाई किंवा प्रतिबंधित करू शकते. बीएफएल बजाज फिनसर्व्ह अकाउंट / बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसचा ॲक्सेस तात्पुरता किंवा कायमस्वरुपी निलंबित किंवा फ्रीज किंवा ब्लॉक करू शकते, जर त्यांच्याकडे हे विश्वास ठेवण्याचे कारण आहे की तुमच्याद्वारे काही संशयास्पद किंवा असामान्य कृती होत आहेत किंवा जर बीएफएलला वाटत असेल आणि / किंवा कोणत्याही चूक आणि / किंवा कमिशनची साशंकता असेल ज्यात समावेश असेल परंतु मर्यादित नाही असे कोणतेही दुर्भावनापूर्ण हल्ला / फसवणूक / दुर्भावनापूर्ण कृत्य/ तोतयागिरी / फिशिंग / हॅकिंग / अनधिकृत प्रवेश इ. यासाठी तुमच्याकडून मागितलेले आवश्यक स्पष्टीकरण प्राप्त होईपर्यंत आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह अकाउंट मधील ऑपरेशन्स पुन्हा सुरू होऊ शकतात याची खात्री होईपर्यंत ते योग्य मानले जाईल. तुम्ही बीएफएलने मागितलेली सर्व स्पष्टीकरणे/माहिती त्वरित सादर करावीत. वर नमूद केलेल्या निलंबनामुळे/हटवल्यामुळे परिणामी तुम्हाला आवश्यक असल्यास, कोणत्याही सहाय्यासाठी तुम्ही बीएफएल तक्रार निवारण टीमशी संपर्क साधू शकता, ज्याचा तपशील खाली **क्लॉज 30** मध्ये प्रदान केला आहे.

(ख) तुम्ही सहमत आहात आणि मान्य करता की, बीएफएल कोणतेही कारण न देता त्याच्या विवेकबुद्धीनुसार तुम्हाला 30 (तीस) कॅलेंडर दिवसांची सूचना देऊन कोणत्याही वेळी तुमचे बजाज फिनसर्व्ह अकाउंट बंद करू शकते. जर तुम्ही या वापरायच्या अटींचे उल्लंघन केले तर अशा सूचना कालावधीची आवश्यकता उद्भवणार नाही.

## 19. अस्वीकृती

(क) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म द्वारे उपलब्ध किंवा ॲक्सेस करण्यायोग्य सर्व कंटेंट, सॉफ्टवेअर, फंक्शन्स, मटेरियल आणि माहितीसह बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस "जसे आहे तसे" आधारावर प्रदान केल्या जातात. बीएफएल किंवा त्यांचे एजंट, को-ब्रँडर किंवा पार्टनर, बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म द्वारे उपलब्ध / ॲक्सेस करण्यायोग्य कंटेंट, सॉफ्टवेअर, फंक्शन्स, मटेरियल आणि माहितीसाठी कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व आणि वॉरंटी देत नाही.

(ख) बीएफएल बजाज फिनसर्व्ह ॲपशी लिंक असलेल्या कोणत्याही थर्ड-पार्टी साईट्स किंवा सर्व्हिसेस मर्यादेशिवाय समाविष्ट बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वरील कंटेंट, माहिती आणि मटेरियल्स मधील फंक्शन्स विनाव्यत्यय, वेळेवर किंवा त्रुटीरहित असतील, दोष दूर केले जातील किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म किंवा सर्व्हर जे असा कंटेंट, माहिती आणि मटेरियल्स उपलब्ध करून देतात तो व्हायरसमुक्त किंवा अन्य धोकादायक घटकांपासून मुक्त असेल, याबाबत कोणत्याही स्वरुपात हमी देत नाही.

(ग) तुम्ही समजता की पेमेंट ट्रान्झॅक्शन, जर असल्यास, ते पूर्णपणे पेमेंट करणारे (बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वापरून) तुम्ही (**"प्रेषक"**) आणि प्रेषकाकडून असे पेमेंट स्वीकारणारी व्यक्ती / संस्था (**"प्राप्तकर्ता"**) यांदरम्यान असते आणि बीएफएल अशा व्यक्ती/ संस्थेद्वारे प्रदान केलेल्या कोणत्याही

अशा सर्व्हिस, वस्तू, गुणवत्ता, संख्या किंवा डिलिव्हरी लेव्हल कमिटमेंट संबंधी कोणतीही गॅरंटी किंवा वॉरंटी प्रदान करीत नाही.

## 20. क्षतिपूर्ती

तुम्ही बीएफएल, त्यांचे सहयोगी, त्यांचे प्रोमोटर्स, अधिकारी, डायरेक्टर्स, कर्मचारी आणि एजंट्स, भागीदार, परवानादार, परवानाधारक, सल्लागार, कंत्राटदार आणि इतर लागू थर्ड पार्टी यांना कोणत्याही आणि सर्व क्लेम्स, मागणी, नुकसान, बंधन, नुकसान, दायित्व, कृतीचे कारण, खर्च किंवा कर्ज आणि खर्च (कोणत्याही कायदेशीर शुल्कासहित) जे पुढील मुळे निर्माण होते, यापासून संरक्षण, नुकसान भरपाई देण्यास आणि निरुपद्रवी मानण्यास सहमत आहात:

(क) तुमचा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म / बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस चा ॲक्सेस;

(ख) यापैकी कोणत्याही अटींचे उल्लंघन ज्यामध्ये वापरायच्या अटी आणि/किंवा प्रायव्हसी अटींचा समावेश आहे परंतु त्यापर्यंत मर्यादित नाही;

(ग) कोणत्याही बौद्धिक संपदा हक्क किंवा प्रायव्हसी हक्कासह कोणत्याही थर्ड पार्टी हक्काचे तुमच्याद्वारे उल्लंघन;

(घ) तुमचे टॅक्स रेग्युलेशन्स सह लागू कायद्याचे अनुपालन करण्यात अपयश; आणि/किंवा

(ङ) कोणत्याही चुकीच्या पद्धतीने बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसचा तुमच्या ॲक्सेस किंवा वापरामुळे अशा पार्टीला झालेल्या कोणत्याही नुकसानीमुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही थर्ड पार्टीद्वारे दाखल केलेला कोणताही क्लेम.

## 21. नुकसान आणि दायित्वाची मर्यादा

(क) या वापरायच्या अटींमध्ये किंवा इतर कोणत्याही डॉक्युमेंट मध्ये असलेल्या कोणत्याही गोष्टीसोबतच, बीएफएल, त्याचे उत्तराधिकारी, एजंट, नियुक्ती आणि त्यांचे प्रत्येक डायरेक्टर्स, अधिकारी, कर्मचारी, सहयोगी, एजंट आणि प्रतिनिधी तुमच्यासाठी किंवा इतर कोणत्याही व्यक्तीसाठी पुढीलसाठी जबाबदार असणार नाहीत:

(i) काहीही झाले तरी आणि कृतीच्या स्वरुपाची पर्वा न करता (टोर्ट किंवा कठोर दायित्वासह) बीएफएलच्या प्रॉडक्ट्स / सर्व्हिसेस आणि डाटा / कंटेंट किंवा त्यांच्यावर अवलंबून असणारे यांच्या कनेक्शन मध्ये कोणताही ॲक्सेस, वापर किंवा ॲक्सेस किंवा वापर करण्यास असमर्थता यामुळे निर्माण होणारे किंवा कोणतेही अप्रत्यक्ष, प्रासंगिक, विशेष, परिणामी, दंडात्मक किंवा आर्थिक नुकसान, खर्च किंवा हानी);

(ii) कोणताही डाउनटाइम खर्च, महसूल किंवा बिझनेस संधी गमावणे, नफा गमावणे, अपेक्षित सेव्हिंग्स किंवा बिझनेस गमावणे, डाटा गहाळ होणे, सद्भावना हरवणे किंवा सॉफ्टवेअरसह कोणत्याही उपकरणाचे मूल्य हरवणे; आणि/किंवा;

(iii) आमच्या सिस्टीम सह बीएफएलच्या प्रॉडक्ट्स / सर्व्हिसेस किंवा अनुकूलता ॲक्सेस करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही कॉम्प्युटर किंवा मोबाईल फोन किंवा इतर दूरसंचार उपकरणांच्या अयोग्य वापरामुळे उद्भवणारे कोणतेही नुकसान किंवा हानी;

(iv) याशिवाय, बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मचा ॲक्सेस आणि वापर करून लाभ घेतलेल्या कोणत्याही बीएफएलच्या प्रॉडक्ट/सर्व्हिसेस अंतर्गत कोणतेही नुकसान, तोटा किंवा खर्चासाठी किंवा अयशस्वी क्रेडिट किंवा फंड डेबिटसाठी इंटरेस्ट देण्याच्या कोणत्याही दायित्वासाठी बीएफएलच्या कडून जाणूनबुजून डिफॉल्ट किंवा निष्काळजीपणामुळे ते थेट कारणीभूत असल्याशिवाय बीएफएल जबाबदार असणार नाही.

(ख) बीएफएल तुम्हाला किंवा कोणत्याही थर्ड पार्टीला पुढील बाबींमुळे झालेल्या गैरसोय, नुकसान, खर्च, हानी किंवा दुखापतीसाठी जबाबदार असणार नाही:

(i) कोणत्याही थर्ड पार्टीची कृती किंवा चूक ज्यामध्ये समावेश असेल परंतु मर्यादित नाही असे कोणताही उपकरण किंवा सॉफ्टवेअर प्रोव्हायडर्स, कोणतेही सर्व्हिस प्रोव्हायडर्स, कोणतेही नेटवर्क प्रोव्हायडर्स (ज्यात समावेश असेल परंतु मर्यादित नाही असे टेलिकम्युनिकेशन्स प्रोव्हायडर्स, इंटरनेट ब्राउजर प्रोव्हायडर्स आणि इंटरनेट ॲक्सेस प्रोव्हायडर्स) किंवा आधीचा कोणताही एजंट किंवा सब-काँट्रॅक्टर;

(ii) तुमच्याद्वारे कोणत्याही अधिकृत किंवा अनधिकृत केलेले थर्ड पर्सन /पार्टी द्वारे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म / बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसचा वापर;

(iii) तुमच्याद्वारे चुकीचा मोबाईल नंबर / प्राप्तकर्ता / अकाउंटमध्ये फंड ट्रान्सफर;

(iv) तुमच्यावर बिलर द्वारे आकारणी केलेले कोणतेही ड्युप्लिकेट पेमेंट किंवा विलंबित पेमेंट किंवा कोणताही दंड / इंटरेस्ट / विलंब पेमेंट शुल्क;

(v) चुकीचा मोबाईल नंबर किंवा डीटीएच नंबर वर चुकीचा रिचार्ज, चुकीचे बिलिंग अकाउंट, क्रेडिट कार्ड इत्यादींसाठी केलेले बिल पेमेंट, अनपेक्षित लाभार्थ्यांना फंड ट्रान्सफर;

(vi) ॲप इंस्टॉल केलेल्या तुमच्या मोबाईल फोन / इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस, हार्डवेअर आणि / किंवा उपकरणांची चोरी किंवा नुकसान;

(vii) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म किंवा कोणत्याही नेटवर्कच्या सिस्टीम मेंटेनन्स किंवा ब्रेकडाउन / उपलब्ध नसल्यामुळे कोणतेही ट्रान्झॅक्शन प्रभावित करण्यास किंवा पूर्ण करण्यास तुमची असमर्थता;

(viii) तुम्हाला कोणतेही लागू कायदे आणि / किंवा रेग्युलेशन्स आणि कोणतीही स्थानिक किंवा परदेशी रेग्युलेटरी संस्था, सरकारी एजन्सी, वैधानिक मंडळ, मंत्रालय, विभाग किंवा अन्य सरकारी संस्था आणि / किंवा त्यांचे अधिकारी यांच्याद्वारे दिलेल्या कोणत्याही सूचना आणि / किंवा निर्देश यासह अनुरुप बीएफएल द्वारे कोणतीही कृती किंवा चूक याचा परिणाम म्हणून बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मचा वापर करण्यापासून वंचित केले जाते.

(ग) या वापरायच्या अटी किंवा इतर कोणत्याही डॉक्युमेंट अंतर्गत काहीही असले तरी, कोणत्याही परिस्थितीत, बीएफएल किंवा त्यांचे कोणतेही डायरेक्टर्स, कर्मचारी, एजंट्स आणि / किंवा वैयक्तिक

कोणीही पुढील बाबींमधून निर्माण होणारे कोणतेही नुकसान, दायित्व, हानी साठी तुमच्यासाठी जबाबदार राहणार नाही:

(i) या वापरायच्या अटी, प्लॅटफॉर्म किंवा कोणतीही रेफरन्स साईट, मोबाईल ॲप्लिकेशन, बजाज फिनसर्व्ह ॲपवर उपलब्ध प्रॉडक्ट्स किंवा सर्व्हिसेस; आणि / किंवा

(ii) रेफरन्स साईट, मोबाईल ॲप्लिकेशन, बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मार्फत उपलब्ध प्रॉडक्ट्स किंवा सर्व्हिसेस किंवा कोणतीही रेफरन्स साईट याबाबतचा तुमचा वापर किंवा वापरण्यास असमर्थता. यापुढे बीएफएलचे एकूण दायित्व जर कोणत्याही प्रकारे लागू कायद्याअंतर्गत विशेषत: प्रदान केल्याशिवाय रु. 1,000/- पेक्षा जास्त नसावे.

(घ) तुमचे बजाज फिनसर्व्ह अकाउंट आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस आणि/किंवा तुमच्याद्वारे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मचा वापर समाप्त झाल्यानंतरही हा क्लॉज कायम असेल.

## 22. ट्रान्झॅक्शनचे रेकॉर्ड्स:

बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वरील ट्रान्झॅक्शनचे रेकॉर्ड्स तुमच्याविरुद्ध निर्णायक पुरावा मानले जातील आणि गणना आणि/किंवा स्पष्ट त्रुटी वगळता ते तुमच्यावर बंधनकारक असतील. जर तुमच्या बजाज फिनसर्व्ह अकाउंटमध्ये एका (1) वर्षाच्या निरंतर कालावधीसाठी तुमच्याद्वारे कोणतेही ट्रान्झॅक्शन सुरू झाले नसेल तर बजाज पे वॉलेट वगळता असे अकाउंट बीएफएल द्वारे **'इनॲक्टिव्ह'** अकाउंट म्हणून मानले जाईल जे परिशिष्ट I च्या बाबतीत नियंत्रित केले जाईल. तुम्ही सहमत आहात की तुमची बजाज फिनसर्व्ह अकाउंट स्थिती केवळ या संदर्भातील तुमच्या सूचनेनुसार आणि बीएफएलद्वारे आवश्यक मानलेल्या अटींसाठी तपशील/ डॉक्युमेंट्स/ स्वीकृती सबमिट केल्यानंतर **'ॲक्टिव्ह'** मध्ये बदलेल.

## 23. लियन / सेट ऑफ करण्याचा अधिकार

(क) तुम्ही याद्वारे बीएफएल सह लियन आणि सेट-ऑफच्या अधिकाराच्या अस्तित्वाची मंजूरी आणि कन्फर्म करता, जे बीएफएल लागू कायद्याच्या अधीन त्यांच्या विवेकबुद्धीनुसार तुमच्यासोबत असलेल्या अन्य कोणत्याही करार / कॉंट्रॅक्ट अंतर्गत कोणत्याही वेळी त्यांच्या कोणत्याही विशिष्ट अधिकारांचा पूर्वग्रह न ठेवता आणि तुमच्या मालकीचे कोणतेही पैसे आणि बीएफएलच्या कोणत्याही देय, चुकीच्या, जादा किंवा चुकीच्या क्रेडिटसाठी बीएफएलकडे जमा केलेले पैसे आणि या वापरायच्या अटी अंतर्गत कोणतेही शुल्क / फी / देययोग्य रकमेसह थकित रक्कम योग्य किंवा ॲडजस्ट करण्यासाठी किंवा सेट-ऑफ करण्यासाठी तुम्हाला योग्य सूचना देण्यासह करू शकते.

(ख) तसेच, तुम्ही याद्वारे बीएफएल सह लियन आणि सेट-ऑफच्या अधिकाराच्या अस्तित्वाची मंजूरी आणि कन्फर्म करता, जे बीएफएल लागू कायद्याच्या अधीन त्यांच्या विवेकबुद्धीनुसार तुमच्यासोबत असलेल्या अन्य कोणत्याही करार / कॉंट्रॅक्ट अंतर्गत त्यांच्या कोणत्याही विशिष्ट अधिकारांचा पूर्वग्रह न ठेवता चुकीच्या किंवा चुकीच्या पद्धतीने प्रक्रिया केलेल्या ट्रान्झॅक्शनसाठी फंड रिकव्हर करण्यासाठी बीएफएल सह तुमच्या मालकीचे कोणतेही पैसे योग्य किंवा ॲडजस्ट करण्यासाठी तुम्हाला सूचना देण्यासह करू शकते.

(ग) बीएफएलद्वारे अधिकाराचा वापर आणि सेट-ऑफ करण्याच्या कारणामुळे तुम्हाला झालेल्या कोणत्याही नुकसान, खर्च, हानी इत्यादींसाठी बीएफएल जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही. बीएफएल तुमचे बजाज फिनसर्व्ह अकाउंट फ्री करण्यास किंवा कोणत्याही वैधानिक / रेग्युलेटरी / तपासणी प्राधिकरणाकडून कोणतीही सूचना किंवा निर्देश प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने तुम्हाला कोणतीही सूचना न देता संबंधित प्राधिकरणास संयुक्तपणे किंवा एकल पद्धतीने, जे उपलब्ध असेल त्याप्रमाणे, अकाउंटमधील जमा रक्कम पाठवण्यास हक्कदार आहे.

## 24. बौद्धिक संपदा हक्कांचा वापर आणि संरक्षण

(क) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस बौद्धिक संपदा कायद्यांद्वारे संरक्षित आहेत. बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मची कोणतीही माहिती, कंटेंट किंवा मटेरिअल बीएफएलच्या स्पष्ट लिखित परवानगीशिवाय कोणत्याही प्रकारे कॉपी, पुनरुत्पादित, पुन्हा प्रकाशित, अपलोड, पोस्ट, प्रसारित किंवा वितरित केली जाऊ शकत नाही. तुम्हाला येथे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मचा वापर करण्यासाठी मर्यादित परवानगी दिली जाते. तुमच्या वापरायच्या अटीच्या कराराच्या अधीन ही बाब आहे.

(ख) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म सह किंवा त्याद्वारे फीडबॅक समाविष्ट असलेला कंटेंट अपलोड, सबमिट करणे, स्टोअर करणे, पाठवून किंवा प्राप्त करण्याद्वारे तुम्ही बीएफएलला असा कंटेंट वापरण्यासाठी, होस्ट, स्टोअर, पुनरुत्पादन, सुधारित करण्यासाठी, डेरिव्हेटिव्ह कार्य तयार करण्यासाठी, संवाद साधण्यासाठी, प्रकाशित, सार्वजनिकरित्या सादर करण्यासाठी वितरित करण्यासाठी विना अट परवानगी देता. बीएफएलच्या नावे तुम्ही दिलेली परवानगी ही स्वत: आणि/किंवा त्यांच्या कोणत्याही ग्रुप कंपन्या, सहाय्यक, सहयोगी, सर्व्हिस प्रोव्हायडर्स, एजंटद्वारे ऑफर केलेल्या बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म आणि बजाज फिनसर्व्ह ॲप सर्व्हिसेसच्या संचालन, प्रोत्साहन आणि सुधारण्याच्या मर्यादित उद्देशासाठी आहे आणि नवीन वैशिष्ट्ये आणि सर्व्हिसेस विकसित करण्यासाठीही आहे.

## 25. टॅक्स दायित्व

तुम्ही याद्वारे बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह अकाउंटच्या वापराशी संबंधित कोणत्याही आणि लागू टॅक्स कायद्यांचे पालन करण्यास सहमत आहात, ज्यामध्ये मर्यादेशिवाय, बजाज पे वॉलेट, बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मार्फत केलेले पेमेंट्स किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म/ बजाज पे वॉलेट मार्फत प्राप्त झालेल्या फंडच्या संदर्भात उद्भवणाऱ्या कोणत्याही टॅक्सचा रिपोर्टिंग आणि पेमेंटचा समावेश आहे.

## 26. परवाना आणि ॲक्सेस

(क) बीएफएल हा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मधील कोणत्याही आणि सर्व बौद्धिक संपदा हक्कांसह सर्व हक्क, शीर्षक आणि इंटरेस्टचा एकमेव मालक आहे.

(ख) बीएफएल तुम्हाला वैयक्तिक, नॉन-कमर्शियल वापरासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म ॲक्सेस आणि वापरण्यासाठी मर्यादित परवानगी देते आणि ते नॉन-ट्रान्सफरेबल आहे आणि डाउनलोड करणे, कॉपी करणे, त्यातून डेरिव्हेटिव्ह वर्क तयार करणे, सुधारित करणे, रिव्हर्स इंजिनीअर, रिव्हर्स असेंबल

किंवा अन्यथा कोणताही सोर्स कोड शोधण्याचा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म किंवा त्याद्वारे प्रदान केलेल्या सर्व्हिसेस मध्ये विक्री, नियुक्ती, उप-परवाना, सिक्युरिटी इंटरेस्ट देण्याचा किंवा अन्यथा ट्रान्सफर करण्याचा कोणताही अधिकार प्रदान करत नाही.

(ग) तुम्हाला बीएफएल चे कोणतेही ट्रेड नाव, ट्रेडमार्क्स, सर्व्हिस मार्क्स, लोगो, डोमेन नाव आणि इतर विशिष्ट ब्रँड फीचर्स वापरण्याचा अधिकार नाही.

(घ) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मचा कोणताही अनधिकृत वापर या वापरायच्या अटींचे उल्लंघन करेल आणि परिणामी तुमच्यासाठी प्रचलित लागू कायद्यांतर्गत बीएफएलद्वारे कायदेशीर कृती सुरू केली जाईल.

## 27. अनपेक्षित घटना

बीएफएल कोणत्याही नुकसान, हानी, बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म सर्व्हिसेस ची अनुपलब्धता किंवा त्याच्या तरतुदीत कमतरता, जे बीएफएल च्या नियंत्रणाबाहेर आहे आणि ज्याचा पुढील समाविष्ट परंतु मर्यादित नसलेल्या कारणांसाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होतो, यासाठी जबाबदार धरले जाणार नाही:

(क) आग, भूकंप, इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती, पूर, महामारी;
(ख) संप, टाळेबंदी, कामगार अशांतता;
(ग) दंगल, नागरी अशांतता, युद्ध, नागरी गोंधळ;
(घ) ॲक्ट ऑफ गॉड, दहशतवादी कृत्य, आपत्कालीन परिस्थिती (आरोग्य किंवा इतर कारणांसाठी घोषित);
(ङ) न्यायालयीन ऑर्डर, कायद्यात बदल, किंवा इतर कोणतीही परिस्थिती;
(च) नेटवर्क / सर्व्हरचे डाउनटाइम स्वतः मुळे किंवा थर्ड पार्टी, सस्पेन्शन, व्यत्यय, वायरलेस टेक्नॉलॉजी मध्ये बिघाड, पेरिफेरल्स, सॉफ्टवेअर सिस्टीम, कम्युनिकेशन अपयश, हॅकिंग इ. मुळे.,
(छ) कोणतेही अनधिकृत प्रकटीकरण / वैयक्तिक / संवेदनशील वैयक्तिक माहितीचा भंग इ. आणि तुमच्या वर्तनामुळे तुम्हाला होणारे कोणतेही थेट / अप्रत्यक्ष नुकसान, जसे की:

I. तुमच्या ब्राउजरवर थर्ड पार्टी एक्सटेंशन, प्लग-इन्स किंवा ॲड-ऑन्स वापरण्यात तुमचे आचरण;

II. तुम्ही डार्कनेट, अनधिकृत/संशयास्पद वेबसाईट्स, संशयास्पद ऑनलाईन प्लॅटफॉर्म ॲक्सेस करू नये व अविश्वसनीय सोर्स कडून ॲप्लिकेशन डाउनलोड करू नये;

III. तुम्ही अज्ञात / अनोळखी सोर्स कडील कोणताही सामान्य ईमेल किंवा कोणतेही वेब / bitly / chatbot लिंक, इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये इतर कोणतीही लिंक इत्यादींना प्रतिसाद देऊ नये.

## 28. सामान्य

(क) तुम्ही आणि बीएफएल दरम्यान कोणतेही संयुक्त उपक्रम, पार्टनरशिप, रोजगार किंवा एजन्सी संबंध अस्तित्वात नाहीत.

(ख) या वापरायच्या अटींची कोणतीही तरतूद बेकायदेशीर, अवैध किंवा अंमलबजावणी न करण्यायोग्य असल्यास, पूर्णपणे किंवा अंशतः, कोणत्याही लागू कायद्यानुसार, अशा तरतूदी किंवा त्याचा भाग या वापरायच्या अटीचा भाग नसल्याचे मानले जाईल परंतु या वापरायच्या अटींमध्ये इतर तरतुदींची कायदेशीरता, वैधता आणि अंमलबजावणी प्रभावित होणार नाही. अशा परिस्थितीत, बीएफएल बेकायदेशीर, अवैध किंवा अंमलबजावणी न करण्यायोग्य तरतूद किंवा त्यातील काही भाग कायदेशीर, वैध आणि अंमलात आणण्यायोग्य असलेल्या तरतूदी किंवा त्यातील काही भाग पुनर्स्थित करण्याचा प्रयत्न करेल आणि जो तुमच्यावर बंधनकारक असेल.

(ग) या वापरायच्या अटी त्याच्या विषयाच्या संदर्भात पार्टींचा संपूर्ण करार आणि समजूतदारपणा आहेत आणि अशा विषयाशी संबंधित सर्व पूर्व किंवा समकालीन करार किंवा उपक्रमांची जागा घेतात आणि बदलतात.

(घ) बीएफएल, त्यांच्या विवेकबुद्धीनुसार तुम्हाला किंवा कोणत्याही थर्ड पार्टींना कोणतीही सूचना न देता, येथे नमूद केलेले त्यांचे अधिकार आणि दायित्वे ट्रान्सफर किंवा नियुक्त करू शकते.

(ङ) तुमच्या सुविधेसाठी, प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेस संबंधित नेहमीचे प्रश्न किंवा शंकांविषयी सामान्य माहिती प्रदान करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर नेहमी विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) प्रदान केले जातात; तथापि, गोंधळ / डिस्कनेक्ट / विवादाच्या बाबतीत, विशिष्ट प्रॉडक्ट / सर्व्हिसेस अटी लागू होतील.

## 29. बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्ममध्ये सुधारणा आणि अपडेट्स

(क) बीएफएल कोणत्याही वेळी आणि कोणत्याही कारणास्तव बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म ॲप्लिकेशन्समध्ये बदल करण्याचा, किंवा अपडेट करण्याचा आणि/किंवा त्यांच्या बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस साठी शुल्क आकारण्याचा अधिकार राखून ठेवते. जर तुम्हाला बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वापरणे सुरू ठेवायचे असेल तर तुम्हाला अपडेट्स डाउनलोड करणे आवश्यक आहे. तथापि, बीएफएल बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या निरंतर उपलब्धतेबाबत आणि / किंवा ते नेहमीच बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म अपडेट करेल आणि ते तुमच्याशी संबंधित असेल / तुम्ही त्याचा ॲक्सेस करू शकाल किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मचे अपडेटेड व्हर्जन तुमच्या मोबाईल डिव्हाईस / कॉम्प्युटर / इलेक्ट्रॉनिक ऑपरेटिंग सिस्टीम्स सह सुसंगत असेल याचे कोणत्याही प्रकारे वचन / हमी देत नाही.

(ख) बीएफएल कडे त्यांच्या विवेकबुद्धीनुसार बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर अपडेटेड व्हर्जन पोस्ट करून कोणत्याही वेळी या अटी बदलण्याचा किंवा सुधारित करण्याचा अधिकार राखीव आहे. या अटींचे अपडेटेड व्हर्जन अटींच्या मागील व्हर्जनची जागा घेईल आणि बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर पोस्ट केल्यानंतर त्वरित प्रभावी असेल आणि तुमच्यावर बंधनकारक असेल.

## 30. तक्रार

### बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस संबंधी तक्रार

(क) जर तुम्हाला बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस विषयी काही समस्या असेल तर कृपया संपर्क साधा:

| | |
|---|---|
| लेव्हल 1 | आम्ही तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत, तुमची विनंती करण्यासाठी तुम्हाला खालील स्टेप्सचे अनुसरण करणे आवश्यक आहे:<br><br>क. बजाज फिनसर्व्ह ॲप / बजाज फिनसर्व्ह वेबसाईट > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > विनंती करा<br>ख. बजाज फिनसर्व्ह ॲप / बजाज फिनसर्व्ह वेबसाईट > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > 'विनंती करा' बाबतचा तपशील > विनंती पुन्हा उघडा, जर प्रतिसादाबाबत समाधानी नसल्यास, तसेच कस्टमरला जर एस्कलेट करायचे असेल तर पर्याय उपलब्ध आहे |
| लेव्हल 2 | आम्ही 7 कामकाजाच्या दिवसांमध्ये तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. जर तुम्ही यावेळी आमचे ऐकले नाही किंवा तुमच्या शंकेच्या आमच्या निराकरणाबाबत तुम्ही समाधानी नसाल तर कस्टमर खालील स्टेप्सचे अनुसरण करू शकतो:<br><br>बजाज फिनसर्व्ह ॲप / बजाज फिनसर्व्ह वेबसाईट > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > 'विनंती करा' बाबतचा तपशील > विनंती पुन्हा उघडा, जर प्रतिसादाबाबत समाधानी नसल्यास, तसेच कस्टमरला जर एस्कलेट करायचे असेल तर पर्याय उपलब्ध आहे.<br><br>तुम्ही आम्हाला grievanceredressalteam@bajajfinserv.in वर देखील लिहू शकता |
| लेव्हल 3 | जर कस्टमर लेव्हल 2 वर प्रदान केलेल्या निराकरणाबाबत समाधानी नसेल, तर कस्टमर निर्धारित प्रदेशानुसार त्याची/तिची तक्रार/शंका नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकाऱ्याकडे पोस्ट करू शकतो/शकते.<br><br>तुम्ही https://www.bajajfinserv.in/finance-corporate-ombudsman वरून नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकारी तपशील मिळवू शकता. |
| लेव्हल 4 | जर कस्टमर प्रदान केलेल्या निवारणाबाबत समाधानी नसेल किंवा बीएफएल कडे तक्रार दाखल केल्यानंतर 30 (तीस) दिवसांच्या आत बीएफएल कडून प्रतिसाद प्राप्त झाला नसेल तर कस्टमर तक्रार निवारणासाठी कम्प्लेंट मॅनेजमेंट सिस्टीम (सीएमएस पोर्टल) द्वारे किंवा ईमेलद्वारे किंवा आरबीआय येथे सेट-अप केलेल्या कंझ्युमर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन सेल (सीईपीसी) येथे प्रत्यक्ष स्वरूपात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे तक्रार दाखल करू शकतो. |

| | |
|---|---|
| | स्कीम तपशील येथे उपलब्ध आहेत: https://www.rbi.org.in/Scripts/BS_PressReleaseDisplay.aspx?prid=52549 |

**बजाज पे यूपीआय सर्व्हिसेस संबंधी तक्रार:**

**विवाद आणि तक्रार**

बजाज फायनान्स लिमिटेड (**"बीएफएल"**) चा प्रायोजक पीएसपी बँक मुख्यतः Axis bank आणि Yes Bank आणि एनपीसीआय सह त्रिपक्षीय करार आहे आणि आमच्या यूपीआय ॲप्लिकेशनवर ऑनबोर्ड केलेल्या कस्टमर्सच्या तक्रारी/ तक्रारींचे निराकरण सुलभ करण्यासाठी आम्ही बांधील आहोत.

प्रत्येक कस्टमर बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर यूपीआय ट्रान्झॅक्शन संबंधी तक्रार करू शकतो. तुम्ही संबंधित यूपीआय ट्रान्झॅक्शन निवडू शकता आणि त्यासंबंधी तक्रार करू शकता.

| | |
|---|---|
| लेव्हल 1 | आम्ही तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत, जर बजाज पे यूपीआय ट्रान्झॅक्शन बजाज फिनसर्व्ह ॲपमार्फत केले असेल तर तुम्हाला तुमची विनंती पाठवण्यासाठी खालील स्टेप्सचे अनुसरण करणे आवश्यक आहे:<br>क. बजाज फिनसर्व्ह ॲप > पासबुक > ट्रान्झॅक्शन > स्थिती तपासा > तक्रार करा<br>ख. बजाज फिनसर्व्ह ॲप > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > विनंती करा<br>कोणत्याही शंकांसाठी तुम्ही टोल-फ्री नंबर 1800 2100 270 वर देखील संपर्क साधू शकता |
| लेव्हल 2 | आम्ही 7 कामकाजाच्या दिवसांमध्ये तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. जर शंका पुढील विवाद टप्प्यांसाठी पात्र ठरल्यास, एनपीसीआय गाईडलाईन्स नुसार निराकरणास वेळ लागू शकतो.<br>जर तुम्हाला या वेळेत आमच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही किंवा तुमच्या शंकेच्या आमच्या निराकरणाबाबत तुम्ही समाधानी नसाल तर कस्टमर खालील स्टेप्सचे अनुसरण करू शकतो:<br>बजाज फिनसर्व्ह ॲप > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > 'विनंती करा' बाबतचा तपशील > प्रतिसादाबाबत समाधानी नसल्यास विनंती पुन्हा उघडा, तसेच कस्टमरला एस्कलेट करायचे असल्यास पर्याय उपलब्ध आहे. |

| | |
|---|---|
| | कस्टमर grievanceredressalteam@bajajfinserv.in वर देखील लिहू शकतात |
| लेव्हल 3 | जर कस्टमर लेव्हल 2 वर प्रदान केलेल्या निराकरणाबाबत समाधानी नसेल तर कस्टमर निर्धारित प्रदेशानुसार त्याची/तिची तक्रार/शंका नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकाऱ्याकडे पोस्ट करू शकतात.<br><br>तुम्ही https://www.bajajfinserv.in/finance-corporate-ombudsman वरून नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकारी तपशील मिळवू शकता |
| लेव्हल 4 | जर कस्टमर प्रदान केलेल्या निवारणाबाबत समाधानी नसेल किंवा बीएफएल कडे तक्रार दाखल केल्यानंतर 30 (तीस) दिवसांच्या आत बीएफएल कडून प्रतिसाद प्राप्त झाला नसेल तर कस्टमर तक्रार निवारणासाठी सीएमएस पोर्टलद्वारे किंवा ईमेलद्वारे किंवा आरबीआय येथे सेट-अप केलेल्या सीईपीसी येथे प्रत्यक्ष स्वरूपात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे तक्रार दाखल करू शकतो.<br><br>स्कीम तपशील येथे उपलब्ध आहेत:<br>https://www.rbi.org.in/Scripts/BS_PressReleaseDisplay.aspx?prid=52549 |
| | **नोंद:** अयशस्वी ट्रान्झॅक्शनच्या बाबतीत, जेथे कस्टमर जारीकर्ता बँकशी संपर्क साधतो आणि अशा ट्रान्झॅक्शनसाठी जारीकर्ता बँकद्वारे चार्जबॅक विनंती केली जाते, तेव्हाच ट्रान्झॅक्शनचा रिफंड/रिव्हर्सल अशा चार्जबॅक विनंती बंद झाल्यानंतरच पूर्ण केला जाईल. चार्जबॅक टर्न अराउंड टाइम (टीएटी) एनपीसीआय द्वारे जारी केलेल्या लागू गाईडलाईन्स नुसार असेल. अयशस्वी यूपीआय ट्रान्झॅक्शनच्या रिफंड/रिव्हर्सलवर ऑटोमॅटिकरित्या प्रक्रिया केली जाते याची कस्टमर नोंद घेतो. |

**बीबीपीएस आणि बिल पेमेंट सर्व्हिसेस संबंधी तक्रार:**

| | |
|---|---|
| लेव्हल 1 | आम्ही तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत, जर बजाज पे यूपीआय ट्रान्झॅक्शन बजाज फिनसर्व्ह ॲपमार्फत केले असेल तर तुम्हाला तुमची विनंती पाठवण्यासाठी खालील स्टेप्सचे अनुसरण करणे आवश्यक आहे:<br><br>क. बजाज फिनसर्व्ह ॲप > पासबुक > ट्रान्झॅक्शन > स्थिती तपासा > तक्रार करा<br><br>ख. बजाज फिनसर्व्ह ॲप > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > विनंती करा |

| | |
|---|---|
| | कोणत्याही शंकांसाठी तुम्ही टोल-फ्री नंबर 1800 2100 270 वर देखील संपर्क साधू शकता |
| लेव्हल 2 | आम्ही 7 कामकाजाच्या दिवसांमध्ये तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. जर शंका पुढील विवाद टप्प्यांसाठी पात्र ठरल्यास, एनपीसीआय गाईडलाईन्स नुसार निराकरणास वेळ लागू शकतो.<br><br>जर तुम्हाला या वेळेत आमच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही किंवा तुमच्या शंकेच्या आमच्या निराकरणाबाबत तुम्ही समाधानी नसाल तर कस्टमर खालील स्टेप्सचे अनुसरण करू शकतो:<br><br>बजाज फिनसर्व्ह ॲप > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > 'विनंती करा' बाबतचा तपशील > प्रतिसादाबाबत समाधानी नसल्यास विनंती पुन्हा उघडा, तसेच कस्टमरला एस्कलेट करायचे असल्यास पर्याय उपलब्ध आहे.<br><br>कस्टमर grievanceredressalteam@bajajfinserv.in वर देखील लिहू शकतात |
| लेव्हल 3 | जर कस्टमर लेव्हल 2 वर प्रदान केलेल्या निराकरणाबाबत समाधानी नसेल, तर कस्टमर निर्धारित प्रदेशानुसार त्याची/तिची तक्रार/शंका नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकाऱ्याकडे पोस्ट करू शकतो/शकते.<br><br>तुम्ही https://www.bajajfinserv.in/finance-corporate-ombudsman वरून नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकारी तपशील मिळवू शकता |
| लेव्हल 4 | जर कस्टमर प्रदान केलेल्या निवारणाबाबत समाधानी नसेल किंवा बीएफएल कडे तक्रार दाखल केल्यानंतर 30 (तीस) दिवसांच्या आत बीएफएल कडून प्रतिसाद प्राप्त झाला नसेल तर कस्टमर तक्रार निवारणासाठी सीएमएस पोर्टलद्वारे किंवा ईमेलद्वारे किंवा आरबीआय येथे सेट-अप केलेल्या सीईपीसी येथे प्रत्यक्ष स्वरूपात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे तक्रार दाखल करू शकतो.<br><br>स्कीम तपशील येथे उपलब्ध आहेत: https://www.rbi.org.in/Scripts/BS_PressReleaseDisplay.aspx?prid=52549 |

**बजाज पे फास्टॅग सर्व्हिसेस संबंधी तक्रार:**

जर तुम्हाला बजाज पे फास्टॅग सर्व्हिसेस विषयी काही समस्या असेल तर कृपया संपर्क साधा:

| | |
|---|---|
| लेव्हल 1 | आम्ही तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत, तुमची विनंती करण्यासाठी तुम्हाला खालील स्टेप्सचे अनुसरण करणे आवश्यक आहे:<br>ग. बजाज फिनसर्व्ह ॲप / बजाज फिनसर्व्ह वेबसाईट > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > विनंती करा<br>घ. बजाज फिनसर्व्ह ॲप / बजाज फिनसर्व्ह वेबसाईट > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > 'विनंती करा' बाबतचा तपशील > जर प्रतिसादाबाबत समाधानी नसेल तर विनंती पुन्हा उघडा, तसेच कस्टमरला एस्कलेट करायचे असल्यास टोल-फ्री नंबर 1800 2100 260 वर संपर्क साधण्याचा पर्याय उपलब्ध आहे |
| लेव्हल 2 | आम्ही 7 कामकाजाच्या दिवसांमध्ये तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. जर शंका पुढील विवाद टप्प्यांसाठी पात्र ठरल्यास, एनपीसीआय गाईडलाईन्स नुसार निराकरणास वेळ लागू शकतो.<br>जर तुम्ही यावेळी आमचे ऐकले नाही किंवा तुमच्या शंकेच्या आमच्या निराकरणाबाबत तुम्ही समाधानी नसाल तर कस्टमर खालील स्टेप्सचे अनुसरण करू शकतो:<br>बजाज फिनसर्व्ह ॲप / बजाज फिनसर्व्ह वेबसाईट > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > 'विनंती करा' बाबतचा तपशील > विनंती पुन्हा उघडा, जर प्रतिसादाबाबत समाधानी नसल्यास, तसेच कस्टमरला जर एस्कलेट करायचे असेल तर पर्याय उपलब्ध आहे.<br>तुम्ही आम्हाला grievanceredressalteam@bajajfinserv.in वर देखील लिहू शकता |
| लेव्हल 3 | जर कस्टमर लेव्हल 2 वर प्रदान केलेल्या निराकरणाबाबत समाधानी नसेल, तर कस्टमर निर्धारित प्रदेशानुसार त्याची/तिची तक्रार/शंका नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकाऱ्याकडे पोस्ट करू शकतो/शकते.<br>तुम्ही https://www.bajajfinserv.in/finance-corporate-ombudsman वरून नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकारी तपशील मिळवू शकता. |

**थर्ड पार्टी इन्श्युरन्स प्रॉडक्ट्ससाठी तक्रार:**

| | |
|---|---|
| लेव्हल 1 | बजाज फायनान्स लि. मार्फत खरेदी केलेल्या इन्श्युरन्स कव्हरसाठी तुमच्या सर्व तक्रारी किंवा सर्व्हिसिंग संबंधित पैलूंसाठी, कृपया तुमची विनंती https://bfin.in/contactus_new.aspx वर सबमिट करा |
| लेव्हल 2 | जर तुम्हाला 14 दिवसांमध्ये समाधानकारक प्रतिसाद प्राप्त झाला नाही किंवा जर तुम्ही निराकरणाबाबत समाधानी नसाल, तर कृपया grievanceredressalteam@bajajfinserv.in वर लिहा |
| लेव्हल 3 | जर तुमच्या तक्रार/समस्येचे अद्याप निराकरण झालेले नसेल तर तुम्ही निवारणासाठी थेट इन्श्युरन्स लोकआयुक्त पर्यंत पोहोचू शकता. तुमचे नजीकचे लोकआयुक्त ऑफिस शोधा @ https://www.policyholder.gov.in/addresses_of_ombudsmen.aspx. |
| लेव्हल 4 | जर तुम्ही अद्याप दिलेल्या निर्णय/निराकरणाबाबत समाधानी नसाल तर तुम्ही इन्श्युरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथोरिटी ऑफ इंडिया कडे त्यांच्या वेबसाईट www.irdai.gov.in द्वारे संपर्क साधू शकता |

**म्युच्युअल फंडच्या वितरणाच्या तक्रारी:**

| | |
|---|---|
| लेव्हल 1 | आम्ही तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत; तुमची विनंती करण्यासाठी तुम्हाला खालील स्टेप्सचे अनुसरण करणे आवश्यक आहे.<br>क) बजाज फिनसर्व्ह ॲप / बजाज फिनसर्व्ह वेबसाईट > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > विनंती करा > नवीन विनंती > अन्य > शंका प्रकार - म्युच्युअल फंड > उप शंका प्रकार, विनंती केलेले तपशील भरा आणि सबमिट करा<br>ख) बजाज फिनसर्व्ह ॲप / बजाज फिनसर्व्ह वेबसाईट > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > सर्व उपस्थित विनंती पाहण्यासाठी येथे क्लिक करा > म्युच्युअल फंड > पुढे सुरू ठेवा, तुम्ही ओपन टॅब अंतर्गत तुमची विनंती पाहू शकता. |
| लेव्हल 2 | जर तुम्ही निराकरणाबाबत समाधानी नसाल तर कृपया grievanceredressalteam@bajajfinserv.in वर लिहा |

## 31. शासित कायदा आणि अधिकारक्षेत्र

बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मार्फत बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेसशी संबंधित सर्व ट्रान्झॅक्शन आणि येथे नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण संबंध भारतीय कायद्यांद्वारे नियंत्रित केले जातील. तुम्ही सहमत आहात की आमच्याकडे असलेले सर्व क्लेम्स, मतभेद आणि विवाद महाराष्ट्रातील पुणेमध्ये स्थित सक्षम न्यायालयांच्या विशेष अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील.

## 32. रिवॉर्ड्स प्रोग्राम स्कीम

तुम्ही बीएफएल रिवॉर्ड स्कीम अंतर्गत विविध रिवॉर्डसाठी ट्रान्झॅक्शन पूर्ण झाल्यानंतर आणि ठराविक पूर्व-निर्धारित इव्हेंट पूर्ण केल्यानंतर कॅशबॅक, बीएफएल रिवॉर्ड पॉईंट्स, प्रमोशनल पॉईंट्स आणि व्हाउचर्स मिळविण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या वापरायच्या अटी **परिशिष्ट II** च्या तपशीलवार क्लॉज (I) नुसार पात्र असाल. बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार रिवॉर्ड प्रोग्राम स्कीमचे निकष, पात्रता आणि लाभ बदलू शकतात आणि/ किंवा सुधारू शकतात आणि प्रत्येक रिवॉर्ड प्रोग्राम स्कीमची विशिष्ट वेळेसाठी वैधता देखील असेल.

## परिशिष्ट – I

## बजाज फिनसर्व्ह पेमेंट सर्व्हिसेस:

## क. बजाज पे वॉलेट अटी व शर्ती

उपरोक्त दिलेल्या वापरायच्या अटी व्यतिरिक्त या अटी व शर्ती प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स (वॉलेट) किंवा अशा इतर सर्व्हिसेसच्या वापराचे नियमन करतात ज्या **"बजाज पे वॉलेट"** या ब्रँड नावाखाली वेळोवेळी जोडल्या जाऊ शकतात. " (**"बजाज पे वॉलेट"** किंवा **"वॉलेट"** म्हणून संदर्भित) बजाज फायनान्स लिमिटेड (बीएफएल) द्वारे ऑफर केले जाते. बीएफएलला या संदर्भात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (**"आरबीआय"**) पेमेंट अँड सेटलमेंट सिस्टीम्स ॲक्ट, 2007 च्या तरतुदींनुसार आणि आरबीआयने वेळोवेळी जारी केलेल्या रेग्युलेशन्स आणि निर्देशांनुसार अधिकृत केले आहे. बजाज पे वॉलेट वापरण्याची प्रक्रिया करण्याद्वारे तुम्ही वर नमूद केलेल्या वापरायच्या अटींना सहमती देण्याव्यतिरिक्त या अटींशी (येथे **"वॉलेट अटी व शर्ती"**) बांधील राहण्यास सहमती देत आहात.

बजाज पे वॉलेट वापरणे सुरू ठेवण्याद्वारे, तुम्ही याद्वारे मास्टर डायरेक्शन-नो युवर कस्टमर (केवायसी) डायरेक्शन, 2016 मध्ये आरबीआय द्वारे परिभाषित केल्याप्रमाणे पॉलिटिकली एक्सपोज्ड पर्सन ("**पीईपी**") नसल्याचे प्रतिनिधित्व करता. तथापि, लागू कायदे आणि बीएफएल इंटर्नल पॉलिसी/फ्रेमवर्क नुसार योग्य पावले उचलण्याची खात्री करण्यासाठी बीएफएलला त्वरित सूचित करून या संदर्भातील तुमची स्थिती पीईपी म्हणून बदलली आहे यासंदर्भात तुम्ही बीएफएलला त्वरित सूचित करण्यास सहमती देता आणि खात्री देता. तुम्हाला पुढे माहिती आहे की पीईपी म्हणून, तुम्ही आरबीआय द्वारे निर्धारित अतिरिक्त योग्य परिश्रम आवश्यकतांच्या अधीन असाल तसेच बजाज पे वॉलेट आणि बीएफएलद्वारे प्रदान केलेल्या इतर प्रॉडक्ट्स/सर्व्हिसेसचा अखंडित वापर सुनिश्चित करण्यासाठी ट्रान्झॅक्शन देखरेख आणि अहवाल आवश्यकतांच्या अधीन असाल.

केवळ बजाज पे वॉलेटचा वापर करून तुम्ही बीएफएलसोबत करार करणार आहात आणि येथे संदर्भित सर्व पॉलिसीसह या वॉलेटच्या अटी व शर्ती तुमच्यावर बंधनकारक असतील.

जेव्हा तुम्ही बजाज फिनसर्व्ह ॲपमार्फत किंवा कोणत्याही मर्चंटकडे बजाज पे वॉलेट वापरून ट्रान्झॅक्शन करता, तेव्हा वापरायच्या अटी व्यतिरिक्त या वॉलेटच्या अटी व शर्ती तुम्हाला लागू होतील. बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार तुम्हाला कोणत्याही पूर्व लिखित सूचनेशिवाय कोणत्याही वेळी या अटी मधील भाग बदलण्याचा, सुधारण्याचा, जोडण्याचा किंवा काढून टाकण्याचा अधिकार राखून ठेवते. कोणत्याही अपडेट / बदलांसाठी या अटी नियमितपणे रिव्ह्यू करणे ही तुमची जबाबदारी आहे. जर तुम्ही वर दिलेल्या या वॉलेटच्या अटी व शर्ती आणि वापरायच्या अटी यांचे पालन करत असाल तर बीएफएल तुम्हाला बजाज पे वॉलेट आणि बजाज पे वॉलेटद्वारे वेळोवेळी ऑफर केल्या जाणाऱ्या इतर सर्व्हिसेसचा वापर करण्यासाठी वैयक्तिक, नॉन-एक्सक्लूसिव्ह, नॉन-ट्रान्सफरेबल, मर्यादित विशेषाधिकार देण्यास सहमत आहे.

**(क) व्याख्या:**

अन्यथा सूचित केल्याशिवाय, खाली सूचीबद्ध कॅपिटल संज्ञाचे खालील अर्थ असतील:

**"बजाज पे वॉलेट"** किंवा **"वॉलेट"** म्हणजे वेळोवेळी कस्टमरला प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स वरील आरबीआय मास्टर डायरेक्शन नुसार बीएफएल द्वारे एकतर स्मॉल वॉलेट किंवा फूल केवायसी वॉलेट म्हणून जारी प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स (वॉलेट) होय.

**"बजाज पे सब वॉलेट"** किंवा **"सब वॉलेट"** म्हणजे बीएफएल रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम (वापरायच्या अटीचा क्लॉज 32 चा संदर्भ) अंतर्गत सर्व कॅशबॅक, बजाज कॉईन्स, प्रोमो पॉईंट्स आणि व्हाउचर्स इ. क्रेडिट, मॅनेज व वापरण्यासाठी बजाज पे वॉलेट धारकाला बीएफएल द्वारे जारी दुय्यम ई-वॉलेट होय. बजाज पे सब वॉलेट हे बजाज पे वॉलेटचा भाग असेल. बजाज पे वॉलेट आणि बजाज पे सब वॉलेटची एकत्रित मर्यादा आरबीआयने त्यांच्या गाईडलाईन्स मध्ये वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे कमाल आर्थिक मर्यादेनुसार नियंत्रित केली जाईल आणि त्यानुसार असेल.

**"बजाज पे वॉलेट यूपीआय ॲड्रेस"** किंवा **"बजाज पे वॉलेट व्हीपीए"** म्हणजे यूपीआय मार्फत पीपीआय इंटरऑपरेबिलिटी सक्षम करण्यासाठी बजाज पे वॉलेटशी संबंधित व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस होय.

**"शुल्क"** किंवा **"सर्व्हिस शुल्क"** म्हणजे बजाज पे वॉलेट सर्व्हिसेसचा लाभ घेण्यासाठी बीएफएल कस्टमरवर आकारते ती रक्कम.

**"कस्टमर"** म्हणजे एक व्यक्ती ज्याने बजाज पे वॉलेट / सब वॉलेट सर्व्हिसेसचा लाभ घेण्यासाठी बजाज फिनसर्व्ह ॲप वर रजिस्टर केले आहे आणि बीएफएल व त्यांचे सहयोगी यांच्याद्वारे ऑफर केलेल्या सर्व्हिसेसला सपोर्ट करणाऱ्या इंटरनेट सुसंगत डिव्हाईसच्या मालकी, ऑपरेटिंग व ॲक्सेस द्वारे वापरायच्या अटींसह सर्व लागू अटी व शर्ती स्वीकारल्या आहेत.

**"फूल केवायसी वॉलेट"** म्हणजे वेळोवेळी झालेल्या सुधारणेनुसार खालील क्लॉज (घ) येथे सविस्तर वर्णन केल्यानुसार ऑगस्ट 27, 2021 ला जारी प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स वरील आरबीआय मास्टर

डायरेक्शन च्या पॅरा 9.2 फूल केवायसी वॉलेट नुसार पूर्णपणे केवायसी अनुरुप बीएफएल द्वारे जारी कस्टमरचे वॉलेट होय.

**"मर्चंट"** म्हणजे फिजिकल मर्चंट, ऑनलाईन मर्चंट आणि बीएफएलद्वारे अधिकृत केलेले इतर कोणतेही आऊटलेट जे बजाज पे वॉलेट वापरून पेमेंट स्वीकारतील.

**"पर्सन-टू-बँक ट्रान्सफर"** म्हणजे कस्टमरच्या बजाज पे वॉलेटमधून कोणत्याही बँक अकाउंटमध्ये फंड ट्रान्सफर करण्याची सुविधा होय.

**"पर्सन-टू-मर्चंट ट्रान्सफर"** म्हणजे वस्तू आणि सर्व्हिसेसच्या खरेदीसाठी बजाज पे वॉलेट पेमेंट्स स्वीकारण्यासाठी आवश्यक व्यवस्था असलेल्या कोणत्याही मर्चंटकडे कस्टमरच्या बजाज पे वॉलेटमधून फंड ट्रान्सफर करण्याची सुविधा होय.

**"पर्सन-टू-पर्सन ट्रान्सफर"** म्हणजे कस्टमरच्या बजाज पे वॉलेटमधून बीएफएल किंवा इतर कोणत्याही थर्ड पार्टीद्वारे जारी केलेल्या इतर कोणत्याही प्रीपेड इन्स्ट्रुमेंट मध्ये फंड ट्रान्सफर करण्याची सुविधा होय.

**"आरबीआय"** म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया.

**"ट्रान्झॅक्शन"** मध्ये खालील ट्रान्झॅक्शन पर्सन-टू-पर्सन ट्रान्सफर किंवा पर्सन-टू-मर्चंट ट्रान्सफर किंवा पर्सन-टू-बँक ट्रान्सफर किंवा आरबीआय द्वारे वेळोवेळी अनुमती असलेल्या ट्रान्सफरच्या पद्धतीचा समावेश असेल.

**"वॉलेट रु. 10,000/- पर्यंत** (कॅश लोडिंग सुविधेसह)" म्हणजे जारी प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स वरील आरबीआय मास्टर डायरेक्शन च्या पॅरा 9.1 सब पॅरा (i) नुसार जारी कस्टमरचे वॉलेट होय आणि त्याद्वारे कस्टमरचे किमान तपशील जसे की कस्टमरचे नाव, वन टाइम पिन (ओटीपी) सह पडताळलेला मोबाईल नंबर आणि नावाची स्व-घोषणा आणि कोणत्याही 'अनिवार्य डॉक्युमेंट' ची युनिक ओळख/ओळख नंबर किंवा **'अधिकृत वैध डॉक्युमेंट'** (ओव्हीडी) किंवा वेळोवेळी झालेल्या सुधारणेनुसार केवायसी वरील मास्टर डायरेक्शन मधील या हेतूकरिता सूचीबद्ध कोणत्याही नावासह असे कोणतेही अन्य डॉक्युमेंट स्वीकारणे होय.

**"वॉलेट रु. 10,000/- पर्यंत (कॅश लोडिंग सुविधेशिवाय)"** म्हणजे प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स वरील आरबीआय मास्टर डायरेक्शन च्या पॅरा 9.1 सब पॅरा (ii) नुसार जारी कस्टमरचे वॉलेट होय आणि त्याद्वारे कस्टमरचे किमान तपशील जसे की कस्टमरचे नाव, वन टाइम पिन (ओटीपी) सह पडताळलेला मोबाईल नंबर आणि नावाची स्व-घोषणा आणि कोणत्याही 'अनिवार्य डॉक्युमेंट' ची युनिक ओळख/ओळख नंबर किंवा **'अधिकृत वैध डॉक्युमेंट'** (ओव्हीडी) किंवा वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार केवायसी वरील मास्टर डायरेक्शन मधील सूचीबद्ध कोणत्याही नावासह असे कोणतेही अन्य डॉक्युमेंट स्वीकारणे होय.

**(ख) पात्रता**

1.बजाज पे वॉलेट केवळ 18 वर्ष व त्यापेक्षा अधिक वय असलेल्या निवासी भारतीयांसाठीच उपलब्ध आहे आणि लागू कायद्यानुसार करार करण्यास सक्षम आहे.

2.वॉलेट सर्व्हिसेस 18 वर्षाखालील व्यक्तींसाठी किंवा वॉलेट सर्व्हिसेसचा लाभ घेण्यापासून बीएफएल द्वारे यापूर्वी निलंबित किंवा काढून टाकलेल्या कोणत्याही व्यक्तीसाठी उपलब्ध नाहीत.

3.कस्टमर याद्वारे प्रतिनिधित्व करतो आणि हमी देतो की:

(क) वॉलेट सर्व्हिसेसचा लाभ घेण्याद्वारे आणि/किंवा वेळोवेळी बीएफएलने सूचित केल्याप्रमाणे येथे असलेल्या सर्व अटींचे पालन करून बीएफएलसोबत या व्यवस्थेत एन्टर करण्यासाठी कस्टमरकडे कायदेशीर आणि/किंवा योग्य क्षमता आहे.

(ख) कस्टमरला वॉलेट सर्व्हिसेसचा लाभ घेण्यापासून किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म सर्व्हिसेस वापरण्यापासून यापूर्वी बीएफएल द्वारे निलंबित किंवा काढून टाकले नाही किंवा इतर कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरविले नाही.

(ग) कस्टमरने कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेची खोटी बतावणी करू नये किंवा त्याची ओळख, वय किंवा कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेशी संबंधित असल्याची खोटी माहिती किंवा त्याचा विपर्यास करू नये. या वॉलेटच्या अटींचे उल्लंघन झाल्यास, कस्टमरला निलंबित करण्याचा किंवा वॉलेट सर्व्हिसेस प्राप्त करण्यापासून किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म सर्व्हिसेसचा वापर करण्यापासून कायमस्वरुपी प्रतिबंधित करण्याचा अधिकार बीएफएल राखून ठेवते.

(घ) कस्टमर बीएफएल सह एकावेळी केवळ एकच वॉलेट राखण्यास पात्र आहे. जर कस्टमरने यापूर्वीच बीएफएलकडून वॉलेट सर्व्हिस प्राप्त केली असेल तर त्याने/तिने या संदर्भात बीएफएलला रिपोर्ट करावे. कस्टमर याद्वारे सहमत आहे आणि समजतो की जर ते बीएफएलचे लक्ष आणि/किंवा ज्ञान आणि/किंवा कस्टमरचे कम्युनिकेशन प्राप्त झाल्यावर कस्टमरला सूचनेसह कोणतेही वॉलेट बंद करण्याचा अधिकार आणि एकमेव विवेकबुद्धी बीएफएल राखून ठेवते. कस्टमर बीएफएलसह वॉलेट सुरू ठेवण्यासाठी बीएफएलला आवश्यक असलेली सर्व औपचारिकता पूर्ण करण्याचे वचन देतो.

## (ग) डॉक्युमेंटेशन

1.कस्टमरला मान्य आणि सहमत आहे की योग्य आणि अपडेटेड कस्टमर माहितीचे संकलन, पडताळणी, लेखापरीक्षण आणि मेंटेनन्स ही बीएफएलच्या बाजूने निरंतर प्रोसेस आहे आणि सर्व संबंधित आणि लागू केवायसी आवश्यकतांचे अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याचा अधिकार बीएफएल कोणत्याही वेळी राखून ठेवते. कस्टमरने प्रदान केलेल्या माहितीमध्ये आणि/किंवा कस्टमरने प्रदान केलेल्या डॉक्युमेंटेशनमध्ये विसंगती असल्यास कोणत्याही वेळी बजाज पे वॉलेट सर्व्हिसेस खंडीत करण्याचा किंवा बजाज पे वॉलेट जारी करण्यासाठी ॲप्लिकेशन्स नाकारण्याचा अधिकार बीएफएलकडे राखीव आहे.

2.कस्टमर सहमत आहे की बजाज पे वॉलेट सर्व्हिसेसचा लाभ घेण्याच्या आणि/किंवा वापरण्याच्या उद्देशाने बीएफएलला कस्टमरद्वारे प्रदान केलेली कोणतीही माहिती बीएफएलसोबत निहित असेल आणि वापरायच्या अटी/वॉलेटच्या अटी व शर्तींच्या अंतर्गत निर्धारित उद्देशांव्यतिरिक्त आणि/किंवा कोणत्याही लागू कायदा किंवा रेग्युलेशन नुसार विसंगत नसल्यास अशा कोणत्याही हेतूंसाठी बीएफएलद्वारे त्यांच्या विवेकबुद्धीनुसार वापरली जाऊ शकते.

**(घ) बजाज पे वॉलेटच्या प्रकारांशी संबंधित अटी**

1. प्रचलित रेग्युलेशन्सच्या अधीन, कस्टमर खालील गोष्टींचा लाभ घेऊ शकतात:

(क) स्मॉल वॉलेट
i. वॉलेट रु. 10,000/- पर्यंत (कॅश लोडिंग सुविधेशिवाय)
(ख) फूल केवायसी वॉलेट

**वॉलेट रु. 10,000/- पर्यंत (कॅश लोडिंग सुविधेशिवाय):** कस्टमर याद्वारे सहमत आहे आणि कन्फर्म करतो की अशा वॉलेटच्या मेंटेनन्स आणि ऑपरेशन्स वर लागू असलेल्या खालील अटी व शर्तींचे पालन केले जाईल व त्या पूर्ण केल्या जातील.

(क) असे वॉलेट पुन्हा लोड करण्यायोग्य असतील आणि कार्ड किंवा इलेक्ट्रॉनिक फॉर्म मध्ये जारी केले जातील. लोडिंग/ रि-लोडिंग केवळ बँक अकाउंट आणि / किंवा क्रेडिट कार्ड / फूल-केवायसी पीपीआय मधून असेल.
(ख) कोणत्याही महिन्यात अशा वॉलेटमध्ये लोड केलेली रक्कम रु. 10,000 पेक्षा जास्त नसावी आणि फायनान्शियल वर्षादरम्यान लोड केलेली एकूण रक्कम रु. 1,20,000 पेक्षा अधिक नसावी.
(ग) अशा वॉलेटमध्ये कोणत्याही वेळी थकित रक्कम रु. 10,000 /- पेक्षा अधिक नसावी.
(घ) हे वॉलेट केवळ पर्सन-टू-मर्चंट ट्रान्सफरसाठीच वापरले जाईल.
(ङ) अशा वॉलेटमधून कॅश काढणे किंवा बँक अकाउंटमध्ये आणि बीएफएलचे इतर वॉलेट आणि/किंवा इतर कोणत्याही प्रीपेड इन्स्ट्रुमेंट जारीकर्त्यास पैशांचे ट्रान्सफर करण्यास परवानगी नाही.
(च) कस्टमर हे त्यांच्या पर्यायानुसार बजाज फिनसर्व्ह ॲपद्वारे बीएफएलला विनंती करून कोणत्याही वेळी सदर वॉलेट बंद करू शकतात आणि बंद करण्याच्या वेळी थकित बॅलन्स 'सोर्स अकाउंटकडे परत' (उक्त वॉलेट लोड केलेल्या ठिकाणी) ट्रान्सफर केला जाईल जे आवश्यक केवायसी आवश्यकता पूर्ण होण्याच्या अधीन असेल. कस्टमर याद्वारे सहमत आहे आणि समजतो की बीएफएलला वॉलेट बंद झाल्यानंतर फंड ट्रान्सफर करणे आवश्यक असलेल्या 'पेमेंट सोर्सकडे परत' संबंधित माहिती/डॉक्युमेंट्स मागवण्याचा अधिकार असेल.

**फूल केवायसी वॉलेट**

1. कस्टमरने सर्व संबंधित केवायसी डॉक्युमेंट्स सबमिट केल्यानंतर आणि बीएफएलद्वारे त्याची पडताळणी आणि मंजूर केल्यानंतर कस्टमरचे विद्यमान स्मॉल वॉलेट/केवायसी वॉलेट फूल केवायसी वॉलेटमध्ये अपग्रेड केले जाईल.

2. कस्टमर याद्वारे सहमत आहे आणि कन्फर्म करतो की अशा फूल केवायसी वॉलेटच्या मेंटेनन्स आणि ऑपरेशन्स वर लागू असलेल्या खालील अटी व शर्तींचे पालन करणे आणि पूर्ण करणे आवश्यक आहे:

क. पूर्णपणे केवायसी अनुपालन केल्यानंतरच कस्टमर्सना फूल केवायसी वॉलेट जारी केले जाईल.
ख. फूल केवायसी वॉलेट पुन्हा लोड करण्यायोग्य आणि केवळ इलेक्ट्रॉनिक फॉर्म मध्ये जारी केले जाईल.
ग. अशा फूल केवायसी वॉलेटमध्ये थकित रक्कम कोणत्याही वेळी रु. 2,00,000/- पेक्षा जास्त नसावी.

घ. कस्टमर बजाज पे वॉलेटवर 'लाभार्थी' म्हणून व्यक्ती/व्यक्तींना रजिस्टर करू शकतो (अशा लाभार्थ्यांना पर्सन-टू-पर्सन आणि बँकमध्ये ट्रान्सफर करण्याच्या उद्देशाने बीएफएलद्वारे विनंती केली जाऊ शकणारे त्यांचे बँक अकाउंट तपशील आणि असे इतर तपशील प्रदान करण्याद्वारे.
ङ. कस्टमरला त्यांची स्वत:ची परिभाषित लाभार्थी मर्यादा सेट करण्याचा अधिकार असेल.
च. अशा पूर्व-रजिस्टर्ड लाभार्थ्यांच्या बाबतीत, फंड ट्रान्सफर मर्यादा प्रति लाभार्थी दर महिना रु. 2,00,000/- पेक्षा जास्त नसावी आणि इतर सर्व प्रकरणांसाठी फंड ट्रान्सफर मर्यादा प्रति महिना रु. 10,000/- पर्यंत मर्यादित असेल.
छ. कस्टमर त्यांच्या पर्यायानुसार बजाज फिनसर्व्ह ॲपद्वारे बीएफएलला विनंती करून कोणत्याही वेळी फूल केवायसी वॉलेट बंद करू शकतो आणि बंद करण्याच्या वेळी थकित बॅलन्स कस्टमरच्या बँक अकाउंटमध्ये आणि/किंवा 'सोर्सकडे परत' (जेथे फूल केवायसी पीपीआय लोड केला होता ते पेमेंट सोर्स) यामध्ये ट्रान्सफर केला जाईल. कस्टमर याद्वारे सहमत आहे आणि समजतो की बीएफएलला फूल केवायसी वॉलेट बंद झाल्यानंतर फंड ट्रान्सफर करणे आवश्यक असलेल्या कस्टमरच्या बँक अकाउंट आणि/किंवा 'पेमेंट सोर्सकडे परत' संबंधित माहिती/डॉक्युमेंट्स मागवण्याचा अधिकार असेल
ज. कस्टमरचा मृत्यू झाल्यास, बीएफएल च्या मृत क्लेम सेटलमेंट पॉलिसीनुसार बजाज पे वॉलेटमधील बॅलन्स सेटल केला जाईल.
झ. नॉन-बँक द्वारे जारी केलेल्या वॉलेटच्या बाबतीत, सर्व चॅनेल्स (एजंट्स, एटीएम, पीओएस डिव्हाईस इ.) मध्ये प्रति पीपीआय रु. 10,000/- च्या एकूण मासिक मर्यादेच्या आत प्रति ट्रान्झॅक्शन कमाल रु. 2,000/- पर्यंत कॅश काढण्यास परवानगी; आणि

3. कस्टमर याद्वारे सहमत आहे आणि मान्य करतो की अकाउंट-आधारित संबंधासह कोणत्याही संबंधात प्रवेश करण्यापूर्वी बीएफएल आरबीआयद्वारे जारी केलेल्या निर्देशांच्या अनुरूप तुमचे कस्टमर (**"केवायसी"**) गाईडलाईन्स नुसार आवश्यक असल्याप्रमाणे योग्य तपासणी करेल. कस्टमर आवश्यक डॉक्युमेंट्स किंवा पुरावे जसे की ओळख, ॲड्रेस, फोटो आणि केवायसी, अँटी मनी लाँडरिंग (**"एएमएल"**) किंवा इतर वैधानिक/रेग्युलेटरी आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी अशी कोणतीही माहिती सबमिट करेल. पुढे, असे अकाउंट उघडल्यानंतर/अशा संबंधाची स्थापना झाल्यानंतर, विद्यमान रेग्युलेटरी गाईडलाईन्सचे अनुपालन केल्यास कस्टमर बीएफएलला आवश्यक असलेल्या नियमित अंतराने वरील डॉक्युमेंट्स पुन्हा सबमिट करण्यास सहमत आहे. लागू कायदा, रेग्युलेशन किंवा गाईडलाईन्सच्या कस्टमरद्वारे कोणत्याही उल्लंघनासाठी बीएफएल जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही.

4. कस्टमर याद्वारे घोषित करतो की त्याचे/तिचे नाव, कोणत्याही वेळी वैधानिक, रेग्युलेटरी आणि सरकारी प्राधिकरण, आरबीआय मंजूर/नकारात्मक यादी आणि फसवणूक यादीद्वारे वेळोवेळी प्रसारित केल्यानुसार दहशतवादी व्यक्ती/संस्थांच्या एकत्रित यादीमध्ये दिसत नाही.

5. कस्टमर याद्वारे बीएफएलला त्याचे/तिचे विद्यमान तपशील आणि केवायसी डॉक्युमेंट्स/डाटा केवायसी अनुपालनासाठी (जर असल्यास) वापरण्यास संमती देत आहे. अशा कस्टमर साठी आणि रजिस्टर्ड केवायसी तपशील/डॉक्युमेंट्स किंवा बँक अकाउंट तपशिलामध्ये कोणताही बदल झाल्यास अशा कस्टमरने त्याविषयी अपडेट करावे आणि वेळोवेळी बीएफएलला अपडेटेड केवायसी तपशील सबमिट करावे.

**डिजिलॉकर संमती:**

कस्टमर बीएफएलला अधिकृत वैध डॉक्युमेंट्सची (ओव्हीडी) प्रमाणित कॉपी मिळवण्यासाठी, शेअर करण्यासाठी आणि स्टोअर करण्यासाठी त्याची/तिची संमती प्रदान करतो किंवा केवायसी उद्देशासाठी एमईआयटीच्या सिक्युअर्ड क्लाउड आधारित डिजिलॉकर प्लॅटफॉर्मद्वारे जारी केलेले डॉक्युमेंट्स आणि बजाज पे वॉलेटसह बीएफएल प्रॉडक्ट्स प्राप्त करण्यासाठी ओव्हीडीच्या समतुल्य ई-डॉक्युमेंट्स प्रदान करतो.

**Protean eGov Technologies Limited द्वारे (पूर्वीचे NSDL e-Governance Infrastructure Limited) पॅन प्रमाणीकरणासाठी संमती:**

कस्टमर हे Protean eGov Technologies Limited (पूर्वीचे NSDL e-Governance Infrastructure Limited) कडून पॅन तपशील पडताळण्यासाठी/तपासण्यासाठी/प्राप्त/डाउनलोड/अपलोड/अपडेट करण्यासाठी बीएफएलला संमती प्रदान करतात.

**(ङ) सर्वसाधारण अटी व शर्ती:**

i. बजाज पे वॉलेटमधून कॅश काढण्यास अनुमती नाही. बजाज पे वॉलेटमधील कोणत्याही थकित बॅलन्सचा वापर केवळ इतर पीपीआय, बँक अकाउंट, डेबिट कार्ड इत्यादींमध्ये ट्रान्सफरसह वैध ट्रान्झॅक्शनसाठी पेमेंट करण्यासाठी करणे आवश्यक आहे.

ii. बजाज पे वॉलेटमधील बॅलन्स क्रेडिट कार्डमध्ये ट्रान्सफर केला जाऊ शकत नाही.

iii. बजाज पे वॉलेटमधील बॅलन्स क्रेडिट कार्ड बिल, लोन रिपेमेंट आणि फास्टॅग रिचार्जसाठी पेमेंटसाठी वापरता येणार नाही.

iv. बजाज पे वॉलेट ट्रान्सफरेबल नाही.

v. कोणत्याही कारणास्तव खालील बाबींसह बजाज पे वॉलेट सर्व्हिसेस कस्टमरला कोणत्याही वेळी सस्पेंड/बंद करण्याचा अधिकार बीएफएल राखून ठेवत आहे:

(क) आरबीआय द्वारे वेळोवेळी जारी केलेले नियम, रेग्युलेशन्स, ऑर्डर, निर्देश, नोटिफिकेशन किंवा या वॉलेटच्या अटी व शर्तींच्या कोणत्याही संशयास्पद उल्लंघनासाठी;
(ख) रजिस्ट्रेशन करताना किंवा अन्यथा कस्टमरद्वारे प्रदान केलेल्या विशिष्ट डॉक्युमेंटेशन किंवा रजिस्ट्रेशन तपशील मधील संशयित विसंगतीसाठी;
(ग) संभाव्य फसवणूक, तोडफोड, हेतूपूर्वक नष्ट करणे, राष्ट्रीय सुरक्षेला धोका किंवा इतर कोणत्याही अनपेक्षित घटनेच्या विरोधात लढा देणे;
(घ) जर ते तांत्रिक बिघाड, सुधारणा, अपग्रेडेशन, बदल, स्थलांतर, दुरुस्ती आणि/किंवा मेंटेनन्स कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीमुळे किंवा कोणत्याही तांत्रिक कारणांमुळे झाले असेल;
(ङ) जर स्थानिक आणि भौगोलिक बंधने/मर्यादेमुळे उद्भवलेल्या कोणत्याही प्रसारण कमतरतेमुळे ते असल्यास;

(च) जर कस्टमरच्या बजाज पे वॉलेटमध्ये रजिस्टर्ड मोबाईल नंबर कार्यरत नसेल किंवा कस्टमरच्या नियंत्रणाबाहेर असेल;
(छ) जर बीएफएलला असे वाटत असेल की, त्यांच्या वाजवी मतानुसार, इतर कोणत्याही कायदेशीर कारणासाठी निलंबन/सस्पेन्शन आवश्यक आहे
(ज) बजाज पे वॉलेटमध्ये दिसणाऱ्या उपलब्ध बॅलन्सवर बीएफएल द्वारे कोणतेही इंटरेस्ट देय केले जाणार नाही;
(झ) बजाज पे वॉलेट्स संबंधित कोणत्याही सुविधेची कार्यवाही किंवा निरंतर उपलब्धता लागू कायद्यांतर्गत कोणत्याही आवश्यकतांच्या अधीन असेल आणि भारतातील कोणत्याही रेग्युलेटरी प्राधिकरणाकडून कोणतेही नवीन रेग्युलेशन्स किंवा दिशा निर्देशाच्या अधीन असेल.
(ञ) जर एका वर्षाच्या सलग कालावधीसाठी बजाज पे वॉलेटमध्ये कोणतेही फायनान्शियल ट्रान्झॅक्शन झाले नसेल तर पूर्व नोटीस/सूचना द्वारे बीएफएल (क) रजिस्टर्ड मोबाईल नंबरद्वारे एसएमएस/नोटिफिकेशन मार्फत; किंवा (ii) रजिस्टर्ड ईमेल ॲड्रेसवर ईमेल द्वारे; किंवा (iii) कस्टमर द्वारे प्रदान केलेल्या वॉलेटवर नोटिफिकेशन द्वारे सूचित करून वॉलेट इन-ॲक्टिव्ह केले जाईल. बीएफएल द्वारे प्रमाणीकरण आणि योग्य तपासणीचा वापर केल्यानंतर आणि या संदर्भातील आवश्यक तपशील आरबीआय सोबत शेअर केल्यानंतर वॉलेट पुन्हा ॲक्टिव्हेट केले जाईल.

vi. कस्टमर सहमत आणि समजतो की बीएफएल विविध पेमेंट पद्धतींमधून बजाज पे वॉलेटमध्ये पैसे लोड करण्यावर आणि/किंवा ट्रान्झॅक्शन संबंधित पैसे ट्रान्सफर करण्यावर त्याच्या विवेकबुद्धीनुसार मर्यादा आणि/किंवा शुल्क आकारू शकते, जे लागू कायद्यानुसार मर्यादा आणि/किंवा शुल्कानुसार बदलू शकते. कस्टमर बजाज फिनसर्व्ह ॲप वर उपलब्ध एफएक्यू सेक्शन मध्ये अपडेटेड ट्रान्झॅक्शन मर्यादा पाहू शकतात. कृपया खालील स्टेप्सचे अनुसरण करा:

- होम स्क्रीनच्या वरच्या डाव्या बाजूला असलेल्या 'मुख्य मेन्यू (तीन ओळी) वर जा
- 'मदत आणि सपोर्ट' निवडा
- "तुम्हाला मदत हवी असलेली कॅटेगरी निवडा" अंतर्गत वॉलेट निवडा
- "वॉलेट सर्व्हिसेस" वर क्लिक करा:

vii. लागू कायद्यानुसार कस्टमरच्या बजाज पे वॉलेटमध्ये अयशस्वी/रिटर्न केलेल्या/नाकारलेल्या/रद्द केलेल्या ट्रान्झॅक्शनच्या बाबतीत बीएफएल सर्व रिफंड वर परिणाम करेल.

viii. कस्टमर मान्य करतो की बजाज पे वॉलेटमध्ये डेबिट सह सर्व वॉलेट ट्रान्झॅक्शनसाठी, कस्टमरला बीएफएल द्वारे स्वीकारलेल्या टू फॅक्टर ऑथेंटिकेशन (2एफए) मार्फत असे ट्रान्झॅक्शन प्रमाणित आणि अधिप्रमाणित करणे आवश्यक आहे.

ix. कस्टमर समजतो की त्याच्याकडे/तिच्याकडे ट्रान्झॅक्शन संख्येवर आणि भिन्न प्रकारच्या ट्रान्झॅक्शन/लाभार्थ्यांसाठी ट्रान्झॅक्शन मूल्यावर कॅप ठेवण्याचा पर्याय आहे आणि अतिरिक्त अधिप्रमाणन आणि प्रमाणीकरणासह कॅप बदलण्याचा हक्क आहे.

**(च) बजाज पे वॉलेट शुल्क**

i. कस्टमर वेळोवेळी बीएफएलद्वारे विहित केलेल्या सर्व्हिस शुल्काचे अशा पेमेंटसाठी विहित केलेल्या फॉर्म आणि पद्धतीमध्ये पेमेंट करेल. बीएफएलकडे कस्टमरला पूर्व सूचनेसह त्यांच्या विवेकबुद्धीनुसार सर्व्हिस शुल्कात बदल, सुधारणा, वाढ किंवा कमी करण्याचे सर्वाधिकार आहेत.

ii. कोणत्याही ट्रान्झॅक्शनसाठी पेमेंट करण्यासाठी वापरलेल्या कस्टमरच्या बजाज पे वॉलेटमधील कोणतीही वॅल्यू अशा बजाज पे वॉलेटमधून ऑटोमॅटिकरित्या डेबिट केली जाईल. बीएफएलची जबाबदारी ही केवळ बजाज पे वॉलेट डेबिट होण्यापर्यंत आणि कस्टमर कदाचित ट्रान्झॅक्शन करू शकणाऱ्या कोणत्याही मर्चंट/व्यक्तीला त्यानंतरचे पेमेंट करण्यापर्यंत मर्यादित आहे. बीएफएल कोणत्याही वस्तू आणि/किंवा सर्व्हिसेस समर्थन, प्रोत्साहन, चॅम्पियन किंवा वॉरंट देत नाही जे बजाज पे वॉलेट वापरून खरेदी/प्राप्त करण्यासाठी प्रस्तावित केले जाऊ शकतात.

iii. वर्तमान शुल्क (जे आमच्या विवेकबुद्धीनुसार भविष्यात बदलले जाऊ शकतात आणि योग्य सूचना दिल्यानंतर) तुम्ही https://www.bajajfinserv.in/all-fees-and-charges वर पाहू शकता आणि येथे शेड्यूल I अंतर्गत विशेषत: तपशीलवार दिले आहे.

iv. बीएफएल कस्टमर विनंतीनुसार प्रक्रिया केलेल्या ट्रान्झॅक्शनसाठी फंड रिकव्हर करण्यासाठी बजाज पे वॉलेटमध्ये कोणताही बॅलन्स योग्य आणि/किंवा सेट ऑफ करण्याचा अधिकार राखून ठेवते.

**(छ) वॉलेट समाप्ती आणि बॅलन्स जप्ती**

i. प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्स वरील आरबीआय मास्टर डायरेक्शनच्या अधीन, बजाज पे वॉलेटची वैधता शाश्वत आहे आणि कालबाह्य होत नाही.

ii. बीएफएल कस्टमरला त्यांच्या विवेकबुद्धीनुसार कारणे न देता किंवा कस्टमरने या अटींचे उल्लंघन केल्यामुळे किंवा आरबीआय/कोणत्याही इतर रेग्युलेटरी/वैधानिक/कायदेशीर/शोध प्राधिकरण आणि न्यायालय/लागू कायदा/कायदा अंमलबजावणी एजन्सी (एलईए) कडून मिळालेल्या निर्देशानुसार बजाज पे वॉलेट बंद करू शकते. पूर्वगामी असूनही, वर नमूद केलेल्या कोणत्याही पॉलिसीच्या किंवा वापरायच्या अटी किंवा बीएफएलद्वारे जारी केलेल्या इतर अटींचे किंवा आरबीआय किंवा भारत सरकार किंवा इतर कोणत्याही संबंधित संस्थेद्वारे जारी केलेल्या कोणत्याही नियम/पॉलिसीचे उल्लंघन झाल्यास कस्टमरचे बजाज पे वॉलेट रद्द करण्याचा अधिकार बीएफएलकडे राखीव आहे आणि अशा प्रकरणात, अशा वॉलेटमधील कोणतेही बॅलन्स बजाज पे वॉलेटशी लिंक केलेल्या कस्टमरच्या बँक अकाउंटमध्ये परत जमा केला जाईल. अशा परिस्थितीत, बीएफएल या प्रकरणाचा संबंधित रेग्युलेटरी/वैधानिक/कायदेशीर/तपासणी संस्थेला रिपोर्ट करेल आणि अशा संबंधित रेग्युलेटरी/वैधानिक/कायदेशीर/तपासणी संस्थेद्वारे क्लीअरन्स देईपर्यंत कस्टमरच्या बजाज पे वॉलेटला गोठविले जाईल.

iii. जर बजाज पे वॉलेट येथे नमूद केल्याप्रमाणे इन-ॲक्टिव्हिटीमुळे क्लोजरसाठी देय असेल तर बीएफएलने कस्टमरला एसएमएस/ईमेल/पुश नोटिफिकेशन द्वारे यासंबंधी कम्युनिकेशन पाठविण्याद्वारे किंवा कस्टमरने बीएफएलकडे दिलेल्या रजिस्टर्ड संपर्क तपशीलावर पीपीआय जारी करतेवेळी धारकाद्वारे प्राधान्यित भाषेमध्ये कोणत्याही स्वरुपात अशा क्लोजरच्या तारखेपूर्वी कमीतकमी 45 (पंचेचाळीस) दिवसांपूर्वी त्याबाबत कळवायला हवे. जर बजाज पे वॉलेटमध्ये थकित

बॅलन्स असेल तर कस्टमर नमूद वॉलेटच्या क्लोजर/ टर्मिनेशन नंतर कोणत्याही वेळी थकित बजाज पे वॉलेट बॅलन्सच्या रिफंडची सुरुवात करण्याची विनंती बीएफएलला करू शकतो आणि उपरोक्त बॅलन्स बँक अकाउंटमध्ये ट्रान्सफर केला जाईल जो कस्टमरने यापूर्वी वॉलेटशी लिंक केलेले होते किंवा रिफंडसाठी अशा विनंती करतेवेळी बीएफएलला बँक अकाउंट तपशील प्रदान केले होते. जर कस्टमरने कोणत्याही संशयास्पद ट्रान्झॅक्शन आणि/किंवा आरबीआय द्वारे जारी केलेल्या नियम आणि रेग्युलेशनचे उल्लंघन केल्यास कस्टमरच्या बजाज पे वॉलेटला ब्लॉक करण्याचा अधिकार बीएफएल राखून ठेवत आहे. प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट्सचा वापर नियंत्रित करणे ज्यामध्ये प्रीव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग अ‍ॅक्ट, 2002 अंतर्गत नियम आणि रेग्युलेशन्स आणि त्यात कोणत्याही सुधारणांचा समावेश आहे परंतु त्यापुरते मर्यादित नाही. अशा स्थितीत, बीएफएल द्वारे आरबीआयकडे रिपोर्ट सादर केला जाईल आणि आरबीआय कडून संपूर्ण चौकशी आणि तथ्य रिपोर्ट प्राप्त होईपर्यंत कस्टमरचे बजाज पे वॉलेट गोठविले जाईल.

**(ज) बजाज पे सब वॉलेट असलेल्या कस्टमर द्वारे पालन करावयाच्या सर्वसाधारण अटी व शर्ती**

या अटी वापरायच्या अटी, बजाज पे वॉलेटच्या अटी व शर्ती, बीएफएल रिवॉर्ड्सच्या अटी व शर्ती यांच्या संयोगाने वाचल्या जातील आणि वापरायच्या अटी आणि वॉलेटच्या अटी खाली नमूद केलेल्या अटींशी विरोधाभास असल्याशिवाय बजाज पे सब वॉलेटला लागू होईल:

i. बजाज पे वॉलेट असलेल्या कस्टमर साठी बजाज पे सब वॉलेट उपलब्ध असेल.

ii. बजाज पे सब वॉलेटमध्ये पूर्व-निर्धारित आर्थिक मर्यादा असेल आणि पुन्हा लोड केले जाऊ शकते.

iii. बजाज पे सब वॉलेट धारक कस्टमर समजतो आणि मान्य करतो की बीएफएल रिवॉर्ड प्रोग्राम स्कीममध्ये (वापरायच्या अटीचा क्लॉज 32 चा संदर्भ) गणना केलेले सर्व कॅशबॅक, बजाज कॉईन्स, प्रोमो पॉईंट्स आणि व्हाउचर्स इ. केवळ बजाज पे सब वॉलेटमध्ये जमा केले जातील आणि कस्टमर कोणत्याही प्रकारे प्रायमरी वॉलेटमध्ये कॅशबॅक, बजाज कॉईन्स, प्रोमो पॉईंट्स, व्हाउचर्स इ. चा क्लेम करणार नाही.

iv. बजाज पे सब वॉलेट हे प्रायमरी वॉलेटचा भाग असेल. बजाज पे वॉलेट आणि बजाज पे सब वॉलेटची एकत्रित मर्यादा आरबीआयने त्यांच्या गाईडलाईन्स मध्ये वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे कमाल आर्थिक मर्यादेनुसार नियंत्रित केली जाईल आणि त्यानुसार असेल.

v. कस्टमर बीएफएल द्वारे निर्धारित फी आणि सर्व्हिस शुल्काचे पेमेंट करेल. बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार सर्व्हिस शुल्कात बदल, सुधारणा, वाढ किंवा कमी करू शकतो. बीएफएल वेबसाईट आणि बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर फी आणि शुल्क उपलब्ध असतील.

vi. कस्टमर मान्य करतो की बजाज पे सब वॉलेट पूर्णपणे बीएफएलद्वारे निर्धारित उद्देशांसाठी वापरले जाईल आणि कोणत्याही बजाज पे वॉलेट ट्रान्झॅक्शनसाठी रक्कम कपात करण्यासाठी लॉजिक केवळ बीएफएलद्वारे नियंत्रित केले जाईल आणि वेळोवेळी सुधारित केले जाऊ शकते. कस्टमर पुढे सहमत आहे की तो/ती बजाज पे वॉलेट किंवा सब वॉलेट अनधिकृत किंवा अवैध पद्धतीने वापरणार नाही.

कस्टमर सहमत आहे आणि कन्फर्म करतो की कोणतेही P2B (पर्सन टू बँक) ट्रान्सफर, P2P (पर्सन टू पर्सन) ट्रान्सफर आणि कॅश विद्ड्रॉल करण्यास बजाज पे सब वॉलेट बॅलन्समधून परवानगी नाही. वैध ट्रान्झॅक्शनसाठी पेमेंट करण्यासाठी आणि बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म किंवा बीएफएल अधिकृत चॅनेल्सवर विशिष्ट सर्व्हिसेसचा लाभ घेण्यासाठी बजाज पे सब वॉलेट बॅलन्सचा वापर करणे आवश्यक आहे.

vii. कस्टमर बीएफएलकडून बजाज पे सब वॉलेट सर्व्हिसेसचा लाभ घेण्यापूर्वी योग्य सल्ला प्राप्त करेल आणि संबंधित जोखीम आणि बजाज पे वॉलेट आणि सब वॉलेट सर्व्हिसेसच्या वापराच्या संबंधित सर्व अटी व शर्ती स्वत:ला परिचित करेल.

viii. कस्टमर सहमत आहे की तो/ती बजाज पे सब वॉलेटचा वापर कोणत्याही बेकायदेशीर/गैरकायदेशीर खरेदीच्या पेमेंट/उद्देशासाठी करणार नाही; अन्यथा, बजाज पे सब वॉलेटच्या चुकीच्या वापरासाठी, असल्यास, कस्टमर पूर्णपणे जबाबदार असेल.

ix. कस्टमर आरबीआयने जारी केलेल्या संबंधित विद्यमान गाईडलाईन्सचे अनुपालन करण्यासाठी वेळोवेळी केवायसी नियमांची पूर्तता करण्यासाठी बीएफएलकडे सर्व डॉक्युमेंट्स सबमिट करण्यासाठी सहमत असेल.

x. कस्टमर बजाज पे सब वॉलेट आणि बीएफएलशी संबंधित सर्व व्यवहारांशी संबंधित सर्वकाळ चांगल्या विश्वासाने कार्य करेल.

xi. बजाज पे सब वॉलेट सर्व्हिसच्या चुकीच्या वापरामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही / सर्व कृती, कार्यवाही, क्लेम, दायित्व (वैधानिक दायित्वासह), दंड, मागणी आणि खर्च, निवाडा, नुकसान आणि हानी साठी आणि/किंवा या अटी व शर्ती, वापरायच्या अटी आणि बजाज पे वॉलेट अटी व शर्तींचे उल्लंघन करण्यामुळे कस्टमरने बीएफएलला नुकसान भरपाई देणे आणि त्याचे पालन करणे आवश्यक आहे.

**(झ) यूपीआय ("वॉलेट यूपीआय") मार्फत बजाज पे वॉलेट इंटरऑपरेबिलिटीसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती)**

या अटी वापरायच्या अटी आणि बजाज पे वॉलेटच्या अटी व शर्तींच्या संयुक्तपणे वाचल्या जातील:

i. यूपीआय (यानंतर "वॉलेट यूपीआय" म्हणून संदर्भित) मार्फत बजाज पे वॉलेट इंटरऑपरेबिलिटी केवळ वैध बजाज पे फूल केवायसी वॉलेट असलेल्या कस्टमर्ससाठीच उपलब्ध आहे.

ii. कस्टमरकडे त्याच्या/तिच्या बजाज पे वॉलेटशी संबंधित वैध मोबाईल नंबर असावा.

iii. वॉलेट यूपीआय फीचर प्राप्त करून, कस्टमर कोणत्याही यूपीआय क्यूआर कोडवर आणि/किंवा इतर पीपीआय जारीकर्त्यांनी जारी केलेल्या वॉलेटमध्ये यूपीआय मार्फत पेमेंट करण्यासाठी त्यांचे बजाज पे फूल केवायसी वॉलेट बॅलन्स वापरू शकतात.

iv. तुम्ही याद्वारे तुमची स्पष्ट आणि निःसंदिग्ध संमती देता आणि बीएफएलला तुमचे बजाज पे वॉलेट तपशील पडताळण्यासाठी/अधिप्रमाणित करण्यासाठी मोबाईल डिव्हाईस ओळख नंबर आणि सिम ओळख नंबर असलेले तुमचे मोबाईल डिव्हाईस क्रेडेन्शियल्स ॲक्सेस करण्यास अधिकृत करता

v. एकदा का तुम्ही अटी व शर्तींनुसार वॉलेट यूपीआय फीचर प्राप्त करण्यासाठी यूपीआयसह तुमचे बजाज पे वॉलेट वॉलेट लिंक कराल, तेव्हा तुम्हाला युनिक बजाज पे वॉलेट व्हीपीए / बजाज पे वॉलेट यूपीआय वाटप केले जाईल.

vi. तुम्ही केवळ एकदाच बजाज पे वॉलेट व्हीपीए बनवू शकता आणि तुम्ही मान्य करता आणि समजू शकता की बीएफएल भविष्यातील संदर्भासाठी तुमचा बजाज पे वॉलेट व्हीपीए सेव्ह करू शकते.

vii. तुम्ही समजता की ट्रान्झॅक्शन करण्यापूर्वी ट्रान्झॅक्शन / पेयर / पेई तपशील पडताळण्यासाठी तुम्ही पूर्णपणे जबाबदार असाल. बीएफएल ट्रान्झॅक्शन रिव्हर्स करण्यासाठी किंवा तुमच्याद्वारे अधिकृत कोणतेही ट्रान्झॅक्शन करताना तुम्ही दिलेल्या कोणत्याही चुकीच्या माहितीसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

viii. तुम्ही तुमचे बजाज पे वॉलेट व्हीपीए, पासवर्ड, पिन, ओटीपी, लॉग-इन तपशील ("क्रेडेन्शियल्स") इत्यादींचा समावेश असलेले तुमचे बजाज पे वॉलेट क्रेडेन्शियल्सची आणि तुमच्या बजाज पे वॉलेटमध्ये किंवा त्या माध्यमातून होणाऱ्या कृतीची गोपनीयता आणि सिक्युरिटी मेंटेन करण्यासाठी पूर्णपणे जबाबदार असाल. पुढे, तुमच्या निष्काळजीपणामुळे तुमच्या माहितीसह किंवा माहितीशिवाय तुमच्या क्रेडेन्शियल्सचा गैरवापर, यासंबंधी उद्भवणाऱ्या/त्यासंबंधी कोणत्याही प्रकारे तुम्हाला झालेल्या कोणत्याही नुकसान/हानीसाठी बीएफएल जबाबदार असणार नाही.

ix. बजाज पे वॉलेट व्हीपीए वापरून ट्रान्झॅक्शन करताना ट्रान्झॅक्शन मर्यादा ही बजाज पे वॉलेटच्या ट्रान्झॅक्शन मर्यादेप्रमाणेच असेल, जे एफएक्यू मधून अ‍ॅक्सेस केले जाऊ शकते.

x. तुम्ही कधीही तुमचे बजाज पे वॉलेट व्हीपीए रद्द करू शकता. तथापि, रजिस्टर रद्द केल्यानंतर, तुम्ही बजाज पे वॉलेट व्हीपीए वापरून कोणतेही वॉलेट यूपीआय ट्रान्झॅक्शन करू शकणार नाही.

xi. बीएफएल वॉलेट यूपीआय सर्व्हिसेसचा तुमचा अ‍ॅक्सेस आणि / किंवा तुमचे बजाज पे वॉलेट अकाउंट तात्पुरते किंवा कायमस्वरुपी निलंबित करण्याचा अधिकार राखून ठेवते जर बीएफएलला वाटत असेल की तुमचे बजाज पे वॉलेट व्हीपीए संशयास्पद किंवा असामान्य उपक्रमांसाठी वापरला जात आहे किंवा कोणत्याही रेग्युलेटरी, न्यायिक, अर्ध-न्यायिक प्राधिकरण किंवा कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी एजन्सीकडून तशा सूचना प्राप्त झाल्या आहेत.

**(ञ) बजाज पे वॉलेट ऑटो लोडवर लागू अटी व शर्ती**

**कस्टमर याद्वारे मान्य करतो की:**

i. बजाज पे वॉलेटमध्ये ("वॉलेट ऑटो लोड") ऑटोमॅटिकरित्या पैसे भरण्याद्वारे बीएफएलने कस्टमरला बजाज पे वॉलेटमधील बॅलन्स रु. 500/- पेक्षा कमी असताना रिकरिंग आधारावर पैसे भरून बजाज पे वॉलेट बॅलन्स ऑटोमॅटिकरित्या राखण्याचा पर्याय प्रदान केला आहे.

ii. कस्टमर वॉलेट ऑटो लोडसाठी पेमेंट पद्धत म्हणून यूपीआय वापरू शकतात कस्टमर वॉलेट ऑटो लोडसाठी अन्य कोणतीही पेमेंट पद्धत वापरू शकणार नाही.

iii. असे करण्याद्वारे जेव्हा बजाज पे वॉलेटमधील बॅलन्स रु. 500/- पेक्षा कमी होईल तेव्हा कस्टमरला बीएफएल रकमेद्वारे प्रदान केलेल्या पर्यायांमध्ये निवड करणे आवश्यक आहे.

iv. बीएफएलद्वारे प्रदान केलेल्या पर्यायांमध्ये कस्टमर बजाज पे वॉलेटमध्ये जोडू शकतो अशी कमाल रक्कम आहे रु. 5,000/-.

v. वॉलेट ऑटो लोड आणि/किंवा पेमेंट पद्धतींची संख्या वाढवणे आणि/किंवा अशा पेमेंट पद्धती काढून टाकण्यासाठी पात्र पेमेंट पद्धती निर्धारित करण्याचा बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार अधिकार राखून ठेवते.

vi. कस्टमर त्याच्या विवेकबुद्धीनुसार वॉलेट ऑटो लोडसाठी पेमेंट पद्धत निवडू शकतो आणि कोणत्याही वेळी अशा पेमेंटची पद्धत बदलू शकतो, जर अशी पद्धत पात्र असेल आणि ऑटोमॅटिक पेमेंटसाठी बीएफएलद्वारे समर्थित असेल.

vii. कस्टमरने प्रदान केलेल्या पेमेंट पद्धतींच्या तपशिलांच्या अचूकतेसाठी कस्टमर पूर्णपणे जबाबदार असेल आणि अशा कोणत्याही तपशिलांसाठी किंवा कस्टमरने केलेल्या बदलांसाठी कोणत्याही प्रकारे बीएफएलला जबाबदार धरणार नाही.

viii. वॉलेट ऑटो लोड ट्रान्झॅक्शनसाठी कस्टमरच्या यूपीआय लिंक केलेल्या बँक अकाउंटमधून रु. 1/- (केवळ एक रुपया) डेबिट केले जातील जे कस्टमरच्या बजाज पे वॉलेटमध्ये जमा केले जाईल.

ix. जेव्हा बजाज पे वॉलेटचा बॅलन्स रु. 500/- पेक्षा कमी होईल तेव्हा कस्टमरच्या यूपीआय लिंक केलेल्या बँक अकाउंटमधून वॉलेट ऑटो लोड सूचना पुढे सुरू ठेवण्यासाठी कस्टमरने बीएफएलला त्यांच्या बजाज पे वॉलेटमध्ये ऑटोमॅटिकरित्या पैसे भरण्यास अधिकृत केले आहे.

x. जर कस्टमरने वॉलेट ऑटो लोड डीॲक्टिव्हेट केले, तर तुमचा किमान बजाज पे वॉलेट बॅलन्स राखला जाणार नाही. अशा परिस्थितीत, कस्टमरला बजाज पे वॉलेटमध्ये स्वतंत्रपणे पैसे भरणे आवश्यक असेल.

xi. वॉलेट ऑटो लोडच्या संबंधात बीएफएल ॲप नोटिफिकेशन किंवा एसएमएस द्वारे कस्टमरशी संपर्क साधेल.

xii. वॉलेट ऑटो लोडसाठी रिकरिंग पेमेंटच्या वापरामुळे कस्टमरला झालेल्या कोणत्याही नुकसान किंवा हानीसाठी बीएफएल जबाबदार असणार नाही, ज्यामध्ये सेव्ह केलेल्या पेमेंट पद्धतींचा वापर करून वॉलेट ऑटो लोड पेमेंटच्या संदर्भात कोणत्याही फसवणूकीचा परिणाम समाविष्ट आहे.

xiii. सेव्ह केलेल्या पेमेंट मोडमधून पैसे भरण्यात अयशस्वी झाल्यास, बीएफएल पुन्हा ते जोडण्याचा प्रयत्न करेल आणि एकाधिक अयशस्वीतेच्या बाबतीत, बीएफएल ऑटोमॅटिकरित्या पैसे जोडणे मागे घेईल.

### (ट) बजाज पे गिफ्ट कार्डवर लागू अटी व शर्ती

या अटी व शर्ती बीएफएल द्वारे जारी केलेल्या बजाज पे गिफ्ट कार्ड ("गिफ्ट कार्ड") वर लागू होतात आणि वापरायच्या अटी आणि वॉलेटच्या अटी व शर्तींसह संयुक्तपणे वाचल्या जातील.

कस्टमर खालील अटी मान्य करतो आणि समजतो:

**व्याख्या:**

अन्यथा सूचित केल्याशिवाय, खाली सूचीबद्ध कॅपिटल संज्ञाचे खालील अर्थ असतील:

- "गिफ्ट कार्ड" म्हणजे बीएफएल कडून जारी केलेले प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट, ज्याचा वापर कस्टमर विविध ट्रान्झॅक्शन, जसे की वस्तू आणि सर्व्हिसेसच्या खरेदी इत्यादी, त्या त्या प्रकरणानुसार, आणि आरबीआय कडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंटसंबंधी मास्टर डायरेक्शनच्या अनुषंगाने करू शकतात.
- "वैधता कालावधी" म्हणजे खरेदीच्या तारखेपासून 1 वर्षाच्या कालावधीसाठी गिफ्ट कार्डची वैधता.
- "मर्चंट" म्हणजे असे मर्चंट आणि/किंवा कमर्शियल आस्थापना ज्यांचे बीएफएल सोबत थेट करार आहे किंवा पेमेंट ॲग्रीगेटर/पेमेंट गेटवेच्या माध्यमातून करार आहे, ज्याद्वारे गिफ्ट कार्ड स्वीकारून वॉलेटमधील फंडला ॲक्सेस मिळू शकतो, आणि गिफ्ट कार्ड-सक्षम पॉईंट ऑफ सेल (पीओएस), इलेक्ट्रॉनिक टर्मिनल्स किंवा सक्षम उपकरणांद्वारे प्रॉडक्ट्स आणि/किंवा सर्व्हिसेसच्या खरेदी करण्यासाठी पेमेंट करता येते.

## गिफ्ट कार्ड जारी करणे आणि वापरणे

i. गिफ्ट कार्ड रु. 10,000/- पर्यंतच्या किंमतीत खरेदी केले जाऊ शकतात.

ii. गिफ्ट कार्ड वॉलेट बॅलन्स कोणत्याही वेळी रु. 10,000/- पेक्षा जास्त असू शकत नाही.

iii. कस्टमर याद्वारे सहमत आहे आणि समजतो की वर नमूद केलेला रु. 10,000/- बॅलन्स बीएफएल सह धारण केलेल्या कस्टमरच्या बजाज पे वॉलेटमध्ये उपलब्ध बॅलन्स पेक्षा स्वतंत्र असेल.

iv. बजाज पे वॉलेट स्वीकारणाऱ्या मर्चंट आस्थापनाकडे प्रॉडक्ट आणि/किंवा सर्व्हिसेसच्या खरेदीसाठी गिफ्ट कार्ड रिडीम केले जाऊ शकतात. खरेदीची रक्कम कस्टमरच्या गिफ्ट कार्ड बॅलन्समधून कपात केली जाईल. कोणताही न वापरलेला गिफ्ट कार्ड बॅलन्स कस्टमरच्या वॉलेट अकाउंटसह लिंक राहील आणि त्यानुसार खरेदीवर लागू होईल.

v. तुम्ही बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर उपलब्ध विविध पर्यायांद्वारे गिफ्ट कार्ड खरेदी करू शकता आणि येथे प्रदान केलेल्या पद्धतीने गिफ्ट कार्डचा वापर देखील करू शकता. गिफ्ट कार्ड खरेदी किंवा वापर करून, तुम्ही या अटी व शर्तींशी सहमत आहात आणि त्यांना स्वीकारत आहात.

vi. **रिडेम्पशन:** गिफ्ट कार्ड रिडीम करण्यासाठी, कस्टमरला गिफ्ट कार्ड नंबर आणि पिन पडताळल्यानंतर गिफ्ट कार्ड वॉलेट बॅलन्समध्ये ते जोडणे आवश्यक आहे. गिफ्ट कार्ड्सचा उपयोग फक्त बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवरील पात्र प्रॉडक्ट्सच्या खरेदीसाठी आणि/किंवा गिफ्ट कार्ड स्वीकारण्यासाठी सक्षम असलेल्या इतर मर्चंटकडून खरेदी करण्यासाठीच केला जाऊ शकतो. खरेदीची रक्कम कस्टमरच्या गिफ्ट कार्ड बॅलन्समधून कपात केली जाईल. कोणताही न वापरलेला गिफ्ट कार्ड बॅलन्स कस्टमरच्या वॉलेट अकाउंटसह लिंक असेल आणि त्यानुसार खरेदीवर लागू होईल. कोणताही न वापरलेला गिफ्ट कार्ड बॅलन्स कस्टमरच्या वॉलेट बॅलन्सशी संबंधित राहील आणि तो सर्वात आधी कालबाह्य होणाऱ्या तारखेनुसार खरेदीसाठी वापरला जाईल

vii. जर खरेदी कस्टमरच्या गिफ्ट कार्ड बॅलन्सपेक्षा जास्त असेल तर उर्वरित रक्कम डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, यूपीआय, वॉलेट सारख्या इतर कोणत्याही वैध पेमेंट पद्धतीद्वारे भरावी लागेल.

viii. **मर्यादा:** कोणत्याही न वापरलेल्या गिफ्ट कार्ड बॅलन्ससह गिफ्ट कार्ड, जारी केल्याच्या तारखेपासून 1 वर्षात कालबाह्य होतात. तुम्ही कालबाह्य गिफ्ट कार्डच्या पुन्हा प्रमाणीकरणाची विनंती करू शकता. अशी विनंती प्राप्त झाल्यानंतर, योग्य पडताळणीनंतर आणि लागू अटी व शर्तींच्या अधीन गिफ्ट कार्ड पुन्हा प्रमाणित केले जाऊ शकते. गिफ्ट कार्ड केवळ रु. 10,000/- पर्यंतच्या किंमतीत किंवा बीएफएल निर्धारित करू शकणाऱ्या इतर मर्यादेमध्ये खरेदी केले जाऊ शकतात.

ix. गिफ्ट कार्ड अन्य गिफ्ट कार्ड खरेदी करण्यासाठी वापरले जाऊ शकत नाहीत. गिफ्ट कार्ड रिलोड, पुनर्विक्री, मूल्यासाठी ट्रान्सफर किंवा कॅशसाठी रिडीम केले जाऊ शकत नाहीत. येथे दिलेल्या किंवा लागू कायद्यानुसार वगळता, तुमच्या गिफ्ट कार्डमधील रक्कम तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत रिफंड केली जाणार नाही. कोणत्याही वेळी कॅशमध्ये रिफंड दिले जाणार नाही. वापरात न आलेले गिफ्ट कार्ड बॅलन्स अन्य युजरच्या अकाउंटमध्ये ट्रान्सफर केले जाऊ शकत नाही. कोणत्याही गिफ्ट कार्ड किंवा गिफ्ट कार्ड बॅलन्सवर बीएफएलद्वारे कोणतेही इंटरेस्ट देययोग्य असणार नाही.

x. फसवणूक: जर गिफ्ट कार्ड हरवले, चोरीला गेले, नष्ट झाले किंवा परवानगीशिवाय वापरले तर बीएफएल जबाबदार नाही. जर फसवणूकीने प्राप्त केलेले गिफ्ट कार्ड रिडीम केले गेले असेल आणि/किंवा बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर किंवा गिफ्ट कार्ड स्वीकारण्यास सक्षम कोणत्याही मर्चंट आस्थापनावर खरेदी करण्यासाठी वापरले गेले तर बीएफएलला कस्टमर अकाउंट बंद करण्याचा आणि पर्यायी पेमेंट मधून पेमेंट घेण्याचा अधिकार असेल.

**(ठ) पासबुक**

i. बजाज पे वॉलेटवरील उपलब्ध कस्टमरच्या पासबुक मध्ये नमूद वॉलेटद्वारे केलेले सर्व ट्रान्झॅक्शन दिसून येतील.

ii. बजाज पे वॉलेटमधील ट्रान्झॅक्शनचे तपशील दर्शविणारे पासबुक कस्टमरला उपलब्ध असेल.

**(ड) कस्टमरचे दायित्व**

i. बजाज पे वॉलेट / सब वॉलेट / बजाज पे वॉलेट व्हीपीए उपलब्धता ही ॲक्टिव्ह मोबाईल फोन आणि इंटरनेट कनेक्शनच्या मेंटेनन्सच्या अधीन आहे. बजाज पे वॉलेट उपलब्धता मोबाईल फोन हँडसेट आणि इतर ॲप्लिकेशनच्या मेंटेनन्सच्या अधीन आहे ज्यावर सर्व्हिसेस/ॲप्लिकेशन/प्लॅटफॉर्म चालू शकतो आणि कस्टमर कमतरता किंवा दोषयुक्त मोबाईल हँडसेट किंवा इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर कोणत्याही बजाज पे वॉलेट चॅनेल किंवा ॲप्लिकेशनला सपोर्ट करण्यास सक्षम नसल्यामुळे उद्भवणाऱ्या सर्व सर्व्हिसेस/ॲप्लिकेशन/प्लॅटफॉर्मच्या अनुपलब्धतेमुळे उद्भवणाऱ्या सर्व दायित्वासाठी पूर्णपणे जबाबदार आहे.

ii. कस्टमरच्या बजाज पे वॉलेट/सब वॉलेटमधून कोणतेही ट्रान्झॅक्शन पूर्ण करण्यापूर्वी कस्टमरच्या बजाज पे वॉलेटमध्ये पुरेशा फंडची उपलब्धता असल्याचे कस्टमरने सुनिश्चित करावे.

iii. बजाज पे वॉलेट प्राप्त करण्यासाठी लॉग-इन क्रेडेन्शियल्सची गोपनीयता, जपवणूक आणि सिक्युरिटी साठी कस्टमर पूर्णपणे जबाबदार असेल. कस्टमर पासवर्डचा एकमेव मालक असेल आणि क्रेडेन्शियल्सचे प्रकटीकरण आणि/किंवा बजाज पे वॉलेटचा अनधिकृत वापर केल्यामुळे उद्भवणाऱ्या

परिणामांसाठी जबाबदार असेल. जर मोबाईल फोन/सिम कार्ड/कस्टमरच्या बजाज पे वॉलेटशी संबंधित मोबाईल नंबर हरवला/चोरीला गेला/गहाळ झाला/कस्टमरच्या नियंत्रणात नसला तर कस्टमरने त्वरित बीएफएलला कळवावे. संबंधित अकाउंट सुरक्षित करण्यासाठी इंटर्नल पॉलिसीज नुसार संबंधित अकाउंट ब्लॉक करण्यासाठी किंवा आवश्यक कारवाई करण्यासाठी बीएफएल अशी माहिती प्राप्त करेल.

iv. कस्टमरने आपल्या केवायसी डॉक्युमेंट्स मध्ये झालेला कोणताही अपडेट किंवा कस्टमर ॲड्रेसमध्ये झालेला बदल, असल्यास, संबंधित केवायसी डॉक्युमेंट्स नुसार आवश्यक ॲड्रेसच्या पुराव्यासह शक्य तितक्या लवकर, आणि कोणत्याही परिस्थितीत त्या अपडेटला 30 दिवसांच्या आत, बीएफएलला कळवणे आवश्यक आहे.

v. कस्टमर कोणत्याही हेतूसाठी बजाज पे वॉलेट/ सब वॉलेट/ बजाज पे वॉलेट व्हीपीए चा वापर करणार नाही जे कोणताही लागू कायदा, रेग्युलेशन, गाईडलाईन, न्यायिक आदेश, बीएफएल पॉलिसी किंवा सार्वजनिक पॉलिसीच्या विरुद्ध असेल किंवा नाकारले जाऊ शकते किंवा बीएफएलच्या प्रतिमेवर नकारात्मकदृष्ट्या प्रतिकूल परिणाम करू शकणाऱ्या कोणत्याही हेतूसाठी किंवा येथे निर्धारित बजाज पे वॉलेट / सब वॉलेट/ वॉलेट यूपीआय अटींसह वापरायच्या अटीचे उल्लंघन करू शकतात.

vi. कस्टमर मान्य करतो आणि समजतो की बजाज पे वॉलेट कस्टमरच्या मोबाईल फोन नंबरशी लिंक केलेले आहे आणि कस्टमर मोबाईल फोन नंबर गहाळ/चोरी/गैरवापरामुळे उद्भवलेल्या कोणत्याही दायित्वासाठी किंवा संबंधित टेलिकॉम सर्व्हिस प्रोव्हायडरद्वारे मोबाईल कनेक्शनच्या डी-ॲक्टिव्हेशन साठी पूर्णपणे जबाबदार असेल.

vii. बजाज पे वॉलेटचा लाभ घेण्यासाठी कस्टमरने सबमिट केलेली माहिती आणि/किंवा बजाज पे वॉलेट वापरताना सबमिट केलेली माहिती बीएफएल किंवा कोणत्याही थर्ड पार्टीच्या सहयोगी, आंतरिक घटकांसह शेअर केली जाऊ शकते. जेणेकरून बजाज पे वॉलेटची तरतूद सुलभ होईल किंवा वापरायच्या अटी आणि बजाज पे वॉलेटच्या अटी व शर्तींमध्ये नमूद केलेल्या उद्देशांसाठी बीएफएल द्वारे शेअर केली जाऊ शकते.

viii. कस्टमर हे सुनिश्चित करेल की परदेशी चलन मधील ट्रान्झॅक्शनसाठी बजाज पे वॉलेट सर्व्हिसेस वापरल्या जाणार नाहीत. बजाज पे वॉलेट भारतात जारी केले जाते आणि केवळ भारतातच वैध असेल आणि केवळ भारतातील मर्चंटकडे वापरले जाईल.

ix. पूर्वगामी मर्यादा न ठेवता कस्टमर सहमत आहे की कस्टमर खालीलपैकी कोणतीही कृती करण्यासाठी किंवा कोणतीही माहिती प्रदर्शित करण्यासाठी, अपलोड करण्यासाठी, सुधारित करण्यासाठी, प्रकाशित करण्यासाठी, वितरित करण्यासाठी, प्रसारित करण्यासाठी, वितरित करण्यासाठी, अपडेट करण्यासाठी किंवा शेअर करण्यासाठी बजाज पे वॉलेटचा वापर करणार नाही:

(क) फारच हानीकारक, त्रासदायक, निंदनीय बदनामीकारक, अश्लील, पोर्नोग्राफिक, पेडोफिलिक, निंदनीय, दुसऱ्याची प्रायव्हसी भंग करणारे, द्वेषपूर्ण किंवा वांशिक, वांशिकदृष्ट्या आक्षेपार्ह, अपमानास्पद, मनी लाँडरिंग किंवा जुगार खेळण्याशी संबंधित किंवा प्रोत्साहित करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर;

(ख) कोणतेही पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराईट किंवा अन्य मालकी हक्कांचे उल्लंघन;
(ग) व्हायरस, करप्टेड फाईल्स किंवा कोणतेही अन्य समान सॉफ्टवेअर किंवा प्रोग्राम्स जे कोणत्याही कॉम्प्युटर सोर्स कार्यक्षमता मर्यादित करू शकतात किंवा दुसऱ्या व्यक्तीच्या कॉम्प्युटरचे, त्याच्या वेबसाईट्स, कोणतेही सॉफ्टवेअर किंवा हार्डवेअर किंवा टेलिकम्युनिकेशन उपकरणाच्या कार्यास हानी किंवा प्रतिकूल परिणाम करू शकतात;
(घ) कोणत्याही कमर्शियल हेतूसाठी कोणतीही वस्तू किंवा सर्व्हिसेस विक्री करण्याची जाहिरात किंवा ऑफर;
(ङ) प्रमोशनल सर्व्हिसेस, प्रॉडक्ट्स, सर्वेक्षण, स्पर्धा, पिरॅमिड स्कीम्स , स्पॅम, अनपेक्षित जाहिरात किंवा जाहिरातपर सामग्री किंवा साखळी पत्रांच्या स्वरुपात असेल;
(च) कोणतीही लेखकाची माहिती, कायदेशीर किंवा इतर योग्य सूचना किंवा मालकी हक्क किंवा मूळ लेबल किंवा सॉफ्टवेअर किंवा इतर सामग्रीचे सोर्समध्ये गैर-हस्तक्षेप किंवा हटविणे;
(छ) अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे उल्लंघन;
(ज) अन्य व्यक्तीशी संबंधित आहे ज्यावर कस्टमरचा कोणताही अधिकार नाही;
(झ) बजाज पे वॉलेट किंवा इतर बीएफएल वेबसाईट, सर्व्हर किंवा नेटवर्क्समध्ये हस्तक्षेप करते किंवा व्यत्यय आणते;
(ञ) इतर कोणत्याही व्यक्तीची तोतयागिरी;
(ट) त्यांच्या वेबसाईटद्वारे प्रसारित कोणत्याही कंटेंटचे मूळ शोधण्यासाठी ओळखकर्ता किंवा अन्य डाटा यात फेरफार करणे किंवा त्यांच्या वेबसाईट्स वर कस्टमर उपस्थिती फेरफार करणे;
(ठ) कोणत्याही बेकायदेशीर उपक्रमांमध्ये सहभागी;
(ड) भारताची एकता, अखंडता, संरक्षण, सुरक्षा किंवा सार्वभौमत्व, अन्य देशांशी मैत्रीपूर्ण संबंध किंवा सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण करते किंवा कोणत्याही दखलपात्र गुन्ह्यासाठी प्रवृत्त करते किंवा कोणत्याही गुन्ह्याच्या तपासाला प्रतिबंध करते किंवा इतर कोणत्याही राष्ट्राचा अपमान करते.

**(ढ) अतिरिक्त अटी व शर्ती:**

(i) जेव्हा कस्टमर बजाज पे वॉलेट सर्व्हिसद्वारे मर्चंटकडून वस्तू, सॉफ्टवेअर किंवा इतर कोणतेही प्रॉडक्ट्स/सर्व्हिसेस प्राप्त करतो, तेव्हा कस्टमर समजतो आणि सहमत आहे की बीएफएल कस्टमर आणि मर्चंट दरम्यानच्या करारासाठी पार्टी नाही. बीएफएल बजाज पे वॉलेटशी लिंक असलेल्या कोणत्याही जाहिरातदार किंवा मर्चंटला समर्थन देत नाही. तसेच, कस्टमरद्वारे वापरलेल्या मर्चंटच्या सर्व्हिस / प्रॉडक्ट्स मॉनिटर करण्यासाठी बीएफएल कोणत्याही दायित्वाखाली असणार नाही. वॉरंटी किंवा गॅरंटी सह (मर्यादेशिवाय) कराराच्या अंतर्गत सर्व दायित्वांसाठी एकटा मर्चंट जबाबदार असेल. कोणत्याही मर्चंटशी संबंधित कोणताही वाद किंवा तक्रार कस्टमरने थेट मर्चंटकडे सोडविला पाहिजे. हे स्पष्ट केले आहे की बजाज पे वॉलेट/सब वॉलेट वापरून खरेदी केलेल्या वस्तू आणि/किंवा सर्व्हिसेस मध्ये कोणत्याही कमतरतेसाठी बीएफएल जबाबदार किंवा उत्तरदायी असणार नाही. कस्टमरला सल्ला दिला जातो की, कोणतीही वस्तू आणि/किंवा सर्व्हिस खरेदी करण्यापूर्वी, तिची गुणवत्ता, प्रमाण आणि फिटनेस बद्दल स्वतःची खात्री करून घ्यावी.

(ii) कस्टमरने कोणत्याही मर्चंटकडे बजाज पे वॉलेटद्वारे चुकीने केलेले कोणतेही पेमेंट किंवा कोणत्याही व्यक्तीला चुकीने ट्रान्सफर केल्याच्या कोणत्याही परिस्थितीत बीएफएल कडून कस्टमरला रिफंड केले जाणार नाही.

(iii) बजाज पे वॉलेटवरील कोणत्याही थर्ड-पार्टीच्या साईटच्या वेब-लिंकचा अर्थ त्या वेब-लिंकचे समर्थन असा नाही. अशा कोणत्याही इतर वेब-लिंकचा वापर केल्यास किंवा ती ब्राउझ केल्यास, कस्टमर त्या वेब-लिंकशी संबंधित अटी व शर्तींना बांधील राहील

(iv) बजाज पे वॉलेट वापराशी संबंधित कोणताही वाद झाल्यास बीएफएल रेकॉर्ड्स बजाज पे वॉलेटद्वारे केलेल्या ट्रान्झॅक्शनचे निर्णायक पुरावा म्हणून बंधनकारक असेल.

(v) बीएफएल सर्व कस्टमर कम्युनिकेशन्स वॉलेट, एसएमएस आणि/किंवा ईमेलवर नोटिफिकेशन्स द्वारे पाठवेल आणि असा एसएमएस कस्टमरला मोबाईल फोन ऑपरेटरकडे डिलिव्हरीसाठी सबमिट केल्यानंतर प्राप्त झाल्याचे मानले जाईल. कस्टमरने दिलेल्या कम्युनिकेशन ॲड्रेस/नंबर मधील कोणत्याही त्रुटी किंवा समस्यांसाठी बीएफएल जबाबदार असणार नाही आणि ती कस्टमरची संपूर्ण जबाबदारी असेल.

(vi) कस्टमर बीएफएलकडून ट्रान्झॅक्शनल मेसेजेस सह सर्व कमर्शियल मेसेजेस प्राप्त करण्यास सहमत आहे.

(vii) वॉलेट सर्व्हिस प्राप्तकर्ता आणि वॉलेट सर्व्हिस प्रोव्हायडरच्या संबंधाशिवाय, या वॉलेट / सब वॉलेट अटींमध्ये कोणतेही एजन्सी किंवा रोजगार संबंध, फ्रँचायझर-फ्रँचायजी संबंध, संयुक्त उपक्रम किंवा कस्टमर आणि बीएफएल दरम्यान पार्टनरशिप तयार करण्याचे मानले जाणार नाही.

## (ण) कस्टमर संरक्षण - पीपीआय मध्ये अनधिकृत इलेक्ट्रॉनिक पेमेंट ट्रान्झॅक्शन्स मध्ये कस्टमर्सचे दायित्व मर्यादित करणे

बजाज पे वॉलेटद्वारे अनधिकृत पेमेंट ट्रान्झॅक्शनमुळे उद्भवणाऱ्या कस्टमरचे दायित्व खालील टेबलद्वारे नियंत्रित केले जाईल आणि पुढीलसाठी मर्यादित असेल:

| पीपीआय मार्फत अनधिकृत इलेक्ट्रॉनिक पेमेंट ट्रान्झॅक्शनच्या बाबतीत कस्टमर दायित्व | | |
|---|---|---|
| **सी. नं.** | **तपशील** | **कस्टमरचे कमाल दायित्व** |
| (क) | पीपीआय जारीकर्त्याकडून योगदानात्मक फसवणूक/ निष्काळजीपणा/ कमतरता, पीपीआय-एमटीएस जारीकर्त्यासह (कस्टमरने ट्रान्झॅक्शन रिपोर्ट केले आहे की नाही हे लक्षात न घेता) | शून्य |
| (ख) | थर्ड पार्टी उल्लंघन जिथे कमतरता पीपीआय जारीकर्त्यासह किंवा कस्टमरसह नाही तर सिस्टीममध्ये इतरत्र आहे आणि कस्टमर अनधिकृत पेमेंट ट्रान्झॅक्शन संदर्भात पीपीआय जारीकर्त्यास सूचित करतो. अशा प्रकरणांमधील प्रति ट्रान्झॅक्शन कस्टमर दायित्व पीपीआय जारीकर्त्याकडून कस्टमरद्वारे ट्रान्झॅक्शन कम्युनिकेशन प्राप्त होताना किती दिवस संपले यावर आणि कस्टमरद्वारे पीपीआय जारीकर्त्याकडे अनधिकृत ट्रान्झॅक्शनच्या रिपोर्टिंगवर अवलंबून असेल - | |
| | i. तीन दिवसांच्या आत# | शून्य |
| | ii.. चार ते सात दिवसांत# | ट्रान्झॅक्शन मूल्य किंवा रु. 10,000/- प्रति ट्रान्झॅक्शन, जे कमी असेल ते |
| | iii. सात दिवसांपेक्षा अधिक# | 100% |
| (ग) | कस्टमरच्या निष्काळजीपणामुळे नुकसान झाल्यास जसे की त्याचे/तिचे पेमेंट क्रेडेन्शियल्स शेअर केल्याने झालेले नुकसान, कस्टमर पीपीआय जारीकर्त्याला त्याचे/तिचे अनधिकृत ट्रान्झॅक्शन रिपोर्ट करेपर्यंत संपूर्ण नुकसान भरून काढेल. अनधिकृत ट्रान्झॅक्शनच्या रिपोर्टिंगनंतर होणारे कोणतेही नुकसान पीपीआय जारीकर्त्याद्वारे वहन केले जाईल. | |

| |
|---|
| # वर नमूद केलेल्या दिवसांची संख्या पीपीआय जारीकर्त्याकडून कम्युनिकेशन प्राप्त झाल्याची तारीख वगळता गणली जाईल. |

**(त) बजाज पे वॉलेट सर्व्हिसेस संबंधी तक्रार**

जर तुम्हाला बजाज पे वॉलेट सर्व्हिसेस विषयी काही समस्या असेल तर कृपया संपर्क साधा:

| | |
|---|---|
| लेव्हल 1 | आम्ही तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत, तुमची विनंती करण्यासाठी तुम्हाला खालील स्टेप्सचे अनुसरण करणे आवश्यक आहे:<br>क. बजाज फिनसर्व्ह ॲप > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > विनंती करा<br>ख. बजाज फिनसर्व्ह ॲप > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > 'विनंती करा' बाबतचा तपशील > प्रतिसादाबाबत समाधानी नसल्यास विनंती पुन्हा उघडा, तसेच कस्टमरला एस्कलेट करायचे असल्यास पर्याय देखील आहे<br>कोणत्याही शंकांसाठी तुम्ही टोल-फ्री नंबर 1800 2100 270 वर देखील संपर्क साधू शकता |
| लेव्हल 2 | आम्ही 7 कामकाजाच्या दिवसांमध्ये तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. जर तुम्हाला या वेळेत आमच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही किंवा तुमच्या शंकेच्या आमच्या निराकरणाबाबत तुम्ही समाधानी नसाल तर कस्टमर खालील स्टेप्सचे अनुसरण करू शकतो:<br><br>बजाज फिनसर्व्ह ॲप > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > 'विनंती करा' बाबतचा तपशील > विनंती पुन्हा उघडा, जर प्रतिसादाबाबत समाधानी नसल्यास, तसेच कस्टमरला जर एस्कलेट करायचे असेल तर पर्याय उपलब्ध आहे.<br>कस्टमर grievanceredressalteam@bajajfinserv.in वर देखील लिहू शकतात |
| लेव्हल 3 | जर कस्टमर लेव्हल 2 वर प्रदान केलेल्या निराकरणाबाबत समाधानी नसेल तर कस्टमर निर्धारित प्रदेशानुसार त्याची/तिची तक्रार/शंका नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकाऱ्याकडे पोस्ट करू शकतात.<br><br>तुम्ही https://www.bajajfinserv.in/finance-corporate-ombudsman वरून नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकारी तपशील मिळवू शकता |

| | |
|---|---|
| लेव्हल 4 | जर कस्टमर प्रदान केलेल्या निवारणाबाबत समाधानी नसेल किंवा बीएफएल कडे तक्रार दाखल केल्यानंतर 30 (तीस) दिवसांच्या आत बीएफएल कडून प्रतिसाद प्राप्त झाला नसेल तर कस्टमर तक्रार निवारणासाठी सीएमएस पोर्टलद्वारे किंवा ईमेलद्वारे किंवा आरबीआय येथे सेट-अप केलेल्या सीईपीसी येथे प्रत्यक्ष स्वरूपात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे तक्रार दाखल करू शकतो.<br><br>स्कीम तपशील येथे उपलब्ध आहेत:<br>https://www.rbi.org.in/Scripts/BS_PressReleaseDisplay.aspx?prid=52549 |

**(थ) बजाज पे वॉलेट यूपीआय सर्व्हिसेस संबंधी तक्रार**

जर तुम्हाला बजाज पे वॉलेट यूपीआय सर्व्हिसेस संबंधी काही समस्या असेल तर कृपया संपर्क साधा:

| | |
|---|---|
| लेव्हल 1 | आम्ही तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत, जर वॉलेट यूपीआय ट्रान्झॅक्शन बजाज फिनसर्व्ह ॲपमार्फत केले असेल तर तुम्हाला तुमची विनंती पाठवण्यासाठी खालील स्टेप्सचे अनुसरण करणे आवश्यक आहे:<br><br>क. बजाज फिनसर्व्ह ॲप > पासबुक > ट्रान्झॅक्शन > स्थिती तपासा > तक्रार करा<br><br>ख. बजाज फिनसर्व्ह ॲप > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > विनंती करा<br><br>कोणत्याही शंकांसाठी तुम्ही टोल-फ्री नंबर 1800 2100 270 वर देखील संपर्क साधू शकता |
| लेव्हल 2 | आम्ही 7 कामकाजाच्या दिवसांमध्ये तुमच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत. जर शंका पुढील विवाद टप्प्यांसाठी पात्र ठरल्यास, एनपीसीआय गाईडलाईन्स नुसार निराकरणास वेळ लागू शकतो.<br><br>जर तुम्हाला या वेळेत आमच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही किंवा तुमच्या शंकेच्या आमच्या निराकरणाबाबत तुम्ही समाधानी नसाल तर कस्टमर खालील स्टेप्सचे अनुसरण करू शकतो:<br><br>बजाज फिनसर्व्ह ॲप > मेन्यू > मदत आणि सपोर्ट > 'विनंती करा' बाबतचा तपशील > प्रतिसादाबाबत समाधानी नसल्यास विनंती पुन्हा उघडा, तसेच कस्टमरला एस्कलेट करायचे असल्यास पर्याय उपलब्ध आहे.<br><br>कस्टमर grievanceredressalteam@bajajfinserv.in वर देखील लिहू शकतात |

| | |
|---|---|
| लेव्हल 3 | जर कस्टमर लेव्हल 2 वर प्रदान केलेल्या निराकरणाबाबत समाधानी नसेल तर कस्टमर निर्धारित प्रदेशानुसार त्याची/तिची तक्रार/शंका नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकाऱ्याकडे पोस्ट करू शकतात.<br><br>तुम्ही https://www.bajajfinserv.in/finance-corporate-ombudsman वरून नोडल अधिकारी/मुख्य नोडल अधिकारी तपशील मिळवू शकता |
| लेव्हल 4 | जर कस्टमर प्रदान केलेल्या निवारणाबाबत समाधानी नसेल किंवा बीएफएल कडे तक्रार दाखल केल्यानंतर 30 (तीस) दिवसांच्या आत बीएफएल कडून प्रतिसाद प्राप्त झाला नसेल तर कस्टमर तक्रार निवारणासाठी सीएमएस पोर्टलद्वारे किंवा ईमेलद्वारे किंवा आरबीआय येथे सेट-अप केलेल्या सीईपीसी येथे प्रत्यक्ष स्वरूपात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे तक्रार दाखल करू शकतो.<br><br>स्कीम तपशील येथे उपलब्ध आहेत:<br>https://www.rbi.org.in/Scripts/BS_PressReleaseDisplay.aspx?prid=52549 |

## ख. बजाज पे यूपीआय सर्व्हिसेसच्या अटी व शर्ती

खालील अटी व शर्ती ("**यूपीआय अटी**") बजाज फायनान्स लिमिटेड ("**बीएफएल**") द्वारे तिच्या पीएसपी बँक (खाली परिभाषित केल्याप्रमाणे) मार्फत टीपीएपी (खाली परिभाषित केल्याप्रमाणे) च्या क्षमतेनुसार सुलभ यूपीआय फंड ट्रान्सफर आणि फंड कलेक्शन कृतीच्या तरतुदींसाठी लागू असतील. बीएफएल सर्वोत्तम प्रयत्नांच्या आधारावर येथे निर्दिष्ट अटी व शर्तींच्या अधीन रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ("**आरबीआय**") आणि / किंवा नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ("**एनपीसीआय**") आणि / किंवा अन्य कोणत्याही सक्षम प्राधिकरणाद्वारे वेळोवेळी जारी यूपीआय गाईडलाईन्स, सर्क्युलर्स आणि / किंवा रेग्युलेशन्स (एकत्रितपणे "**गाईडलाईन्स**" म्हणून संदर्भित) नुसार कस्टमरना यूपीआय सुविधा (खाली परिभाषित केल्याप्रमाणे) प्रदान करण्याचा प्रयत्न करेल.

बीएफएल हे प्रायोजक पीएसपी बँक म्हणजेच Axis Bank Ltd. आणि Yes Bank Ltd. द्वारे पेमेंट सुलभ करण्यासाठी एनपीसीआय द्वारे अधिकृत टीपीएपी आहे. बीएफएल यूपीआय पेमेंट इकोसिस्टीममध्ये सर्व्हिस प्रोव्हायडर आहे आणि आम्ही पीएसपी बँकद्वारे यूपीआय मध्ये सहभागी होतो.

### 1. व्याख्या

या सेक्शन मध्ये खालील शब्द आणि वाक्प्रचारांचे अर्थ त्यांच्या विरुद्धार्थ ठेवलेले आहेत जोपर्यंत संदर्भ अन्यथा सूचित करत नाही:

**"बँक अकाउंट"** म्हणजे भारतातील कोणत्याही बँकमध्ये कस्टमरचे सेव्हिंग्स आणि/किंवा करंट अकाउंट, जे यूपीआय सुविधेद्वारे कामकाजासाठी वापरले जातील.

**"कस्टमर"** म्हणजे अर्जदार / रेमिटर त्याच्या/तिच्या अकाउंटद्वारे यूपीआय सुविधेचा लाभ घेणारे.

**"एनपीसीआय यूपीआय सिस्टीम"** म्हणजे पूर्व-मंजूर ट्रान्झॅक्शन कार्यक्षमतेद्वारे किंवा गाईडलाईन्स नुसार विचारात घेतल्याप्रमाणे यूपीआय आधारित फंड ट्रान्सफर आणि फंड कलेक्शन सुविधा प्रदान करण्यासाठी एनपीसीआयच्या मालकीचे स्विच आणि संबंधित उपकरण आणि सॉफ्टवेअर;

**"पेमेंट सूचना"** म्हणजे कस्टमरचे अकाउंट डेबिट करून नियुक्त लाभार्थीच्या नियुक्त अकाउंटमध्ये भारतीय रुपयांमध्ये व्यक्त केलेल्या ठराविक रकमेसाठी फंड ट्रान्सफर करण्यासाठी यूपीआय सुविधेचा वापर करून कस्टमरने जारी केलेली विनाअट सूचना होय.

**"पीएसपी बँक"** म्हणजे एनपीसीआय यूपीआय सिस्टीमशी कनेक्ट असलेली यूपीआय सदस्य बँक जी बीएफएलला त्यांच्या कस्टमर्सना यूपीआय सुविधा प्रदान करण्यास सक्षम करते.

**"टीपीएपी"** म्हणजे पीएसपी बँक मार्फत यूपीआय मध्ये सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणून सहभागी होणारे बीएफएल

**"यूपीआय"** म्हणजे एनपीसीआय द्वारे त्यांच्या सदस्य बँकांच्या सहकार्याने ऑफर केलेली युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस सर्व्हिस.

**"यूपीआय अकाउंट"** किंवा **"यूपीआय सुविधा"** किंवा **"यूपीआय आयडी"** म्हणजे गाईडलाईन्स नुसार एनपीसीआय यूपीआय सिस्टीम द्वारे बीएफएलद्वारे त्यांच्या कस्टमर्सना प्रदान केलेली/सुलभ केलेली इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर आणि फंड कलेक्शन सुविधा आधारित युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस सर्व्हिस.

(या फॉर्ममध्ये वापरलेले शब्द किंवा अभिव्यक्ती, परंतु येथे विशेषत: परिभाषित केलेले नाहीत, गाईडलाईन्स नुसार त्यांना नियुक्त केलेला संबंधित अर्थ असेल.)

## 2. सामान्य अटी व शर्ती

(क) कस्टमर याद्वारे सहमत आहे आणि मान्य करतो की यूपीआय सुविधा प्राप्त करण्यासाठी कस्टमरने एकवेळ रजिस्टर करण्याच्या माध्यमातून, बीएफएल द्वारे विहित केल्यानुसार आणि रीतीने वन-टाइम रजिस्ट्रेशन करावे, आणि बीएफएल त्यांच्या योग्य विवेकबुद्धीनुसार अशी विनंती स्वीकारू किंवा नाकारू शकतात. कस्टमरला व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस ("**यूपीआय व्हीपीए**") सेट करण्यासाठी पर्याय प्रदान केला जाईल. कस्टमरने एनपीसीआय द्वारे परिभाषित आणि प्रमाणीत वन-टाइम रजिस्ट्रेशन प्रोसेस मार्फत अन्य बँक अकाउंट्स लिंक करावेत आणि त्यानंतर त्यावर ट्रान्झॅक्शन स्टार्ट करावे. यूपीआय सुविधेचा ॲक्सेस करण्याद्वारे, कस्टमर या यूपीआय अटी मान्य करतो, पुढे या अटी वेळोवेळी जारी केलेल्या गाईडलाईन्सच्या अतिरिक्त आहेत आणि त्यांचा अवमान करत नाहीत.

(ख) कस्टमर यूपीआय सुविधा प्राप्त करण्यासाठी सदर यूपीआय व्हीपीए ॲक्सेस करण्यास सक्षम असेल. कस्टमर याद्वारे सहमत आहे आणि मान्य करतो की संपूर्ण डिव्हाईस रजिस्ट्रेशन प्रोसेस आणि पिन/पासवर्ड सेटिंग प्रोसेस पूर्ण करणे ही यूपीआय सुविधेच्या संपूर्ण कार्यक्षमतेच्या सक्रियण आणि वापरासाठी एक आवश्यक शर्त आहे. कस्टमर यूपीआय मार्फत ट्रान्झॅक्शन सक्षम करण्यासाठी

एनपीसीआय द्वारे परिभाषित आणि प्रमाणीत वन-टाइम रजिस्ट्रेशन प्रोसेस द्वारे अन्य बँक अकाउंट्स लिंक करू शकतात.

(ग) कस्टमर याद्वारे मान्य करतो की कस्टमरने गाईडलाईन्स वाचल्या आणि समजल्या आहेत आणि सहमत आहे की येथे आणि या यूपीआय अटींमध्ये दिलेले हक्क आणि दायित्व कस्टमरशी संबंधीत असल्याने एनपीसीआय यूपीआय सिस्टीममधील अंमलबजावणीसाठी कस्टमरद्वारे जारी प्रत्येक पेमेंट सूचनेसंदर्भात कस्टमरवर बंधनकारक असेल. कस्टमर समजतो आणि मान्य करतो की यूपीआय सुविधेच्या वापराच्या बाबतीत एनपीसीआय किंवा यूपीआय अटींनुसार बीएफएल व्यतिरिक्त एनपीसीआय यूपीआय सिस्टीममधील कोणताही सहभागी सापेक्ष कोणताही करार किंवा अन्य अधिकार निर्माण केला जात नाही. यूपीआय सुविधेशी संबंधित ट्रान्झॅक्शन लिमिट वेळोवेळी अपडेट होणाऱ्या गाईडलाईन्स नुसार असावी.

## 3. यूपीआय सुविधेची व्याप्ती

यूपीआय सुविधा कस्टमरला त्वरित, इंटरबँक इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर, फंड कलेक्शन सर्व्हिस, यूपीआय नंबर, यूपीआय-वन टाइम आणि रिकरिंग मँडेट संबंधित सर्व्हिसेस ऑफर करते. कस्टमर त्यांच्या युनिक पद्धतीने निर्मित यूपीआय व्हीपीएचा वापर करून त्यांच्या/तिच्या कोणत्याही लिंक केलेल्या अकाउंटसाठी टीपीएपी ॲप्लिकेशनमधून फंड ट्रान्सफर किंवा फंड कलेक्शन किंवा फंड कलेक्शनसाठी प्रतिसादासाठी विनंती करू शकतात.

## 4. फी आणि शुल्क

(क) यूपीआय सुविधा प्राप्त करण्यासाठी लागू फी आणि शुल्क रेग्युलेटर द्वारे फिक्स्ड रेट्स नुसार असेल. गाईडलाईन्स नुसार, बीएफएल कस्टमरला कोणतीही पूर्वसूचना न देता अशी फी व शुल्क संपूर्ण विवेकबुद्धीनुसार अपडेट करू शकते.

(ख) यूपीआय सुविधेचा वापर करून केलेल्या पेमेंटच्या परिणामी देय असलेले कोणतेही सरकारी शुल्क, ड्युटी किंवा डेबिट किंवा टॅक्स कस्टमरची जबाबदारी असेल आणि जर बीएफएलवर लादले असेल तर कस्टमर सापेक्ष असे शुल्क, ड्युटी किंवा टॅक्स डेबिट करेल.

## 5. कस्टमरचे हक्क आणि दायित्व

(क) बीएफएलद्वारे अंमलबजावणीसाठी पेमेंट सूचना जारी करण्यासाठी कस्टमर सर्व्हिसच्या अन्य अटी व शर्तींच्या अधीन राहून हक्कदार असेल. कस्टमरद्वारे बीएफएलने विहित केलेल्या फॉर्ममध्ये पेमेंट सूचना जारी केली जाईल, जी सर्व तपशीलांमध्ये पूर्ण आहे. यूपीआय सुविधेसाठी पेमेंट सूचनेमध्ये दिलेल्या तपशिलाच्या अचूकतेसाठी कस्टमर जबाबदार असेल आणि पेमेंट सूचनेमध्ये कोणत्याही त्रुटीमुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही नुकसानीसाठी बीएफएलला भरपाई देण्यास जबाबदार असेल.

(ख) जर बीएफएलने चांगल्या विश्वासाने पेमेंट सूचना अंमलात आणली असेल आणि कस्टमरने दिलेल्या सूचनांचे अनुपालन केले असेल तर कस्टमरला बीएफएलद्वारे अंमलात आणल्या जाणाऱ्या कोणत्याही पेमेंट सूचना बंधनकारक असतील.

(ग) कस्टमर पेमेंट सूचनांच्या मार्गाने प्राप्त झालेल्या सूचनांनुसार बीएफएल ला अकाउंट डेबिट करण्यास अधिकृत करतो. कस्टमरला हे माहित आहे की जरी एकाधिक बँक अकाउंट यूपीआय सुविधेसह लिंक केले जाऊ शकतात, तरीही डिफॉल्ट अकाउंटमधून डेबिट/क्रेडिट ट्रान्झॅक्शन केले जाऊ शकतात. कस्टमर वेगळ्या अकाउंटमधून असे डेबिट/क्रेडिट ट्रान्झॅक्शन सुरू करण्यापूर्वी डिफॉल्ट अकाउंट बदलू शकतो.

(घ) बीएफएलद्वारे पेमेंट सूचना अंमलबजावणीच्या वेळी/पूर्वी पेमेंट सूचना पूर्ण करण्यासाठी कस्टमर त्याच्या अकाउंटमध्ये फंडची उपलब्धता सुनिश्चित करेल. कस्टमरने जारी केलेल्या सूचनेच्या अंमलबजावणीसाठी कस्टमरच्या वतीने बीएफएल द्वारे झालेल्या कोणत्याही दायित्वासाठी कस्टमरचे अकाउंट डेबिट करण्यासाठी कस्टमर याद्वारे बीएफएलला अधिकृत करतो. कस्टमरला मान्य आणि सहमत आहे की एकदा फंड कलेक्शन विनंती स्वीकारली गेल्यानंतर, डिफॉल्ट अकाउंट ऑटोमॅटिकरित्या अशा रकमेसह क्रेडिट केले जाईल जे फंड कलेक्शन विनंतीमध्ये नमूद केले जाऊ शकतात. **कस्टमरला मान्य आणि सहमत आहे की डिफॉल्ट अकाउंटमध्ये जमा केल्यानंतर अशी रक्कम कस्टमरद्वारे परत केली जाऊ शकत नाही.**

(ङ) कस्टमर सहमत आहे की पेमेंट सूचना बीएफएल द्वारे अंमलात आणल्यावर अपरिवर्तनीय होईल.

(च) कस्टमर सहमत आहे की तो यूपीआय सुविधेच्या संदर्भात आरबीआय आणि/किंवा एनपीसीआय सापेक्ष कोणताही क्लेम करण्यास पात्र नसेल.

(छ) कस्टमर सहमत आहे की फंड ट्रान्सफर पूर्ण होण्यात कोणत्याही विलंबासाठी किंवा फंड ट्रान्सफरच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटीमुळे झालेले कोणतेही नुकसान यासाठी बीएफएल जबाबदार असणार नाही.

(ज) यूपीआय सुविधा प्राप्त करताना कस्टमरने बीएफएलला अचूक लाभार्थी तपशील प्रदान करावे. ज्या कारणामुळे फंड चुकीच्या लाभार्थीला ट्रान्सफर केला जातो असे चुकीचा व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस किंवा चुकीचा मोबाईल नंबर किंवा बँक अकाउंट नंबर किंवा आयएफएससी कोड असे चुकीचे लाभार्थी तपशील एन्टर करण्यासाठी कस्टमर पूर्णपणे जबाबदार असेल.

(झ) कस्टमर सहमत आहे की मोबाईल बँकिंग वर आरबीआयच्या गाईडलाईन्स नुसार यूपीआय सुविधा देऊ केली जाते जी वेळोवेळी बदलाच्या अधीन आहे.

(ञ) कस्टमरने बीएफएलला कोणत्याही प्राधिकरणाद्वारे विचारण्यात आलेली कोणतीही चौकशी, प्रश्न किंवा समस्यांबाबत त्वरित कळवावे, ज्या प्राधिकरणात समावेश होतो परंतु मर्यादित नाही असे कोणतेही वैधानिक प्राधिकरण किंवा बीएफएल संबंधित अधिकारी, तसेच बीएफएलला कोणतीही कारणे दाखवा नोटीस, जप्ती किंवा तत्सम कारवाईबद्दल त्वरित सूचित करावे आणि अशा प्राधिकरणाकडून प्राप्त कोणत्याही नोटीस, मेमो, पत्रव्यवहाराच्या कॉपी प्रदान कराव्यात. कस्टमरने बीएफएलच्या कोणत्याही पूर्व मंजुरीशिवाय अशा प्राधिकरणाला कोणताही एकतर्फी प्रतिसाद / उत्तर देऊ नये.

(ट) कस्टमर यूपीआय सुविधा प्राप्त करण्याच्या उद्देशाने सर्व वेळी बँक अकाउंटमध्ये पुरेसा फंड उपलब्ध करून देण्यासाठी पूर्णपणे जबाबदार असेल. कस्टमर सहमत आहे की अकाउंटमध्ये पुरेसा फंड नसल्यास, बीएफएल कस्टमरने केलेली ट्रान्झॅक्शन सूचना विनंती नाकारेल.

(ठ) कस्टमरला मान्य आहे आणि समजतो की बीएफएल कस्टमरला परिभाषित यूपीआय नंबर (हा बाय डिफॉल्ट तुमचा मोबाईल नंबर असेल) वापरून पैसे पाठविण्यासाठी किंवा प्राप्त करण्यासाठी सक्षम करण्यासाठी 'न्यूमरिक यूपीआय आयडी मॅपर' अशा एनपीसीआय ऑपरेटेड सेंट्रलाईज्ड मॅपरवर ऑनबोर्ड करेल आणि कस्टमर मान्य करतो आणि संमती प्रदान करतो की असे ऑनबोर्डिंग एनपीसीआयच्या परिभाषित व परवानगी असलेल्या स्ट्रक्चर अंतर्गत कस्टमरच्या वतीने बीएफएलद्वारे पूर्ण केले जाईल. ही प्रोसेस एनपीसीआयच्या निर्देषानुसार असेल आणि ज्यात समावेश असेल परंतु मर्यादित नसेल असे कस्टमरचे यूपीआय तपशील (यूपीआय सर्व्हिसेस प्रदान करण्यासाठी बीएफएलद्वारे संग्रहित आणि देखरेख ठेवलेले) एनपीसीआयसोबत शेअर करणे व कस्टमरच्या यूपीआय नंबरसोबत डिफॉल्ट बँक अकाउंट/व्हीपीए लिंक करणे. यामुळे कस्टमरच्या यूपीआय नंबरसापेक्ष कस्टमर पेमेंट स्वीकारू शकतो. बीएफएल कस्टमरला बीएफएल मोबाईल ॲप्लिकेशनवर प्रक्रिया केलेल्या यूपीआय नंबरचे डिफॉल्ट मॅपिंग डी-लिंक करण्याचा पर्याय प्रदान करेल. कस्टमर पुढे बीएफएलवर रजिस्टर्ड अन्य युजरकडून फंड प्राप्त करण्याचे मान्य करतो आणि संमती देतो की बीएफएल एनपीसीआय मॅपरसोबत चेक न करता कस्टमरच्या लिंक केलेल्या डिफॉल्ट बँक अकाउंटमध्ये असे ट्रान्झॅक्शन करेल.

(ड) **वन टाइम मँडेट:** यूपीआय मँडेट सध्या कमिटमेंट देऊन नंतर पैसे ट्रान्सफर करण्याच्या परिस्थितीत वापरता येऊ शकते. यूपीआय 2.0 मँडेट्स ट्रान्झॅक्शनसाठी वन टाइम ब्लॉक कार्यक्षमतेसह तयार केलेले आहेत. कस्टमर ट्रान्झॅक्शन पूर्व-अधिकृत करू शकतात आणि नंतरच्या तारखेला पेमेंट करू शकतात. यूपीआय मँडेट त्वरित तयार व अंमलात आणले जाऊ शकतात. वास्तविक खरेदीच्या तारखेला रक्कम कपात केली जाईल आणि परिस्थितीनुसार लाभार्थीस मग तो मर्चंट असो किंवा व्यक्ती प्राप्त होईल. मँडेट अंमलबजावणी केवळ प्रारंभ तारीख व समाप्ती तारीख यादरम्यान होईल. जर कोणतेही मँडेट ॲक्टिव्ह असेल आणि यूपीआय आयडी साठी थकित असेल तर कस्टमरद्वारे यूपीआय आयडी डी-रजिस्ट्रेशनला अनुमती दिली जाणार नाही. प्रति मँडेट मर्यादा मात्र रु. 1,00,000/- आहे. मँडेट्स हे मँडेटच्या रिकरन्स पॅटर्नवर आधारित कमाल कालावधीकरिता किंवा वेळोवेळी विहित अन्य कोणत्याही कालावधीकरिता वैध असतील.

(ढ) **रिकरिंग मँडेट:**

i. **मँडेटचे रजिस्ट्रेशन:** रिकरिंग मँडेटमध्ये, कस्टमर पूर्व-निवडलेल्या वैधता कालावधीसाठी आणि निर्धारित फ्रिक्वेन्सी साठी वन-टाइम ऑथोरायझेशन द्वारे मँडेट शेड्यूल करण्यास सक्षम असेल. यामुळे कस्टमरच्या यूपीआय लिंक्ड अकाउंटमधून रिकरिंग डेबिटला अनुमती मिळेल. मँडेट हे पेई द्वारे सुरू केलेले असू शकते. मँडेट कस्टमरच्या संमतीसह रजिस्टर्ड असावे.

ii. **मँडेटची सुधारणा:** मँडेट सुधारण्याची विनंती पेई द्वारे पाठवली जाऊ शकते ज्याने मँडेट सुरू केला आहे. सुधारणा मंजूर करण्यासाठी अंतिम अधिकार कस्टमरला असेल. सुधारणा केवळ कस्टमरच्या संमतीवर लागू केल्या जातील.

iii. **मँडेट पॉझ करणे आणि पुन्हा सुरू करणे:** पेयर कडे कालावधीसाठी मँडेट पॉझ करण्याचा पर्याय असेल आणि अशा वेळेसाठी, मँडेट इन-ॲक्टिव्ह राहील. पॉझ केलेल्या मँडेटवर पेई ने सुरू केलेले कोणतेही ट्रान्झॅक्शन नाकारले जाईल. पेयर कडे मँडेटच्या वैधता कालावधीदरम्यान पॉझ केलेले मँडेट पुन्हा सुरू करण्याचा पर्याय देखील असेल. जेव्हा कस्टमर त्याच्या/तिच्या यूपीआय पिनचा वापर करून अधिकृत असेल तेव्हाच मँडेट पॉझ किंवा पुन्हा सुरू केला जाऊ शकतो.

iv. **मँडेट रद्द करणे:** लोन आणि ईएमआय आधारित मँडेट वगळता कोणतेही यूपीआय मँडेट कोणत्याही पार्टी द्वारे मागे घेतले/रद्द केले जाऊ शकते. मँडेट रद्द करण्यासाठी पेयर कडे यूपीआय पिन असणे आवश्यक आहे. जेव्हा पेई मँडेट रद्द करण्यासाठी सुरू करतो तेव्हा यूपीआय पिनची आवश्यकता नाही.

v. **मँडेटशी संबंधित अतिरिक्त अटी:** (क) जर पहिली अंमलबजावणी तारीख ही मँडेट निर्मितीची तारीख असेल तर कस्टमरला मँडेट निर्मिती अधिकृत करणे आवश्यक आहे आणि त्वरित अंमलबजावणीसाठी कोणत्याही वेगळ्या अधिकृततेची गरज नाही. (ख) जर पहिली अंमलबजावणी तारीख ही भविष्यातील तारीख असेल तर कस्टमरला यूपीआय पिनसह आवश्यक माहितीसह अंमलबजावणी अधिकृत करणे आवश्यक आहे. (ग) कोणत्याही कारणामुळे कोणतीही अंमलबजावणी अयशस्वी झाल्यास दहावेळा पुन्हा प्रयत्न करण्याची अनुमती असावी. दहावा प्रयत्न देखील अयशस्वी झाल्यास त्या विशिष्ट तारखेच्या ट्रान्झॅक्शनच्या प्रोसेसिंगसाठी संबंधित मँडेट अंमलबजावणी अयशस्वी होईल, तथापि, मँडेट वैध असेल आणि भविष्यातील अंमलबजावणीसाठी ॲक्टिव्ह असेल. (घ) तथापि, जर मँडेटची पहिली अंमलबजावणी अयशस्वी झाली (दहा प्रयत्नांसह), संपूर्ण मँडेट रद्द केले जाईल. (ङ) रिकरिंग मँडेटची अंमलबजावणीसाठी उच्चतम मर्यादा ही रु.15,000/- आहे/-. (च) मँडेट ट्रान्झॅक्शनच्या पहिल्या 5 मिनिटांत जर मँडेटचे ट्रान्झॅक्शन मूल्य रु. 15000/- पेक्षा कमी असेल तर यूपीआय पिन वापरून एक्स्प्रेस अधिकृततेची आवश्यकता नाही. (छ) जर कोणतीही मँडेट अंमलबजावणी/ट्रान्झॅक्शन रक्कम रु. 15,000/- पेक्षा जास्त असेल तर कस्टमरला अंमलबजावणी करण्याआधी प्रत्येकवेळी एक्स्प्रेस अधिकृतता प्रदान करणे गरजचे आहे. (ज) जर कोणतेही मँडेट ॲक्टिव्ह असेल आणि यूपीआय आयडी साठी थकित असेल तर यूपीआय आयडी डी-रजिस्ट्रेशनला अनुमती नसेल. (झ) लोन पेमेंट, ईएमआय कलेक्शनसाठी सुरू केलेले ऑटोपे ट्रान्झॅक्शन नाकारणे आणि पेमेंट आणि सेटलमेंट सिस्टीम ॲक्टच्या सेक्शन 25 अंतर्गत नमूद केल्याप्रमाणे कस्टमरच्या बँक अकाउंटमध्ये फंड अपुरे असल्यामुळे कोणतेही कायदेशीररित्या अंमलात आणण्यायोग्य कर्ज किंवा इतर दायित्वाच्या डिस्चार्जसाठी पैसे भरणे हे सदर सेक्शन नुसार इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफरचा अनादर असेल आणि कस्टमरने केलेल्या कायद्यांतर्गत दंडात्मक परिणामांचा समावेश असलेल्या गुन्हा मानले जाईल.

## 6. बीएफएलचे हक्क आणि दायित्वे

(क) बीएफएल कस्टमरद्वारे जारी आणि योग्यरित्या अधिकृत केलेल्या पेमेंट सूचनेची अंमलबजावणी करेल, जोपर्यंत:

(i) कस्टमरच्या बँक अकाउंटमध्ये उपलब्ध असलेले फंड पुरेसे नाहीत किंवा पेमेंट सूचनेचे पालन करण्यासाठी फंड योग्यरित्या लागू/उपलब्ध नाहीत,

(ii) पेमेंट सूचना अपूर्ण आहे, किंवा बीएफएलद्वारे (गाईडलाईन्स नुसार) विहित केलेल्या मान्य फॉर्म आणि पद्धतीमध्ये जारी केलेली नाही,

(iii) बीएफएल कडे विश्वास ठेवण्याचे कारण आहे की बेकायदेशीर ट्रान्झॅक्शन करण्यासाठी पेमेंट सूचना जारी केली जाते, किंवा

(iv) एनपीसीआय यूपीआय सिस्टीम अंतर्गत पेमेंट सूचनेची अंमलबजावणी केली जाऊ शकत नाही.

(ख) बीएफएलने स्वीकार केल्याशिवाय कस्टमरने जारी केलेल्या कोणत्याही पेमेंट सूचना बीएफएलवर बंधनकारक असणार नाही.

(ग) बीएफएल प्रत्येक पेमेंट सूचनेच्या अंमलबजावणीसाठी जर विहित केले असल्यास देय शुल्कासह एकत्रित ट्रान्सफर करण्याच्या फंडच्या रकमेसह कस्टमरचे नियुक्त बँक अकाउंट डेबिट करण्यास पात्र असेल.

(घ) फंड ट्रान्सफर किंवा फंड कलेक्शन पूर्ण झाल्यानंतर किंवा फंड कलेक्शन विनंतीला प्रतिसाद मिळाल्यानंतर ट्रान्झॅक्शनचे योग्यरित्या प्रमाणित रेकॉर्ड बीएफएलच्या मोबाईल ॲप्लिकेशन मधील अकाउंट स्टेटमेंटमध्ये रेकॉर्ड केले जाईल. ज्या बँकेत अकाउंट आहे त्या बँकेने कस्टमरला दिलेल्या अकाउंट स्टेटमेंटमध्ये देखील ट्रान्झॅक्शन रेकॉर्ड केले जाईल. कस्टमर, बँकेकडून मासिक स्टेटमेंट प्राप्त झाल्याच्या तारखेपासून दहा (10) दिवसांच्या आत, पेमेंट सूचनेच्या अंमलबजावणी मधील कोणतीही विसंगती बीएफएलला रिपोर्ट करेल. **कस्टमर सहमत आहे की जर तो निर्धारित कालावधीमध्ये विसंगतीचा रिपोर्ट करण्यात अयशस्वी झाला तर तो पेमेंट सूचनेच्या अंमलबजावणीच्या अचूकतेची किंवा त्याच्या अकाउंट मधून डेबिट केलेल्या रकमेसाठी विवाद करण्यास पात्र असणार नाही.**

(ङ) कस्टमरला यूपीआय सुविधा प्रदान करण्यासाठी बीएफएल या संदर्भात एनपीसीआय ने विहित केलेल्या प्रोसेसचे अनुसरण करेल, ज्यामध्ये गाईडलाईन्स नुसार एनपीसीआय ने विहित केलेल्या काल मर्यादेच्या आत टाइम-आउट झालेले ट्रान्झॅक्शन्स सेटल करण्याची प्रोसेस समाविष्ट आहे परंतु यापुरते मर्यादित नाही.

(च) बीएफएल कस्टमरला त्याच्या/तिच्या आवडीचे यूपीआय व्हीपीए हँडल प्रदान करण्याचा सर्वोत्तम प्रयत्न करेल, तथापि विनंती केलेला यूपीआय व्हीपीए वाटप करण्याचा किंवा वाटप न करण्याचा बीएफएलचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल. बीएफएल कडे कोणत्याही वेळी यूपीआय व्हीपीए विद्ड्रॉ करण्याचा हक्क राखीव आहे जर ते गाईडलाईन्स द्वारे विहित आवश्यकतांनुसार नसल्याचे आढळून आले. याव्यतिरिक्त, जर ते कोणत्याही थर्ड पार्टी बौद्धिक संपदा हक्काचे उल्लंघन करत असेल किंवा अशा कोणत्याही अनपेक्षित परिस्थितीचे समर्थन करणारे असेल तर कोणत्याही फसव्या कृती, चुकीची कृत्ये, गैर-वापरासाठी वापरलेले कोणतेही यूपीआय व्हीपीए होल्ड करण्याचा, थांबविण्याचा, डिलिट, रिसेट करण्याचा अधिकार बीएफएलकडे राखीव आहे.

**6क. एनपीसीआय च्या भूमिका आणि जबाबदाऱ्या**

(क) एनपीसीआय युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) प्लॅटफॉर्मचे मालक आहे आणि ऑपरेट करते.

(ख) एनपीसीआय यूपीआय च्या संदर्भात सहभागींच्या नियम, रेग्युलेशन्स, गाईडलाईन्स आणि संबंधित भूमिका, जबाबदाऱ्या आणि दायित्वे निर्धारित करते. यामध्ये ट्रान्झॅक्शन प्रोसेसिंग आणि सेटलमेंट, विवाद मॅनेजमेंट आणि सेटलमेंटसाठी कट-ऑफ क्लिअर करणे देखील समाविष्ट आहे.

(ग) एनपीसीआय जारीकर्ता बँक, पीएसपी बँक, थर्ड पार्टी ॲप्लिकेशन प्रोव्हायडर्स (टीपीएपी) आणि यूपीआय मधील प्रीपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट इश्यूअर्स (पीपीआय) च्या सहभागाला मंजूरी देते.

(घ) एनपीसीआय सेफ, सिक्युअर आणि कार्यक्षम यूपीआय सिस्टीम आणि नेटवर्क प्रदान करते.

(ङ) यूपीआय मध्ये सहभागी होणाऱ्या सदस्यांना एनपीसीआय ऑनलाईन ट्रान्झॅक्शन रुटिंग, प्रोसेसिंग आणि सेटलमेंट सर्व्हिसेस प्रदान करते.

(च) एनपीसीआय, थेट किंवा थर्ड पार्टीद्वारे, यूपीआय सहभागींवर ऑडिट आयोजित करू शकते आणि यूपीआय मध्ये त्यांच्या सहभागाशी संबंधित डाटा, माहिती आणि रेकॉर्ड्स मागवू शकते.

(छ) एनपीसीआय सहभागी बँकांना सिस्टीमचा यूपीआय ॲक्सेस प्रदान करते जिथे ते रिपोर्ट्स डाउनलोड करू शकतात, चार्जबॅक वाढवू शकतात, यूपीआय ट्रान्झॅक्शनची स्थिती अपडेट करू शकतात.

**6ख. पीएसपी बँकेच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या**

(क) पीएसपी बँक ही यूपीआय ची सदस्य आहे आणि यूपीआय पेमेंट सुविधा प्राप्त करण्यासाठी आणि त्यास टीपीएपी ला प्रदान करण्यासाठी यूपीआय प्लॅटफॉर्मशी कनेक्ट करते जे यूपीआय पेमेंट्स करण्यास आणि स्वीकारण्यास एंड-यूजर कस्टमर/मर्चंटला सक्षम करते

(ख) पीएसपी बँक, त्यांच्या स्वत:च्या ॲप किंवा टीपीएपी च्या ॲपमार्फत, एंड-यूजर कस्टमर्सला ऑन-बोर्ड आणि यूपीआय वर रजिस्टर करते आणि त्यांच्या बँक अकाउंटला त्यांच्या संबंधित यूपीआय आयडीसह लिंक करते.

(ग) एंड-यूजर कस्टमरच्या रजिस्ट्रेशनच्या वेळी स्वत:च्या ॲप किंवा टीपीएपी ॲपद्वारे अशा कस्टमरच्या प्रमाणीकरणासाठी पीएसपी बँक जबाबदार आहे

(घ) पीएसपी बँक एंड-यूजर कस्टमर्सना टीपीएपी चे यूपीआय ॲप उपलब्ध करून देण्यासाठी टीपीएपी ला सहभागी आणि ऑन-बोर्ड करते

(ङ) यूपीआय प्लॅटफॉर्मवर काम करण्यासाठी टीपीएपी आणि त्यांच्या सिस्टीम्स पुरेशा प्रमाणात सुरक्षित असल्याची खात्री पीएसपी बँकेला करावी लागेल

(च) यूपीआय ट्रान्झॅक्शन डाटा तसेच यूपीआय ॲप सिक्युरिटी यासह एंड-यूजर कस्टमरच्या डाटा आणि माहितीची सिक्युरिटी आणि अखंडता सुरक्षित ठेवण्यासाठी यूपीआय ॲप आणि टीपीएपी सिस्टीम ऑडिट केले जातात याची खात्री करण्यासाठी पीएसपी बँक जबाबदार आहे

(छ) केवळ भारतातच यूपीआय ट्रान्झॅक्शन सुलभ करण्याच्या उद्देशाने संकलित केलेल्या यूपीआय ट्रान्झॅक्शन डाटासह सर्व पेमेंट डाटा पीएसपी बँकेला स्टोअर करावा लागेल

(ज) पीएसपी बँक सर्व यूपीआय कस्टमर्सना यूपीआय प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असलेल्या बँकांच्या लिस्टमधून कस्टमरच्या यूपीआय आयडी शी लिंक करण्यासाठी कोणतेही बँक अकाउंट निवडण्याचा पर्याय देण्यासाठी जबाबदार आहे.

(झ) एंड-यूजर कस्टमरने केलेल्या तक्रारी आणि विवादांचे निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करण्यासाठी पीएसपी बँक जबाबदार आहे.

**6ग. टीपीएपी च्या भूमिका आणि जबाबदाऱ्या**

(क) टीपीएपी हा सर्व्हिस प्रोव्हायडर आहे आणि पीएसपी बँकेद्वारे यूपीआय मध्ये सहभागी होतो

(ख) यूपीआय मध्ये टीपीएपी च्या सहभाग संबंधित पीएसपी बँक आणि एनपीसीआय द्वारे विहित सर्व आवश्यकतांचे पालन करण्यासाठी टीपीएपी जबाबदार आहे

(ग) यूपीआय प्लॅटफॉर्मवर काम करण्यासाठी त्यांच्या सिस्टीम्स पुरेशा प्रमाणात सुरक्षित आहेत याची खात्री करण्यासाठी टीपीएपी जबाबदार आहे

(घ) या संदर्भात एनपीसीआय द्वारे जारी केलेल्या सर्व सर्क्युलर्स आणि गाईडलाईन्स सह यूपीआय आणि यूपीआय प्लॅटफॉर्मवर टीपीएपी च्या सहभागाच्या संबंधात कोणत्याही वैधानिक किंवा रेग्युलेटरी प्राधिकरणाद्वारे विहित केलेल्या सर्व लागू कायदे, नियम, रेग्युलेशन्स आणि गाईडलाईन्स इत्यादींचे पालन करण्यासाठी टीपीएपी जबाबदार आहे

(ङ) केवळ भारतातच यूपीआय ट्रान्झॅक्शन सुलभ करण्याच्या उद्देशाने टीपीएपी द्वारे संकलित केलेल्या यूपीआय ट्रान्झॅक्शन डाटासह सर्व पेमेंट डाटा टीपीएपी ला स्टोअर करावा लागेल

(च) टीपीएपी आरबीआय आणि एनपीसीआय द्वारे जेव्हा आवश्यक असेल तेव्हा यूपीआय शी संबंधित टीपीएपी चा डाटा, माहिती, सिस्टीम्स ॲक्सेस करण्यासाठी आणि टीपीएपी चे ऑडिट करण्यासाठी आरबीआय/एनपीसीआय द्वारे नामनिर्देशित आरबीआय, एनपीसीआय आणि इतर एजन्सीजना सुविधा देण्यासाठी जबाबदार आहे

(छ) टीपीएपी एंड-यूजर कस्टमरना टीपीएपी च्या यूपीआय ॲप किंवा वेबसाईट आणि ईमेल, मेसेजिंग प्लॅटफॉर्म, आयव्हीआर इ. सारख्या टीपीएपी द्वारे योग्य मानलेल्या अशा इतर चॅनेलद्वारे उपलब्ध केलेल्या टीपीएपी च्या तक्रार निवारण सुविधेद्वारे तक्रार नोंदविण्याचा पर्याय सुलभ करेल.

**6घ. विवाद निवारण यंत्रणा**

(क) प्रत्येक यूजर पीएसपी ॲप / टीपीएपी ॲपवर यूपीआय ट्रान्झॅक्शन संबंधी तक्रार करू शकतो.

(ख) यूजर संबंधित ट्रान्झॅक्शन निवडू शकतात आणि त्यासंबंधी तक्रार करू शकतात.

(ग) युजरच्या सर्व यूपीआय संबंधित समस्या / तक्रारींच्या संदर्भात संबंधित टीपीएपी कडे प्रथम तक्रार करण्यात येईल. तक्रार / समस्येचे निराकरण न झाल्यास, एस्कलेशनची पुढील लेव्हल पीएसपी बँक

असेल, त्यानंतर कस्टमरच्या बँक आणि एनपीसीआय अशाच ऑर्डर मध्ये असेल. या पर्यायांचा वापर केल्यानंतर, यूजर परिस्थितीनुसार बँकिंग लोकआयुक्त आणि/किंवा डिजिटल तक्रारींसाठी लोकआयुक्ताशी संपर्क साधू शकतो.

(घ) दोन्ही प्रकारच्या ट्रान्झॅक्शनसाठी म्हणजेच फंड ट्रान्सफर आणि मर्चंट ट्रान्झॅक्शन यासाठी तक्रार करता येऊ शकते.

(ङ) संबंधित ॲपवरच अशा युजरच्या तक्रारीची स्थिती अपडेट करण्याद्वारे युजरला पीएसपी बँक/टीपीएपी द्वारे सूचित केले जाईल.

**7. पेमेंट सूचना**

(क) बीएफएलला प्रदान केलेल्या पेमेंट सूचनांच्या अचूकता, प्रामाणिकता आणि योग्यतेसाठी कस्टमर पूर्णपणे जबाबदार असेल आणि तेच बीएफएलद्वारे विहित केलेल्या फॉर्म आणि पद्धतीमध्ये असेल. पुढे अशा पेमेंट सूचना यूपीआय सुविधा ऑपरेट करण्यासाठी बीएफएल साठी पुरेशा असल्याचे विचारात घेतले जाईल.

(ख) बीएफएलला सदर पेमेंट सूचनांची स्वतंत्रपणे पडताळणी करणे आवश्यक नाही. बीएफएलचे कोणतेही दायित्व नाही जर ते कस्टमरने जारी केलेल्या कोणत्याही पेमेंट सूचनेची अंमलबजावणी थांबवू शकत नसेल किंवा थांबविण्यास किंवा प्रतिबंधित करण्यास असमर्थ असेल. एकदा कस्टमरद्वारे पेमेंट सूचना जारी केल्यानंतर ती कस्टमरद्वारे रद्द केली जाऊ शकत नाही आणि त्यासंबंधी बीएफएलला कोणत्याही प्रकारे जबाबदार धरले जाणार नाही.

(ग) बीएफएल म्हणते की कस्टमरला माहिती प्रदान करण्यासाठी किंवा सदर पेमेंट सूचनांची पडताळणी करण्यासाठी त्यांचे पेमेंट सूचनांचे रेकॉर्ड ठेवण्याचे कोणतेही दायित्व किंवा कर्तव्य नाही. कोणतेही कारण न देता बीएफएल पेमेंट सूचनांचे पालन करण्यास नकार देऊ शकते आणि अशा कोणत्याही सूचनेच्या विवेकबुद्धी किंवा अन्यथा मूल्यांकन करण्यासाठी कोणत्याही कर्तव्याअंतर्गत असणार नाही. जर कस्टमरच्या सूचनांमुळे बीएफएल चे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नुकसान होईल किंवा उघड होईल किंवा यूपीआय सुविधा चालू ठेवण्यापूर्वी कस्टमरकडून क्षतिपूर्तीची आवश्यकता असेल असा विश्वास ठेवण्याचे कारण असल्यास बीएफएल ला यूपीआय सुविधेच्या संदर्भात ट्रान्झॅक्शन निलंबित करण्याचा अधिकार आहे.

(घ) कस्टमरने एन्टर केलेल्या सर्व सूचना, विनंती, निर्देश, आदेश, दिशानिर्देश कस्टमरच्या निर्णयांवर आधारित आहेत आणि कस्टमरच्या एकमेव आणि संपूर्ण जबाबदारी आहेत.

**8. अस्वीकृती**

(क) बीएफएल यूपीआय सुविधेच्या गुणवत्तेविषयी कोणतीही वॉरंटी देत नाही आणि कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही. कस्टमरने प्रस्तावित केल्याप्रमाणे ट्रान्झॅक्शन्सची त्वरित अंमलबजावणी आणि प्रोसेस करण्यासाठी बीएफएल सर्वोत्तम प्रयत्नांवर आधारित असेल, बीएफएल कोणत्याही कारणामुळे प्रतिसाद न दिल्यास किंवा प्रतिसाद देण्यास उशीर झाल्यास, ऑपरेशनल सिस्टीमच्या अपयशामुळे किंवा कोणत्याही कायद्याच्या आवश्यकतेसह कोणत्याही कारणास्तव जबाबदार असणार नाही.

(ख) टाइम-आउट ट्रान्झॅक्शनच्या कारणाने म्हणजेच एनपीसीआय किंवा लाभार्थी बँककडून ट्रान्झॅक्शन विनंतीसाठी कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही आणि/किंवा जेथे लाभार्थीचा मोबाईल नंबर किंवा अकाउंट नंबर अस्तित्वात नाही, अशा वेळी यूपीआय ट्रान्झॅक्शन अयशस्वी झाल्याने उद्भवलेल्या किंवा परिणामी कस्टमर आणि/किंवा कोणत्याही थर्ड पार्टीला झालेल्या कोणत्याही नुकसान, क्लेम किंवा हानीसाठी बीएफएल जबाबदार असणार नाही. पुढे, कस्टमरद्वारे प्रदान केलेल्या चुकीच्या लाभार्थी तपशील, मोबाईल नंबर आणि/किंवा अकाउंट तपशिलामुळे उद्भवणाऱ्या किंवा परिणामी कोणत्याही नुकसान, हानी आणि/किंवा क्लेमसाठी बीएफएल जबाबदार असणार नाही. नैसर्गिक आपत्ती, कायदेशीर प्रतिबंध, टेलिकम्युनिकेशन नेटवर्क किंवा नेटवर्क अयशस्वी झाल्यास किंवा बीएफएलच्या नियंत्रणाबाहेर असलेल्या इतर कोणत्याही कारणासह परंतु यापुरते मर्यादित नसलेल्या इतर कारणांसाठी जर यूपीआय सुविधेचा ॲक्सेस इच्छित पद्धतीने उपलब्ध नसेल तर बीएफएलला कस्टमरसाठी कोणत्याही परिस्थितीत जबाबदार धरले जाणार नाही. यूपीआय सुविधेचा बेकायदेशीर किंवा अयोग्य वापर कस्टमरला फायनान्शियल चार्जेसच्या पेमेंटसाठी (बीएफएलद्वारे ठरवले जाईल) जबाबदार ठरवेल किंवा परिणामी कस्टमरची यूपीआय सुविधा निलंबित होऊ शकते.

(ग) ट्रान्झॅक्शनसाठी लागलेल्या वेळेसह यूपीआय सुविधेच्या वापरातून उद्भवणारे ट्रान्झॅक्शन द्वारे निर्मित बीएफएलचे सर्व रेकॉर्ड्स ट्रान्झॅक्शनचा खरा आणि अचूकतेचा अंतिम पुरावा असतील. दोन्ही पार्टीच्या संरक्षणासाठी आणि चुका दुरुस्त करण्यासाठी कस्टमर समजतो, सहमत आहे आणि त्याच्या विवेकबुद्धीनुसार कस्टमरला कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय कस्टमर आणि बीएफएल व त्यांचे कर्मचारी किंवा एजंट्स यांदरम्यान कोणतेही किंवा सर्व टेलिफोनिक संभाषण मॉनिटर व रेकॉर्ड करण्यास बीएफएलला अधिकृत करतो. बीएफएल सर्व प्रकारच्या कोणत्याही हमी, व्यक्त किंवा निहित किंवा वैधानिक असलेल्या, ज्यात समावेश आहे परंतु मर्यादित नाही अशी व्यापारक्षमतेची निहित हमी, विशिष्ट उद्देशासाठी फिटनेस, डाटा अचूकता व पूर्णता आणि यूपीआय सुविधेदरम्यान गैर-उल्लंघन संबंधित कोणतीही हमी स्पष्टपणे नाकारते.

## 9. क्षतिपूर्ती

कस्टमर याद्वारे सर्व वेळी नुकसानभरपाई देण्यास आणि बीएफएल, एनपीसीआय व अशा अन्य थर्ड पार्टीला जसे बीएफएल किंवा एनपीसीआय ला पुढील कारणांमुळे उद्भवणाऱ्या सर्व कृती, कार्यवाही, क्लेम, दायित्व (वैधानिक दायित्वासह), दंड. मागणी आणि खर्च, निवाडा, नुकसान, हानी आणि / किंवा खर्च विरुद्ध योग्य वाटते, त्रासरहित मानण्यास सहमत आणि मान्य आहे:

i. कोणताही लागू कायदा, नियम आणि रेग्युलेशन्स, गाईडलाईन्स यांचे कोणतेही उल्लंघन किंवा फसवणूक;

ii. कस्टमरद्वारे अटींचे उल्लंघन किंवा यूपीआय सुविधेचा अनधिकृत वापर;

iii. येथे असलेल्या कस्टमरद्वारे केलेले कोणतेही चुकीचे वर्णन किंवा प्रतिनिधित्व किंवा वॉरंटीचे उल्लंघन;

iv. कस्टमरची कोणतीही कृती, उपेक्षा किंवा डिफॉल्ट.

कस्टमरद्वारे यूपीआय सुविधेच्या वापराशी संबंधित थर्ड पार्टीद्वारे क्लेममधून उद्भवणाऱ्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणत्याही नुकसान, खर्च, मागणी किंवा दायित्वासाठी कस्टमर पूर्णपणे क्षतिपूर्ती करेल आणि बीएफएल आणि एनपीसीआय ला हानिरहित ठेवेल

**10. टर्मिनेशन**

रेग्युलेटरी/एनपीसीआय गाईडलाईन्स नुसार बीएफएलद्वारे निर्धारित प्रोसेसचे अनुसरण करून कस्टमर कोणत्याही वेळी यूपीआय अकाउंट डी-रजिस्टर करू शकतात. अशा टर्मिनेशनच्या काळात यूपीआय सुविधेद्वारे केलेल्या सर्व ट्रान्झॅक्शनसाठी कस्टमर जबाबदार राहील. बीएफएल कोणतेही कारण न देता संपूर्णपणे किंवा विशिष्ट यूपीआय सुविधेच्या रेफरन्स मध्ये कधीही यूपीआय सुविधा विद्ड्रॉ किंवा रद्द करू शकते. जर कस्टमरने यापैकी कोणत्याही अटींचे उल्लंघन केल्यास 30 दिवसांच्या पूर्व सूचनेसह बीएफएल यूपीआय सुविधा निलंबित किंवा रद्द करू शकते.

**11. बजाज पे यूपीआय लाईटसाठी अटी व शर्ती**

हे बजाज पे यूपीआय लाईट अटी व शर्ती ("**बजाज पे यूपीआय लाईट अटी**") एनपीसीआय द्वारे जारी केलेल्या रेग्युलेटरी गाईडलाईन्स नुसार बीएफएलद्वारे सक्षम केलेल्या बजाज पे यूपीआय लाईट फीचरवर लागू आणि नियंत्रित करतात. कृपया बजाज पे यूपीआय लाईट ॲक्सेस करण्यापूर्वी किंवा वापरण्यापूर्वी या अटी काळजीपूर्वक वाचा. या बजाज पे यूपीआय लाईट अटी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मच्या वापराच्या अटींच्या अतिरिक्त आहेत आणि त्यांना अवमानित करत नाहीत. बजाज पे यूपीआय लाईटच्या अटी आणि वापरायच्या अटी दरम्यान संघर्षाच्या स्थितीत, बजाज पे यूपीआय लाईट अटींचा ओव्हररायडिंग परिणाम असेल. बजाज पे यूपीआय लाईट सक्षम करून किंवा वापरून, तुम्ही मान्य करता की तुम्ही बजाज पे यूपीआय लाईट अटी वाचल्या, समजल्या आणि त्यांच्याशी बांधील राहण्यास सहमत आहात.

**11.1. व्याख्या:**

बजाज पे यूपीआय लाईट अटींमध्ये, संदर्भ अन्यथा सूचित करत नसल्यास खालील शब्दांचा अर्थ खाली सेट केल्याप्रमाणे असेल. बजाज पे यूपीआय लाईट अटींमध्ये वापरलेल्या परंतु येथे परिभाषित न केलेल्या इतर सर्व कॅपिटलाईज्ड टर्म्सचा वापरायच्या अटींमध्ये त्यांना नमूद केलेला अर्थ असेल.

**"बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्स"** म्हणजे बजाज फिनसर्व्ह ॲपवर बजाज पे यूपीआय लाईट वापरून ट्रान्झॅक्शन करण्यासाठी वापरण्यासाठी बजाज पे यूपीआय लाईट वॉलेटमध्ये उपलब्ध व्हर्च्युअल फंड. बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्स बजाज पे यूपीआय लाईट वापरून केलेल्या ट्रान्झॅक्शनसाठी तुमच्या अकाउंटमध्ये वाटप केलेले फंड दर्शविते आणि असे बॅलन्स तुमच्या बजाज पे यूपीआय लाईट वॉलेटमधून केलेल्या ट्रान्झॅक्शननुसार बदलेल.

**"बजाज पे यूपीआय लाईट"** म्हणजे बजाज फिनसर्व्ह ॲपवर सक्षम केलेल्या वैशिष्ट्याच्या आधारावर तुमच्या जारीकर्ता बँकद्वारे तुम्हाला प्रदान केलेली सर्व्हिस, ज्याद्वारे 'ऑन-डिव्हाईस' वॉलेट वापरून कमी मूल्य ट्रान्झॅक्शन (ऑनलाईन मोडमध्ये) केले जाऊ शकतात.

**11.2 अटी:**

तुम्ही समजून घेता, सहमत आहात, पुष्टी करता आणि हमी देता की:

1. तुमच्या यूपीआय आयडीसह लिंक असलेले तुमचे सर्व बँक अकाउंट बजाज पे यूपीआय लाईटसाठी पात्र असू शकत नाहीत. तुम्ही केवळ बजाज फिनसर्व्ह ॲपमध्ये एका बँक अकाउंटसाठी बजाज पे यूपीआय लाईट सक्षम करू शकता.

2. बजाज पे यूपीआय लाईट ट्रान्झॅक्शनची उच्चतम मर्यादा रु. 500/- असेल आणि बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्सची एकूण मर्यादा कोणत्याही वेळी किंवा एनपीसीआय द्वारे वेळोवेळी विहित केलेल्या अन्य मर्यादेनुसार रु. 2000/- असेल. तुम्ही समजून घेता आणि सहमत आहात की एनपीसीआय तिच्या विवेकबुद्धीनुसार आणि तुम्हाला कोणतीही पूर्वसूचना न देता वरील मर्यादा सुधारित करू शकते.

3. बजाज फिनसर्व्ह ॲपमधील बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्स हे केवळ व्हर्च्युअल 'ऑन-डिव्हाईस' बॅलन्स आहे आणि तुमच्या बँक अकाउंटमध्ये तुम्ही वाटप केलेल्या बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्सचे प्रतिबिंब आहे. बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्सवर कोणतेही इंटरेस्ट देय नाही. तुम्ही पुढे समजता की बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्सच्या संदर्भात वास्तविक पैसे किंवा फंड तुमच्या जारीकर्ता बँककडून एनपीसीआय द्वारे कधीही ट्रान्सफर किंवा प्राप्त केले जात नाहीत. तुमच्या बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्सच्या संदर्भात वास्तविक पैसे/फंड तुमच्या जारीकर्ता बँककडे ठेवले जातात आणि मेंटेन केले जातात.

4. बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्स टॉप अप ट्रान्झॅक्शन करून म्हणजेच, तुमच्या बँक अकाउंटमधून बजाज पे यूपीआय लाईटमध्ये अधिक फंड वाटप/जोडून पुन्हा भरले जाऊ शकते.

5. तुमची संचयी दैनंदिन खर्च मर्यादा रु. 4000/- इतकी मर्यादित आहे म्हणजेच, तुम्ही प्रति दिवस वरील मर्यादेच्या पलीकडे बजाज पे यूपीआय लाईट ट्रान्झॅक्शन करू शकत नाही. तुम्ही समजून घेता आणि सहमत आहात की एनपीसीआय तिच्या विवेकबुद्धीनुसार आणि तुम्हाला कोणतीही पूर्वसूचना न देता वरील मर्यादा सुधारित करू शकते.

6. बजाज पे यूपीआय लाईट ॲक्सेस केले जाऊ शकते आणि बजाज पे यूपीआय लाईट ट्रान्झॅक्शन केवळ तुमचा फोन/डिव्हाईस बायोमॅट्रिक किंवा पॅटर्न प्रमाणीकरण तपशील एन्टर करून तुमच्या फोनवर डाउनलोड केलेल्या बजाज फिनसर्व्ह ॲपमध्ये लॉग-इन करून केले जाऊ शकतात. तुम्ही समजता की बजाज पे यूपीआय लाईट वापरून ट्रान्झॅक्शन करण्यासाठी स्वतंत्र अधिकृतता किंवा यूपीआय पिन आवश्यक नाही.

7. टॉप-अप ट्रान्झॅक्शन व्यतिरिक्त इतर बजाज पे यूपीआय लाईट ट्रान्झॅक्शन तुमच्या बँक अकाउंटच्या स्टेटमेंट (पासबुक) मध्ये प्रदर्शित केले जाणार नाहीत. तुम्हाला तुमच्या जारीकर्ता बँककडून बजाज पे यूपीआय लाईट ट्रान्झॅक्शनसाठी दिवसातून एकदा एसएमएस प्राप्त होईल. ज्यामध्ये दिवसादरम्यान केलेल्या ट्रान्झॅक्शनचा तपशील आणि उपलब्ध बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्सचा समावेश असेल.

8. जर तुम्ही बजाज फिनसर्व्ह ॲपमध्ये बजाज पे यूपीआय लाईट अक्षम केले तर तुमचा न वापरलेला बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्स, जर असल्यास, तुमच्या जारीकर्ता बँकद्वारे तुमच्या बँक अकाउंटमध्ये जमा केला जाईल. ट्रान्झॅक्शन अंतर्गत फंडचा कोणताही रिफंड किंवा रिव्हर्सल केवळ तुमच्या बँक अकाउंटमध्ये दिसेल आणि बजाज फिनसर्व्ह ॲपमध्ये नाही.

9. तुम्ही तुमचा मोबाईल फोन/डिव्हाईस बदलण्यापूर्वी किंवा जर तुम्ही बजाज फिनसर्व्ह ॲप अनइंस्टॉल करणार असाल तर तुम्हाला तुमच्या जुन्या मोबाईल फोन/डिव्हाईसमधून बजाज पे यूपीआय लाईट अक्षम करावे लागेल आणि बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्स तुमच्या बँक अकाउंटमध्ये हस्तांतरित करावा लागेल. जर तुम्ही तुमच्या जुन्या फोन/डिव्हाईसमधून बजाज पे यूपीआय लाईट अक्षम करण्यात अयशस्वी झाला तर तुमची जारीकर्ता बँक तुमच्या बजाज पे यूपीआय लाईटमध्ये उपलब्ध असलेले बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्स तुमच्या बँक अकाउंटमध्ये पुन्हा हस्तांतरित करू शकणार नाही. तथापि, जर तुम्ही जारीकर्ता बँकला त्यासाठी सूचित केले तर तुमची जारीकर्ता बँक तुमच्या बजाज पे यूपीआय लाईट वॉलेटमध्ये उपलब्ध कोणताही बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्स रिफंड करण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करेल.

10. तुम्ही तुमच्या बजाज फिनसर्व्ह ॲप पासवर्डची गोपनीयता आणि बजाज पे यूपीआय लाईट ट्रान्झॅक्शनशी संबंधित इतर तपशील राखण्यासाठी जबाबदार आहात.

11. तुमचा पासवर्ड किंवा मोबाईल फोन/डिव्हाईस वापरून केलेल्या सर्व ट्रान्झॅक्शन/ॲक्टिव्हिटीजसाठी (ऑनलाईन मोडमध्ये) तुम्ही पूर्णपणे जबाबदार आहात ज्यावर बजाज पे यूपीआय लाईट सक्षम केले आहे. जर तुम्हाला माहित असेल किंवा अन्य व्यक्तीला तुमचा बजाज फिनसर्व्ह ॲप पासवर्ड माहित आहे असे संशय असेल तर तुम्ही त्वरित ते बदलण्यासाठी योग्य पावले उचलणे आवश्यक आहे. तुमचा लॉग-इन पिन/ॲपचा पासवर्ड एन्टर करून केलेल्या ट्रान्झॅक्शनसह बजाज पे यूपीआय लाईट वापरून तुमच्या बँक अकाउंटमधून केलेल्या कोणत्याही अनधिकृत ट्रान्झॅक्शनसाठी तुम्ही बीएफएलला जबाबदार धरणार नाही. ॲपवर तुमचा पासवर्ड किंवा यूजर अकाउंट संरक्षित करण्यात किंवा अन्यथा बजाज पे यूपीआय लाईट अटींचे पालन करण्यात तुमच्याद्वारे उद्भवणाऱ्या कोणत्याही नुकसान किंवा हानीसाठी बीएफएल तुम्हाला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस जबाबदार असणार नाही.

12. जर तुमचा मोबाईल फोन/डिव्हाईस/हँडसेट गहाळ झाला, हरवला, चोरीला गेला किंवा खराब झाला असेल तर तुम्ही बजाज पे यूपीआय लाईट वॉलेट ब्लॉक करण्यासाठी त्वरित तुमच्या जारीकर्ता बँकेला विनंती कराल. बजाज पे यूपीआय लाईट हे 'ऑन डिव्हाईस' वॉलेट आहे असे विचारात घेता, तुमचा फोन/डिव्हाईस गहाळ, हरवला, चोरीला गेला किंवा खराब झाल्यावर, तुमची जारीकर्ता बँक तुमच्या बजाज पे यूपीआय लाईट वॉलेटमध्ये उपलब्ध कोणताही बजाज पे यूपीआय लाईट बॅलन्स रिफंड करण्यासाठी सर्वोत्तम आधारावर प्रयत्न करेल.

13. बजाज पे यूपीआय लाईटच्या सक्षमता, टॉप अप किंवा अक्षमता संदर्भात कोणतेही विवाद जारीकर्ता बँकेकडे संदर्भित केले जातील आणि हाताळले जातील.

14. बजाज पे यूपीआय लाईट अटींमध्ये काहीही विपरीत असले तरी, बीएफएल तुम्हाला बजाज पे यूपीआय लाईट सक्षम करणे नाकारण्याचा, ॲपवर तुमचे यूजर अकाउंट ॲक्सेस निलंबित करण्याचा किंवा समाप्त करण्याचा, किंवा तुम्हाला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला त्यांच्या विवेकबुद्धीनुसार कोणत्याही पूर्वसूचना किंवा दायित्वाशिवाय कोणत्याही वेळी तुमचा पासवर्ड बदलण्याचा अधिकार राखून ठेवते. बजाज पे यूपीआय लाईट अटी ॲपच्या वापरायच्या अटीसह संयुक्तपणे वाचल्या जातील.

बजाज पे यूपीआय लाईट अटी आणि ॲपच्या वापरायच्या अटी एकत्रितपणे तुमच्या आणि एनपीसीआय दरम्यान बजाज पे यूपीआय लाईटच्या संदर्भात संपूर्ण करार निर्माण करतील.

## 12. यूपीआय (युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस) वर रुपे क्रेडिट कार्डच्या वापरासाठी/लिंक करण्यासाठी अटी व शर्ती

या अटी व शर्ती रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ("आरबीआय") आणि/किंवा नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ("एनपीसीआय") द्वारे वेळोवेळी जारी केलेल्या गाईडलाईन्स, परिपत्रके आणि/किंवा रेग्युलेशन्स नुसार ("गाईडलाईन्स") बीएफएल द्वारे प्रदान केलेल्या/सुलभ केलेल्या यूपीआय सुविधेशी क्रेडिट कार्ड लिंक करण्यासाठी लागू असतील, जे येथे निर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन असतील.

### 12.1. व्याख्या:

- **लाभार्थी** म्हणजे असा व्यक्ती किंवा संस्था, जो मुख्यतः वैध बँक बँक अकाउंट असलेला मर्चंट आहे, ज्याच्याकडे पेयर बजाज पे यूपीआय द्वारे पेमेंट पाठवितो.
- **मर्चंट** म्हणजे आणि त्यात समाविष्ट असेल ऑनलाईन, मोबाईल आधारित आणि ऑफलाईन मर्चंट जे यूपीआय मार्फत पेमेंटच्या बदल्यात वस्तू आणि सर्व्हिसेस प्रदान करतात.
- **पेयर** म्हणजे वैध आणि ॲक्टिव्ह यूपीआय अकाउंट असलेली व्यक्ती आणि ज्यांची बजाज पे यूपीआय मार्फत लाभार्थीला पैसे पाठवण्याची इच्छा आहे.
- **ट्रान्झॅक्शन** म्हणजे पेयर अकाउंटला डेबिट करण्यासाठी आणि लाभार्थीच्या अकाउंटमध्ये संबंधित क्रेडिटसाठी बजाज पे यूपीआय मार्फत सुरू केलेले पेमेंट. ट्रान्झॅक्शन हे एकतर यूपीआय पेमेंट आधारित देय किंवा कलेक्ट पेमेंट ट्रान्झॅक्शन असू शकते.
- **ट्रान्झॅक्शन रक्कम** म्हणजे बजाज पे यूपीआय वापरून ट्रान्झॅक्शन सुरू करताना पेयरद्वारे एन्टर केलेली रक्कम, जी अशा ट्रान्झॅक्शनचा भाग म्हणून पेयरच्या अकाउंटमधून लाभार्थीच्या अकाउंटमध्ये ट्रान्सफर केली जाईल.
- **यूपीआय कार्यक्षमता** म्हणजे गाईडलाईन्स नुसार एनपीसीआय यूपीआय सिस्टीमद्वारे रुपे नेटवर्कवर कार्डधारकांना बीएफएल द्वारे प्रदान केलेली यूपीआय आधारित इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर आणि फंड कलेक्शन सुविधा.
- **यूपीआय आयडी किंवा व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस किंवा व्हीपीए** म्हणजे कार्डधारकाला जारी केलेला एक युनिक पेमेंट आयडेंटिफायर जो ट्रान्झॅक्शन करण्यासाठी कार्डधारकाद्वारे अशा यूपीआय आयडी सह लिंक केलेले कार्डधारकाचे अकाउंट ओळखण्यासाठी वापरला जाऊ शकतो.
- **यूपीआय पेमेंट्स:** म्हणजे कार्डधारकाला त्यांच्या जारीकर्ता बँक/संस्था किंवा लाभार्थी बँक/संस्थेद्वारे ऑफर केलेली युनिफाईड पेमेंट इंटरफेस (यूपीआय) आधारित पेमेंट सुविधा

(म्हणजेच, एखाद्याला देय करणे (पुश) किंवा एखाद्याकडून कलेक्ट करणे (कलेक्ट किंवा पुल) ट्रान्झॅक्शन), जी बीएफएल यूपीआय ॲप्लिकेशनद्वारे कार्डधारकाला यूपीआय आधारित पेमेंट करण्यास सक्षम करण्यासाठी बीएफएल यूपीआय ॲप्लिकेशनवर सक्षम केली जाते.

- **यूपीआय पिन:** म्हणजे कार्डधारकाद्वारे सेट केलेले प्रमाणीकरण क्रेडेन्शियल्स, जे बीएफएल यूपीआय ॲप्लिकेशनद्वारे ट्रान्झॅक्शन पूर्ण करण्यासाठी कार्डधारकाद्वारे एन्टर केले जाईल.

- **कार्डधारक** म्हणजे रुपे क्रेडिट कार्ड धारक.

**12.2** यूपीआय कार्यक्षमता केवळ रुपे नेटवर्कवर क्रेडिट कार्डसाठी उपलब्ध आहे.

**12.3** एनपीसीआय गाईडलाईन्सनुसार, बजाज फिनसर्व्ह ॲपवर क्रेडिट कार्ड ऑनबोर्डिंग दरम्यान डिव्हाईस बाईंडिंग आणि यूपीआय पिन सेटिंग या प्रक्रिया यूपीआय वरील सर्व प्रकारच्या ट्रान्झॅक्शनसाठी क्रेडिट कार्ड सक्षम करण्यास कस्टमरची संमती म्हणून समजल्या जातील.

**12.4** सध्या, यूपीआय कार्यक्षमतेवर क्रेडिट कार्ड वापरून पेमेंट केवळ प्रायमरी कार्ड पर्यंत मर्यादित आहे. हे सध्या ॲड-ऑन/सप्लिमेंटरी कार्डसाठी उपलब्ध नाही.

**12.5** यूपीआय पिन हा यूपीआय ट्रान्झॅक्शन प्रमाणित करण्यासाठी 6-अंकी किंवा 4-अंकी नंबर आहे. यूपीआय पिन केवळ बजाज फिनसर्व्ह ॲपवर सेट/रिसेट/बदलता येऊ शकतो. यूपीआय पिन हा क्रेडिट कार्ड पिन पेक्षा भिन्न असतो. जो 4-अंकी नंबर आहे.

**12.6** कार्डधारक त्यांच्या अकाउंटच्या पासवर्ड आणि यूपीआय पिनच्या गोपनीयतेसाठी जबाबदार आहेत आणि त्यांच्या अकाउंटचा पासवर्ड, यूपीआय पिन आणि मोबाईल फोन ज्यावर बजाज फिनसर्व्ह ॲप इंस्टॉल केले आहे त्याचा वापर करून होणाऱ्या सर्व उपक्रमांसाठी पूर्णपणे जबाबदार आहेत.

**12.7** ही यूपीआय कार्यक्षमता केवळ पीअर-टू-मर्चंट (P2M) ट्रान्झॅक्शनवर लागू आहे.

**12.8** पीअर-टू-पीअर (P2P), कार्ड-टू-कार्ड (C2C), कार्ड ते बँक आणि पीअर-टू-पीअर-मर्चंट (P2PM), ट्रान्झॅक्शनला अनुमती नाही.

**12.9** यूपीआय किंवा क्रेडिट कार्ड सुविधेच्या अंतर्गत कॅश विद्ड्रॉल उपलब्ध नाही.

**12.10** कार्डधारकांना ट्रान्झॅक्शनला अधिकृत करण्यासाठी यूपीआय पिन एन्टर करण्यापूर्वी प्रत्येक ट्रान्झॅक्शनचा तपशील तपासणे आवश्यक आहे.

**12.11** कार्डधारकांना लिंक केलेल्या रुपे क्रेडिट कार्डमध्ये 'उपलब्ध बॅलन्स आणि थकित रक्कम' तपासण्याचा पर्याय देखील असेल. कस्टमर समजतो की या सुविधेअंतर्गत, एनपीसीआय द्वारे प्रदान केल्याप्रमाणे 'उपलब्ध बॅलन्स आणि थकित रक्कम' प्रदर्शित केली जाईल. अशा बॅलन्स तपशील प्रदान करण्यात कोणत्याही अयशस्वीतेसाठी किंवा विलंबासाठी किंवा अशा माहितीच्या कोणत्याही त्रुटी किंवा चुकीसाठी बीएफएल जबाबदार असणार नाही.

**12.12** रुपे क्रेडिट कार्डद्वारे यूपीआय ट्रान्झॅक्शनवर इंधन अधिभार रिव्हर्सल लागू होणार नाही

**12.13** यूपीआय वर क्रेडिट कार्ड वापरून केलेल्या ट्रान्झॅक्शनसाठी रिवॉर्ड पॉईंट्सची जमवाजमव संबंधित क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्या बँकेने त्या विशिष्ट कार्डासाठी निश्चित केलेल्या रिवॉर्ड पॉईंट प्रोग्रामनुसार असेल.

**12.14** यूपीआय पेमेंटची उपलब्धता एनपीसीआय, पीएसपी बँक, रेमिटिंग बँक/संस्था आणि किंवा लाभार्थी बँकेच्या येथे किंवा सिस्टीममध्ये यूपीआय सर्व्हिसेसच्या उपलब्धता किंवा डाउनटाइम वर देखील अवलंबून असते.

**12.15** क्रेडिट कार्डद्वारे यूपीआय ट्रान्झॅक्शन केवळ निवडक मर्चंट कॅटेगरीवर लागू आहेत.

**12.16** कार्डधारक त्यांच्या पासवर्ड किंवा यूपीआय पिनच्या कोणत्याही अनधिकृत वापराविषयी किंवा त्यांच्या यूपीआय आयडीशी संबंधित सुरक्षेच्या इतर कोणत्याही उल्लंघनाविषयी त्वरित बीएफएलला सूचित करतील.

**12.17** कार्डधारक सहमत आहेत आणि समजतात की यूपीआय ट्रान्झॅक्शन कमाल ट्रान्झॅक्शन रक्कम किंवा कमाल दैनंदिन मर्यादा किंवा बीएफएल किंवा जारीकर्ता संस्था किंवा एनपीसीआय द्वारे वेळोवेळी लादली जाऊ शकणारी नियतकालिक मर्यादा यासारख्या मर्यादांच्या अधीन असतील आणि कार्डधारक सर्व वेळी अशा मर्यादा आणि निर्बंधांना बांधील असतील.

**12.18** कार्डधारक सहमत आहेत आणि वचन देतात की ते बजाज पे यूपीआय मार्फत केलेल्या कोणत्याही यूपीआय ट्रान्झॅक्शनमुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही परिणाम आणि जोखीमीपासून बीएफएलला हानीरहित ठेवतील आणि बजाज पे यूपीआय मार्फत जारी केलेल्या कोणत्याही सूचना आणि/किंवा ट्रान्झॅक्शनच्या अंमलबजावणीत झालेल्या कोणत्याही दायित्वासाठी ते पूर्णपणे जबाबदार असतील.

**12.19** कार्डधारक/कस्टमरद्वारे यूपीआय वर रुपे क्रेडिट कार्डचा वापर येथे नमूद केलेल्या या अटी व शर्तींची त्याची/तिची स्वीकृती मानली जाईल.

## 13 यूपीआय ग्लोबलसाठी अटी व शर्ती

**13.1** "यूपीआय ग्लोबल" म्हणजे एनपीसीआय द्वारे यूपीआय इकोसिस्टीममध्ये नोंदणीकृत मर्चंटना व्यवहार्य आणि निवडक आंतरराष्ट्रीय लोकेशनवर यूपीआय ट्रान्झॅक्शन (P2M ट्रान्झॅक्शन) सुरू करण्यासाठी एनपीसीआय द्वारे सुरू केलेली प्रोसेस. पेमेंट फ्लो सामान्य यूपीआय मर्चंट ट्रान्झॅक्शन सारखाच असेल जिथे कस्टमर क्यूआर (यूपीआय ग्लोबल क्यूआर, लोकल क्यूआर, स्टॅटिक किंवा डायनॅमिक क्यूआर, परिस्थितीनुसार) स्कॅन करतो किंवा संकलन विनंती करतो, रक्कम एन्टर करतो आणि त्यास यूपीआय पिनसह अधिकृत करतो. यूपीआय इंटरनॅशनल वापरण्याच्या उद्देशाने, कस्टमर्सना यूपीआय सुविधेमध्ये इच्छित बँक अकाउंट मॅन्युअली सक्षम करावे लागेल आणि यूपीआय पिनसह त्यांचे इंटरनॅशनल पेमेंट ॲक्टिव्हेट करावे लागतील. इंटरनॅशनल पेमेंट कोणत्याही लोकेशनमधून ॲक्टिव्हेट केली जाऊ शकतात म्हणजेच, भारतामध्ये किंवा भारताबाहेर. जर युजरने ॲक्टिव्हेशन पूर्वी इंटरनॅशनल क्यूआर स्कॅन केला तर त्यांना प्रथम यूपीआय ग्लोबल ॲक्टिव्हेट

करण्यास आणि नंतर त्यांचे पेमेंट पूर्ण करण्यास सांगितले जाईल. युजरच्या विनंतीनुसार, बजाज फिनसर्व्ह ॲप यूपीआय ग्लोबल ट्रान्झॅक्शनसाठी युजरद्वारे निवडलेले बँक अकाउंट ॲक्टिव्हेट करेल. इंटरनॅशनल यूपीआयचे फीचर कस्टमरद्वारे कमाल 90 दिवसांच्या कालावधीसाठी सक्षम केले जाऊ शकते. सुविधा 90 दिवसांच्या समाप्तीनंतर किंवा कस्टमरकडून विशिष्ट विनंतीवर अक्षम केली जाईल. या संदर्भात एनपीसीआय आणि पीएसपी बँकेच्या संबंधित निर्देशांनुसार बीएफएलद्वारे वेळोवेळी या कालावधीत सुधारणा केली जाऊ शकते. यूजर यूपीआय पिन प्रमाणीकरण प्रोसेसद्वारे 90 दिवसांच्या कालावधीची मुदत संपण्यापूर्वी बजाज फिनसर्व्ह ॲपवरील त्यांच्या सेटिंग्समध्ये हे फीचर डीॲक्टिव्हेट करू शकतात.

**13.2** सर्व यूपीआय ग्लोबल ट्रान्झॅक्शनसाठी, ट्रान्झॅक्शन होत असलेल्या देशाच्या स्थानिक चलनात रक्कम एन्टर केली जाईल. वास्तविक वेळेत, फॉरेक्स रेट्स आणि मार्क-अपवर आधारित रक्कम भारतीय राष्ट्रीय रुपये (आयएनआर) मध्ये देखील दर्शविली जाईल. सर्व यूपीआय ग्लोबल ट्रान्झॅक्शन बजाज फिनसर्व्ह ॲपच्या ट्रान्झॅक्शन रेकॉर्डमध्ये दृश्यमान असतील. कस्टमरने जारीकर्ता बँकद्वारे आकारलेल्या कोणत्याही प्रोसेसिंग फीसह यूपीआय ग्लोबल ट्रान्झॅक्शनसाठी लागू असलेल्या सर्व शुल्काची मान्यता आणि सहमती दर्शविली आहे. कस्टमरला हे देखील समजते आणि सहमत आहे की ट्रान्झॅक्शन दरम्यान करन्सी रेटमधील चढउतारांमुळे ट्रान्झॅक्शन सुरू करताना प्रदर्शित शुल्काच्या संदर्भात ट्रान्झॅक्शनच्या शेवटी डायनॅमिक शुल्क आकारले जाऊ शकते.

## ग. बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर बिल पेमेंट सर्व्हिसेसच्या अटी व शर्ती.

या खालील अटी व शर्ती वापरायच्या अटींमध्ये नमूद केलेल्या करारांव्यतिरिक्त येथे खाली दिसणाऱ्या अटी आणि शर्तींवर अधिकृत भारत बिल पेमेंट ऑपरेटिंग युनिट म्हणजेच नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ("**एनपीसीआय**") आणि आरबीआय द्वारे योग्य अधिकारप्राप्त **PayU Payments Private Limited ("PayU")** मार्फत बिलर्सला पेमेंट करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वर उपलब्ध बिल पेमेंट सर्व्हिसेसचा लाभ घेणाऱ्या व वापर करणाऱ्या कस्टमरला लागू असतील.

बीएफएल असंख्य आस्थापनांच्या संदर्भात जी एनपीसीआय च्या बीबीपीएस अंतर्गत कव्हर होत नाहीत, जी IndiaIdeas Com Limited, (यापुढे "BillDesk" म्हणून संदर्भित) आणि PayU Payments Private Limited (यापुढे "PayU" म्हणून संदर्भित) यासारख्या बिलर ॲग्रीगेटर द्वारे समर्थित बिल पेमेंट्स सुलभ करण्यासाठी विविध प्रकारच्या बिल पेमेंट सर्व्हिसेस ("बिल पेमेंट सर्व्हिसेस") देखील ऑफर करते.

**व्याख्या**

**"बजाज फिनसर्व्ह अकाउंट"** चा अर्थ असेल जो वरील वापरायच्या अटींच्या क्लॉज 1(क) अंतर्गत नमूद केला आहे.

**"एजंट संस्था"** म्हणजे बीबीपीएस सर्व्हिसेसच्या तरतुदीसाठी कस्टमर सर्व्हिस पॉईंट्स म्हणून बीबीपीओयू द्वारे ऑनबोर्ड केलेले एजंट्स. बीएफएल PayU (बीबीपीओयू) द्वारे योग्यरित्या ऑनबोर्ड केल्यानंतर एजंट संस्थेच्या क्षमतेत बिल पेमेंट सर्व्हिसेसची सुविधा देत आहे.

**"बीबीपीसीयू"** म्हणजे भारत बिल पेमेंट सेंट्रल युनिट म्हणजेच एनपीसीआय ही बीबीपीएस (खाली परिभाषित) चालवणारी एकल अधिकृत संस्था आहे.

**"बीबीपीएस"** म्हणजे एनपीसीआय / आरबीआय च्या देखरेखी अंतर्गत भारत बिल पेमेंट सिस्टीम सर्व्हिसेस.

**"बीबीपीओयू"** म्हणजे बीबीपीसीयू द्वारे सेट केलेल्या मानकांचे पालन करण्यासाठी भारत बिल पेमेंट ऑपरेटिंग युनिट्स. PayU हे वर्तमान व्यवस्था अंतर्गत अधिकृत बीबीपीओयू आहे.

**"बिलर"** चा अर्थ एनपीसीआयच्या प्रोसीजरल गाईडलाईन्स नमूद केल्याप्रमाणे असेल.

**"बिलर अ‍ॅग्रीगेटर"** म्हणजे IndiaIdeas.Com Limited आणि PayU ज्यांच्यासोबत बीएफएलकडे एनपीसीआयच्या बीबीपीएस फ्रेमवर्क अंतर्गत कव्हर नसलेल्या बिलर्सच्या संदर्भात बिल पेमेंट सर्व्हिसेसची थेट व्यवस्था केली जाते.

**"बिल"** म्हणजे कस्टमरने बिल पेमेंटसाठी एजंट संस्थेद्वारे (खाली परिभाषित) मर्चंटला दिलेली रक्कम ज्यामध्ये सुविधा/सर्व्हिस शुल्क (जर असल्यास) आणि इतर सर्व टॅक्स, ड्युटी, खर्च, चार्जेस आणि खर्च (जर असल्यास) समाविष्ट असेल.

**"बिल पेमेंट"** म्हणजे मर्चंटद्वारे प्रदान केलेल्या युटिलिटी/इतर सर्व्हिसेस साठी कस्टमरने पूर्णपणे किंवा अंशतः भरलेले बिल.

**"बिल पेमेंट सर्व्हिसेस"** म्हणजे एनपीसीआय च्या बीबीपीएस फ्रेमवर्क अंतर्गत योग्यरित्या कव्हर केलेल्या बीबीपीओयू मार्फत बिल पेमेंट सर्व्हिस आणि IndiaIdeas आणि PayU यासारख्या बिल पेमेंट अ‍ॅग्रीगेटर सह बीएफएलची थेट व्यवस्था असलेल्या बिल पेमेंट सर्व्हिसेस.

**"कस्टमर"** म्हणजे अशी व्यक्ती ज्याला ओळखीच्या बिलर्स कडे पेमेंट करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर बिल पेमेंट सर्व्हिसेस प्राप्त करायच्या आहेत.

**"मर्चंट"** म्हणजे कस्टमरला प्रॉडक्ट्स/सर्व्हिसेस प्रदान करणारा मर्चंट

**"ऑफ-अस"** चा अर्थ एनपीसीआयच्या प्रोसीजरल गाईडलाईन्स मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल, जिथे बिलर आणि पेमेंट कलेक्टिंग एजंट PayU व्यतिरिक्त इतर बीबीपीओयू शी संबंधित आहे;

**"ऑन-अस"** चा अर्थ एनपीसीआयच्या प्रोसीजरल गाईडलाईन्स मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल. जिथे बिलर आणि पेमेंट कलेक्टिंग एजंट PayU शी संबंधित आहे.

**"गाईडलाईन्स"** येथे भारत बिल पेमेंट सिस्टीमच्या अंमलबजावणीच्या संदर्भाने आहे - नोव्हेंबर 28, 2014 तारखेच्या गाईडलाईन्स आणि/किंवा कोणत्याही योग्य प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या किंवा एनपीसीआय द्वारे वेळोवेळी जारी केलेल्या गाईडलाईन्स. ज्यामध्ये कोणत्याही/सर्व सुधारणा, अतिरिक्त परिपत्रक यांचा समावेश असेल.

**"प्रायोजक बँक"** म्हणजे वेळोवेळी PayU द्वारे नियुक्त केलेली बँक, जी आमच्या ऑफ-अस बिलाच्या प्रक्रिया आणि सेटलमेंटसाठी जबाबदार असेल.

**"ट्रान्झॅक्शन"** म्हणजे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वापरताना आणि ॲक्सेस करताना बिलरला बिलाचे पेमेंट करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवरील बिल पेमेंट सर्व्हिसेस मार्फत ऑन-अस ट्रान्झॅक्शन किंवा ऑफ-अस ट्रान्झॅक्शन म्हणून कस्टमरने दिलेली प्रत्येक ऑर्डर किंवा विनंती होय.

(क) बीएफएल आपल्या एजंट संस्थेच्या क्षमतेच्या अंतर्गत बीबीपीओयू मार्फत ट्रान्झॅक्शन सुविधा देत आहे. जी गाईडलाईन्सचे पालन करण्यासाठी आरबीआय आणि एनपीसीआय द्वारे योग्यरित्या अधिकृत संस्था आहे.

(ख) कस्टमर हे मान्य करतो की बीएफएल केवळ सुविधाकर्ता आहे आणि पेमेंटच्या वास्तविक सेटलमेंटमध्ये समाविष्ट नाही. त्याच्याशी संबंधित कोणतीही समस्या किंवा विवाद संबंधित प्रकरणे बीबीपीओयू आणि किंवा बिलर ॲग्रीगेटर सह घेतली जातील.

(ग) कस्टमर बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म मार्फत बिल पेमेंट सर्व्हिसेसचा लाभ घेण्याचे स्विकारतो आणि पुष्टी करतो:

(i) बीबीपीओयू आणि/किंवा स्पॉन्सर बँक किंवा अन्य कोणतेही इंटरनेट पेमेंट गेटवे प्लॅटफॉर्म त्यांच्या संबंधित पॉलिसीनुसार शुल्क आकारू शकतात, ज्यामध्ये बिल पेमेंट सर्व्हिसेसचा लाभ घेण्यासाठी त्यांच्या वापरायच्या अटी समाविष्ट आहेत परंतु त्यांच्यापर्यंत मर्यादित नाही. कस्टमर बिल पेमेंट सर्व्हिसेसचा वापर करण्यापूर्वी किंवा प्राप्त करण्यापूर्वी अशा वापरायच्या अटी वाचण्यासाठी व समजून घेण्यासाठी पूर्णपणे जबाबदार असतात;

(ii) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म द्वारे बिल पेमेंट सर्व्हिसेसचा कस्टमरचा ॲक्सेस बीएफएलद्वारे कायमस्वरुपी निलंबित किंवा समाप्त किंवा अक्षम केला जाऊ शकतो, जेव्हा कस्टमरने प्रदान केलेली माहिती असत्य, अचूक, अपूर्ण किंवा वापरायच्या अटींनुसार किंवा येथे उल्लेखित अटीनुसार नसल्यास किंवा कोणत्याही गाईडलाईन्सच्या विपरित असल्यास किंवा तुमच्या बजाज फिनसर्व्ह अकाउंट द्वारे कोणतेही संशयास्पद किंवा बेकायदेशीर कृती आढळून आल्यास.

कस्टमर कोणत्याही अनधिकृत वापरापासून त्याचा/तिचा ओटीपी, पिन, डेबिट कार्ड तपशील, क्रेडिट कार्ड तपशील आणि बँक अकाउंट तपशील गोपनीय आणि सुरक्षित ठेवण्यासाठी पूर्णपणे जबाबदार आणि उत्तरदायी असेल. कस्टमर स्वीकारतो आणि मान्य करतो की जर अशा तपशीलांची गोपनीयता इतरांशी तडजोड करून उघड केली गेली असेल तर बीएफएल कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही ज्यामुळे अनधिकृत वापर किंवा ॲक्सेस होऊ शकतो आणि कस्टमरला नुकसान/हानी होऊ शकते.

(iii) बिल पेमेंट सर्व्हिसेस आणि/किंवा अयशस्वी पेमेंट, रिफंड, चार्जबॅक, प्रलंबित पेमेंट तसेच चुकीच्या बँक अकाउंट किंवा यूपीआय आयडी साठी पेमेंट संबंधित कस्टमरच्या तक्रारी थेट संबंधित बीबीपीओयू कडे घेतल्या पाहिजेत. ज्यांचे संपर्क तपशील उपरोक्त वापरायच्या अटींच्या क्लॉज 30 नमूद केले आहेत आणि त्यांची लागू कायद्यानुसार अंमलबजावणी केली जाईल.

(iv) बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार बीबीपीओयू आणि बिलर ॲग्रीगेटर सोबतच्या संबंधात बदल करू शकतो किंवा बंद करू शकते आणि कस्टमरला वेळोवेळी सूचनेसह अन्य कोणतीही अधिकृत बीबीपीओयू संस्था किंवा बिलर ॲग्रीगेटर सह ऑनबोर्ड करू शकते.

(v) कस्टमर स्वीकारतो की कोणत्याही ट्रान्झॅक्शनची कार्यवाही किंवा पूर्ण करण्याचा प्रयत्न (क) बीबीपीओयू पॉलिसीज, (ख) मर्चंट / बिलर च्या पॉलिसीज आणि आवश्यक गाईडलाईन्स आणि या वापरायच्या अटी द्वारे नियंत्रित केला जाईल.

(घ) तुम्ही सहमत आहात की तुमच्याशी संबंधित नसलेल्या बिलांसाठी पेमेंट करण्यासाठी तुम्हाला व्यावसायिकरित्या बिल पेमेंट पर्याय ऑफर करण्यास परवानगी नाही.

(ङ) तुम्ही समजता आणि मान्य करता की तुम्ही बीएफएल ला दिलेल्या कोणत्याही चुकीच्या माहितीसाठी पूर्णपणे जबाबदार असाल. तुम्ही दिलेल्या माहितीची प्रामाणिकता किंवा योग्यता पडताळण्यासाठी बीएफएल जबाबदार असणार नाही. एकदा का तुम्ही बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवरील बिलरशी संबंधित कोणतेही तपशील सादर केल्यानंतर, तुम्ही दिलेली माहिती वापरून बिल तपशील प्राप्त करण्यास तुम्ही बीएफएलला अधिकृत करता. तुम्ही तुमचे वर्तमान आणि भविष्यातील बिल तपशील जेव्हा ते उपलब्ध असतील तेव्हा पाहू शकता.

(च) तुम्ही सहमत आहात की कोणतेही ट्रान्झॅक्शन करण्यापूर्वी बिल तपशील काळजीपूर्वक पडताळणे ही तुमची जबाबदारी असेल. बिल तपशिलामध्ये कोणत्याही विसंगतीसाठी बीएफएल जबाबदार असणार नाही आणि अशा घटनेमध्ये, तुम्हाला बिलरशी समन्वय साधणे आवश्यक आहे.

(छ) तुम्ही याकरिता देखील सहमत आहात की तुमच्या बिलर्ससाठी रिमाइंडर सुविधा सेट-अप करून बीएफएल तुम्हाला नोटिफिकेशन्स पाठवू शकते. तुम्ही त्यास स्पष्टपणे संमती देऊन ऑटो पेमेंट सुविधा देखील सक्षम करू शकता. तुम्ही समजता की एकदा केलेले ट्रान्झॅक्शन आणि बिल पेमेंट सर्व्हिसेस साठी बिलरला केलेले पेमेंट्स नॉन-रिफंडेबल आहेत.

(ज) तुम्ही सहमत आहात की संबंधित बिलर्सची ओळख पटल्यानंतर बीएफएल किंवा बजाज फिनसर्व्ह ॲप वेळोवेळी संबंधित बिलर्सकडील तुमच्या अकाउंटच्या संदर्भात बिल तपशील व पेमेंट स्थिती संबंधित बिलर्स किंवा बीबीपीएस पेमेंट सिस्टीम मार्फत प्राप्त करेल आणि बीएफएल किंवा बजाज फिनसर्व्ह ॲप तुम्हाला बजाज फिनसर्व्ह ॲपवर अशी माहिती प्रदर्शित करेल आणि/किंवा अशा संबंधित बिलर्सकडील तुमच्या थकबाकी संदर्भात तुम्हाला रिमाइंडर्स पाठवेल.

(झ) बीएफएल बिलर्ससाठी कोणत्याही ड्युप्लिकेट मानक सूचना किंवा विलंबित पेमेंटसाठी किंवा बिलरद्वारे तुमच्यावर आकारलेला कोणताही दंड / इंटरेस्ट यासाठी जबाबदार असणार नाही.

(ञ) तुम्ही तुमच्या नियतकालिक बिल, सबस्क्रिप्शन फी आणि रिचार्ज समाप्ती आणि किंवा तुम्ही लाभ घेतलेल्या कोणत्याही युटिलिटीज/सर्व्हिसेस किंवा रिकरिंग चार्ज सर्व्हिसेसची देय तारीख यांचा ट्रॅक ठेवण्यास जबाबदार आहात आणि बीएफएल बिलर्सकडील बिलांच्या नियतकालिक पुनर्प्राप्ती संदर्भातील कोणत्याही तांत्रिक त्रुटीसाठी किंवा बिलांमधील कोणत्याही त्रुटी / विसंगतीसाठी जबाबदार असणार नाही.

(ट) तुम्ही समजता आणि सहमत आहात की बीएफएल केवळ पेमेंटचा सुविधाकर्ता आहे आणि पेमेंटसाठी पार्टी नाही. बीएफएल कंझ्युमर नंबर, सबस्क्रिप्शन आयडी, बिल नंबर किंवा रजिस्टर्ड मोबाईल नंबर, रजिस्टर्ड टेलिफोन नंबर, अकाउंट आयडी/कस्टमर आयडी किंवा अशा इतर ओळखकर्त्यांसह माहितीचा वापर करू शकते. जे बिल पेमेंट सुलभ करण्यासाठी थकित

पेमेंट/सबस्क्रिप्शन किंवा बिल वॅल्यू, सबस्क्रिप्शन प्लॅन, देय तारीख आणि अशी इतर माहिती प्राप्त करण्यासाठी आवश्यक आहे.

(ठ) तुम्ही बीएफएलला ट्रान्झॅक्शन प्रोसेसिंग साठी तुमच्या अकाउंटची माहिती असलेले बिलर, थर्ड पार्टी सर्व्हिस प्रोव्हायडर्स, ॲग्रीगेटर यांच्याशी संपर्क साधण्यास सहमत आहात आणि मान्यता देता.

(ड) बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवरील कोणत्याही बिल पेमेंट ट्रान्झॅक्शन साठी आणि प्रीपेड मोबाईल रिचार्जसाठी प्लॅटफॉर्म शुल्कासाठी बीएफएल सर्व्हिस शुल्क, कस्टमर सुविधा शुल्क ("सीसीएफ") आकारू शकते). सर्व्हिस शुल्क किंवा सीसीएफ, जर असल्यास, पेमेंट सुरू होण्यापूर्वी ट्रान्झॅक्शन स्क्रीनवर प्रदर्शित केले जाईल. सर्व्हिस शुल्क किंवा सीसीएफ आणि प्लॅटफॉर्म शुल्क येथे शेड्यूल 1 अंतर्गत देखील पाहिले जाऊ शकते. प्लॅटफॉर्म शुल्क हे रिचार्ज आणि बिल पेमेंट करताना बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वापरण्यासाठी कस्टमर्सना नाममात्र शुल्क आकारले जाते. हे शुल्क पेमेंट पद्धतीची पर्वा न करता लागू होते. तर ट्रान्झॅक्शनशी संबंधित खर्च कव्हर करण्यासाठी सीसीएफ आकारले जाते. प्लॅटफॉर्म शुल्क आणि सीसीएफ रक्कम देय रकमेनुसार बदलू शकते.

(ढ) बजाज फिनसर्व्ह अँड्रॉईड ॲप व्हर्जन 9.0.5 आणि 10.0.0 मध्ये नमूद केलेले "सुविधा शुल्क" हा शब्द केवळ “प्लॅटफॉर्म शुल्क” या अर्थानेच समजावा, दर्शवावा आणि वाचावा, असे स्पष्ट करण्यात येते.

(ण) थर्ड पार्टी पेमेंट सहभागी आणि / किंवा बिलर्सकडून ॲक्सेस, थर्ड पार्टी पेमेंट किंवा अशा अन्य डाटा फी साठी शुल्क आकारले जाऊ शकते, जे तुम्हाला स्पष्टपणे मान्य आहे आणि बीएफएल त्यासाठी जबाबदार असणार नाही.

(त) पेमेंट प्राप्ती बिलर निहाय बदलते आणि तुम्ही समजता की बीएफएल केवळ तुमच्याकडून वैध सूचना प्राप्त केल्यावरच बिल पेमेंटवर प्रक्रिया करेल. डीले/रिव्हर्सल किंवा ट्रान्झॅक्शनच्या अयशस्वीतेसाठी बीएफएल कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

## बजाज पे क्रेडिट कार्ड हबसाठी लागू असलेल्या अटी व शर्ती बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर उपलब्ध

या अटी व शर्ती ("अटी") बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मद्वारे बीएफएलद्वारे उपलब्ध करून दिलेल्या बजाज पे क्रेडिट कार्ड हब सर्व्हिसेसचा तुमचा ॲक्सेस आणि वापर नियंत्रित करतात, जे क्रेडिट कार्ड स्टेटमेंट प्राप्त करण्यासाठी ईमेल एकत्रीकरण, क्रेडिट ब्युरो रिपोर्टद्वारे क्रेडिट कार्ड लिंक करणे, रिमाइंडर पाठवणे, क्रेडिट कार्ड बिल पेमेंट पर्याय प्रदान करणे आणि स्मार्ट स्टेटमेंट निर्माण करण्यासह सर्व्हिसेस ऑफर करते. बजाज पे क्रेडिट कार्ड हब सर्व्हिसेस ॲक्सेस करून किंवा वापरून, तुम्ही या अटींना बांधील राहण्यास सहमत आहात.

1. सर्व्हिस वर्णन: बजाज पे क्रेडिट कार्ड हबद्वारे बीएफएल त्यांच्या कस्टमर्सना खालील सर्व्हिसेस प्रदान करते:

- ईमेल एकत्रीकरण: तुमच्या ईमेल अकाउंटमधून क्रेडिट कार्ड स्टेटमेंट ॲक्सेस आणि पुन्हा प्राप्त करा.

- क्रेडिट कार्ड ओळख: क्रेडिट कार्ड अकाउंटची ओळख आणि क्रेडिट कार्ड बिलांसाठी पेमेंट करताना किंवा क्रेडिट कार्ड वापरून बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर ट्रान्झॅक्शन करताना कस्टमरने प्रदान केलेल्या माहितीमधून त्यास लिंक करणे.
- रिमाईंडर: आगामी क्रेडिट कार्ड बिल पेमेंट विषयी रिमाईंडर मिळवा.
- पेमेंट सर्व्हिसेस: बजाज पे सर्व्हिसेस वापरून तुमचे क्रेडिट कार्ड बिल भरण्याचा पर्याय मिळवा.
- स्मार्ट स्टेटमेंट्स: तुमच्या क्रेडिट कार्ड ट्रान्झॅक्शन रेकॉर्डवर आधारित छुपे शुल्क, खर्चाचे ट्रेंड्स आणि इतर माहिती ओळखण्यासाठी क्रेडिट कार्ड स्टेटमेंटमधून स्नॅपशॉट्स निर्माण करा.

2. यूजर संमती आणि अधिकृतता: बजाज पे क्रेडिट कार्ड हब सर्व्हिसेस वापरून, तुम्ही खालील गोष्टींसाठी तुमची संमती आणि अधिकृतता स्पष्टपणे प्रदान करता:

• जर तुम्ही तुमच्या ईमेल अकाउंटचे लिंकेज आणि कनेक्शन अधिकृत केले तर आम्ही खालील माहिती संकलित करण्यासाठी ईमेल अकाउंट ॲक्सेस करू शकतो:

o क्रेडिट कार्ड बिल तपशील जसे की एकूण देय रक्कम, किमान देय रक्कम आणि देय तारीख आणि ट्रान्झॅक्शन माहिती;

o युटिलिटी बिल सारख्या इतर बिलांशी संबंधित तपशील;

o क्रेडिट कार्डवरील खर्च, क्रेडिट कार्डशी संबंधित बिल पेमेंट संदर्भात तपशील.

o तुम्ही अधिकार राखून ठेवता आणि गूगल अकाउंटच्या थर्ड-पार्टी कनेक्शन पेजला भेट देऊन ॲक्सेस परवानगी सुधारित करून ईमेल परवानगी ॲक्सेस रद्द करू शकता.

o तुमच्या ईमेल अकाउंटमध्ये बीएफएलचा ॲक्सेस ईमेल प्रोव्हायडरच्या ॲक्सेस यंत्रणेद्वारे सुलभ केला जातो. जर तुम्ही तुमचे क्रेडिट कार्ड अकाउंट ट्रॅक करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मला अधिकृत केले तर बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म तुमचे साईन-इन यूजर नेम आणि ट्रॅक केलेल्या अकाउंटसाठी अधिकृतता टोकनसह प्रत्येक ईमेल अकाउंटसाठी अकाउंट तपशील सुरक्षितपणे स्टोअर करेल.

o ईमेल वाचन हे फक्त क्रेडिट कार्ड स्टेटमेंट्स, बिल पेमेंट्स, बिलर तपशील यांच्याशी संबंधित ईमेलपर्यंतच मर्यादित आहे, आणि बीएफएल कोणत्याही वैयक्तिक ईमेलचा ॲक्सेस करत नाही. स्पष्टतेसाठी, बीएफएल तुमच्याद्वारे प्रदान केलेल्या माहितीचा ॲक्सेस आणि विश्लेषण करण्यासाठी ऑटोमेटेड प्रोसेसचा वापर करते, ज्यामध्ये पासवर्ड-संरक्षित क्रेडिट कार्ड स्टेटमेंट ॲक्सेस करण्यासाठी आमच्या अल्गोरिदमचा समावेश असू शकतो.

• क्रेडिट माहिती: तुम्ही तुमच्या क्रेडिट ब्युरो रिपोर्टचा वापर करून क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्या (सीआयसी) कडून तुमची क्रेडिट माहिती पुन्हा प्राप्त करण्यासाठी बीएफएलला अधिकृत करीत आहात. मिळालेली माहिती बजाज पे क्रेडिट कार्ड हबसह तुमचे क्रेडिट कार्ड अकाउंट

ओळखण्यासाठी आणि बिल रिमाइंडर, बिल पेमेंट सर्व्हिसेस, माहिती, स्मार्ट स्टेटमेंट्स इ. प्रदान करण्यासाठी वापरली जाईल.

• डाटा वापर: तुम्ही रिमाइंडर, पेमेंट सर्व्हिसेस आणि स्मार्ट स्टेटमेंट सारख्या सर्व्हिसेस प्रदान करण्यासाठी ट्रान्झॅक्शन रेकॉर्डसह तुमच्या वैयक्तिक डाटाचे कलेक्शन, स्टोरेज आणि प्रोसेसिंग करण्यास संमती देता.

• कम्युनिकेशन: तुम्ही बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म कडून देय क्रेडिट कार्ड बिल आणि इतर संबंधित माहिती संदर्भात नोटिफिकेशन आणि रिमाइंडर प्राप्त करण्यास संमती देता.

3. माहितीची अचूकता: तुमच्या ईमेल आणि सीआयसी रिपोर्टमधून प्राप्त केलेल्या माहितीची अचूकता सुनिश्चित करण्याचा बीएफएल प्रयत्न करत असताना, आम्ही त्याच्या अचूकतेची गॅरंटी देत नाही. तुम्ही मान्य करता की या स्रोतांकडून मिळालेल्या डाटामध्ये त्रुटी असू शकतात आणि पेमेंट करणे किंवा स्मार्ट स्टेटमेंटवर अवलंबून राहणे यासारख्या कोणत्याही कृती करण्यापूर्वी माहितीचा रिव्ह्यू आणि पडताळा करणे ही तुमची जबाबदारी आहे.

4. क्रेडिट कार्ड बिल पेमेंट सर्व्हिसेस: तुम्ही बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म वापरून क्रेडिट कार्ड बिल पेमेंटशी संबंधित ट्रान्झॅक्शन नियंत्रित करणाऱ्या बजाज फिनसर्व्ह वापरायच्या अटी आणि या अटी व शर्तींशी बांधील राहण्यास सहमत झाल्यानंतर तुमच्या क्रेडिट कार्डसाठी पेमेंट करण्यासाठी बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मवर क्रेडिट कार्ड बिल पेमेंट फीचर वापरू शकता.

• तुम्ही सहमत आहात की तुमच्याशी संबंधित नसलेल्या क्रेडिट कार्ड बिलांसाठी पेमेंट करण्यासाठी तुम्हाला व्यावसायिकरित्या क्रेडिट कार्ड बिल पेमेंट पर्याय ऑफर करण्यास परवानगी नाही.

• क्रेडिट कार्ड बिल पेमेंट फीचर सह बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्मचा वापर करताना तुम्ही दिलेल्या आणि इनपुट केलेल्या सर्व माहितीसाठी तुम्ही जबाबदार असाल.

o विशेषतः तुम्ही जबाबदार आहात आणि पुढीलसाठी योग्यता सुनिश्चित करण्यास सहमत आहात

o ज्या क्रेडिट कार्डसाठी पेमेंट केले जात आहे त्याचे तपशील;

o ज्या पेमेंट इन्स्ट्रुमेंट मधून पेमेंट केले जात आहे त्याचे तपशील;

o ट्रान्झॅक्शनची रक्कम.

- तुम्ही समजता की ट्रान्झॅक्शन करण्यापूर्वी ट्रान्झॅक्शन / क्रेडिट कार्ड तपशील / लाभार्थी तपशील / पेमेंटची पद्धत पडताळण्यासाठी तुम्ही पूर्णपणे जबाबदार असाल. बीएफएल ट्रान्झॅक्शन रिव्हर्स करण्यासाठी किंवा तुमच्याद्वारे अधिकृत कोणतेही ट्रान्झॅक्शन करताना तुम्ही दिलेल्या कोणत्याही चुकीच्या माहितीसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. जर तुम्ही कोणतेही तपशील चुकीच्या पद्धतीने एन्टर केले तर तुम्ही परिणामी ट्रान्झॅक्शन आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या सर्व शुल्कांसाठी जबाबदार असाल.
- रिफंड: जर सोर्स अकाउंटमधून पैसे डेबिट केले असतील तथापि, ट्रान्झॅक्शन वेळेपासून 5 ते 7 दिवसांच्या आत तुमच्या क्रेडिट कार्डमध्ये जमा झाले नाही, अशा घटनेमध्ये तुम्ही वरील क्लॉज 30 (तक्रारी) नुसार बीएफएलच्या कस्टमर सपोर्ट सेक्शन कडे विनंती करू शकता. तथापि,

लागू बँक, कार्ड नेटवर्क किंवा इतर कोणत्याही मध्यस्थ क्रेडिट कार्ड सर्व्हिस प्रोव्हायडरच्या सिस्टीम किंवा नेटवर्कमध्ये अयशस्वी झाल्यास रिफंडसह कोणतेही आणि सर्व दायित्व बीएफएल अस्वीकार करते.

5. स्मार्ट स्टेटमेंट्स: बजाज पे क्रेडिट कार्ड हब सर्व्हिसेस वापरताना तुम्ही तुमच्या क्रेडिट कार्ड ट्रान्झॅक्शन रेकॉर्डवर आधारित छुपे शुल्क, खर्च ट्रेंड्स आणि इतर माहिती ओळखण्यास मदत करण्यासाठी स्मार्ट स्टेटमेंट्स तयार करू शकता. बीएफएलचे उद्दीष्ट अचूक आणि अर्थपूर्ण माहिती प्रदान करणे आहे, तर आम्ही या स्टेटमेंटची पूर्णता किंवा अचूकतेची हमी देत नाही.

## घ. इमीडिएट पेमेंट सर्व्हिस ("आयएमपीएस") आधारित इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफरच्या अटी व शर्ती

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि/किंवा नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एकत्रितपणे "**आयएमपीएस रेग्युलेशन्स**") द्वारे जारी केलेल्या लागू गाईडलाईन्स, परिपत्रक, रेग्युलेशन्स आणि निर्देशांनुसार बीएफएल अकाउंट धारकाला सर्वोत्तम प्रयत्नाच्या आधारावर आयएमपीएस प्रदान करेल आणि या अटी वेळोवेळी जारी केलेल्या वर नमूद केलेल्या लागू आयएमपीएस कायद्यांच्या अतिरिक्त आहेत आणि त्यांचा अवमान नाहीत. येथे काहीही असले तरी, बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस नियंत्रित करणाऱ्या सर्व वापरायच्या अटी लागू राहतील आणि खाली नमूद केलेल्या अटींसह संयुक्तपणे वाचल्या जातील:

(क) **इमीडिएट पेमेंट सर्व्हिस ("आयएमपीएस"):**

इमीडिएट पेमेंट सर्व्हिस" (यानंतर "आयएमपीएस" / "फंड ट्रान्सफर सिस्टीम" म्हणून संदर्भित) नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) द्वारे प्रदान केलेली त्वरित 24*7, इंटरबँक, इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर सर्व्हिस आहे.

(ख) **फंड ट्रान्सफर सिस्टीमद्वारे फंडचे इनवर्ड आणि आऊटवर्ड रेमिटन्स**

(i) बीएफएलचे बजाज फिनसर्व्ह प्लॅटफॉर्म सर्व्हिसेस धारक ("अकाउंट धारक") याद्वारे इनवर्ड आणि आऊटवर्ड फंड ट्रान्सफर सुविधा असण्यास सहमत आहे.

(ii) फंड ट्रान्सफर सिस्टीमद्वारे फंडचे रेमिटन्स वेळोवेळी लागू असलेल्या आयएमपीएस नियमांच्या अधीन असेल.

(iii) यशस्वी ट्रान्झॅक्शन पूर्ण झाल्यानंतर फंड ट्रान्सफर सिस्टीमद्वारे प्रभावित ट्रान्झॅक्शनच्या रकमेसह अकाउंट धारकाचे अकाउंट डेबिट किंवा क्रेडिट केले जाईल.

(ग) **अकाउंट धारकाचे हक्क आणि दायित्व**

(i) संपूर्ण आणि अचूक फॉर्ममध्ये आयएमपीएस द्वारे पेमेंट सूचना जारी करण्यासाठी अकाउंट धारक जबाबदार असेल आणि त्याच्या अकाउंटवर उद्भवणाऱ्या कोणत्याही नुकसानीसाठी बीएफएलला भरपाई देण्यास जबाबदार असेल.

(ii) जर बीएफएलने चांगल्या विश्वासाने पेमेंट सूचना अंमलात आणली असेल आणि अकाउंट धारकाने दिलेल्या सूचनांचे अनुपालन केले असेल तर अकाउंट धारकाला आयएमपीएस द्वारे अंमलात आणल्या जाणाऱ्या कोणत्याही पेमेंट सूचना बंधनकारक असतील.

(iii) आयएमपीएस द्वारे कोणतीही पेमेंट सूचना सुरू करण्यापूर्वी अकाउंट धारकाने त्याच्या अकाउंटमध्ये पुरेसा फंड असल्याचे सुनिश्चित करावे.

(iv) अकाउंट धारक हे मान्य करतो की, आयएमपीएसच्या वास्तविक वेळेच्या स्वरुपामुळे, आयएमपीएसद्वारे दिलेल्या पेमेंट सूचना अपरिवर्तनीय असतील.

(v) खालील घटनेमध्ये अकाउंट धारकाने जारी केलेल्या आयएमपीएस द्वारे पेमेंट सूचनांवर प्रोसेस करण्यास बीएफएल जबाबदार असणार नाही:

क) अकाउंट धारकाकडील उपलब्ध फंड अपुरे आहेत.

ख) आयएमपीएस मार्फत पेमेंट सूचना अपूर्ण आहेत किंवा कोणत्याही प्रकारे चुकीच्या आहेत.

ग) जर बीएफएलच्या पाहणीत दिसून आल्यास बेकायदेशीर आणि/किंवा संशयास्पद ट्रान्झॅक्शन करण्यासाठी आयएमपीएस द्वारे पेमेंट सूचना जारी केल्या गेल्या आहेत.

(घ) **फी आणि शुल्क**

(i) फंड ट्रान्सफर सिस्टीम सुविधा प्राप्त करण्यासाठी लागू फी आणि शुल्क फंड ट्रान्सफर सुरू करण्यापूर्वी बीएफएलच्या वेबसाईटवर आणि बजाज फिनसर्व्ह ॲपवर प्रदर्शित रेट्सनुसार असतील. बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार अकाउंट धारकाला कोणतीही पूर्वसूचना न देता अशा फी आणि शुल्क अपडेट करू शकते.

(ii) फंड ट्रान्सफर सिस्टीमद्वारे फंडच्या आऊटवर्ड किंवा इनवर्ड रेमिटन्सच्या परिणामी देय असलेले कोणतेही सरकारी शुल्क, ड्युटी किंवा डेबिट किंवा टॅक्स अकाउंट धारकाची जबाबदारी असेल आणि, जर लादले असेल तर बीएफएल असे शुल्क, ड्युटी किंवा टॅक्स अकाउंट धारकाच्या अकाउंटमधून डेबिट करेल.

(iii) आऊटवर्ड फंड ट्रान्सफरसाठी लाभार्थी बँकद्वारे आणि इनवर्ड फंड ट्रान्सफरसाठी रेमिटर बँकद्वारे जर शुल्क आकारणी केली जात असल्यास बीएफएल जबाबदार असणार नाही.

(ङ) **ट्रान्झॅक्शन तपशील**

(i) अकाउंट धारकाचे पासबुक/स्टेटमेंट फंड ट्रान्सफर सिस्टीमद्वारे केलेले सर्व ट्रान्झॅक्शन दर्शवेल.

(ii) बीएफएलच्या अटींनुसार केलेल्या आयएमपीएस ट्रान्झॅक्शनसाठी अकाउंट धारकाला एसएमएस अलर्ट्स पाठवले जाऊ शकतात.

(च) **ट्रान्झॅक्शन विवाद**

(i) जर स्टेटमेंटमध्ये सूचीबद्ध ट्रान्झॅक्शन विषयी विवाद असेल तर तुम्ही पासबुक/स्टेटमेंटमध्ये दिसणाऱ्या ट्रान्झॅक्शनच्या 60 दिवसांच्या आत बीएफएलला सूचित करणे आवश्यक आहे. बीएफएल तपासणी करेल आणि अशा ट्रान्झॅक्शन बाबत उत्तर देईल.

(ii) जर अकाउंट धारकाच्या बाजूने विवाद सेटल केला नसल्यास बीएफएल त्यानुसार वॉलेट अकाउंटमधून रक्कम डेबिट करू शकते. जर विवाद अकाउंट धारकाच्या बाजूने सेटल केले असेल तर बीएफएल त्यानुसार रक्कम क्रेडिट करेल.

(iii) जर अकाउंट धारक अनावश्यक किंवा चुकीच्या अकाउंटमध्ये फंड ट्रान्सफर सुरू करत असेल तर पैसे रिकव्हर करण्यासाठी बीएफएल जबाबदार असणार नाही.

(छ) **टर्मिनेशन**

फंड ट्रान्सफर सिस्टीम केवळ बीएफएल सह अकाउंट धारकाच्या अकाउंटच्या अस्तित्वादरम्यान अस्तित्वात असेल. खालीलपैकी कोणतीही घटना घडल्यानंतर 30 दिवसांच्या पूर्व सूचनासह बीएफएलला फंड ट्रान्सफर सिस्टीम सुविधा समाप्त करण्याचा अधिकार असेल:

(i) येथे नमूद केलेल्या अटी व शर्तींचे (वापरायच्या अटी सहित) पालन किंवा कार्यवाही करण्यात अयशस्वी, किंवा

(ii) जर अकाउंट धारकाने बीएफएल सह त्याचे/तिचे अकाउंट बंद करण्याचे ठरवले असल्यास;

(iii) अकाउंट धारकाच्या मृत्यूची माहिती प्राप्त झाल्यावर.

## ङ. बजाज पे फास्टॅगसाठी लागू अटी व शर्ती

बजाज पे फास्टॅग हा रेडिओ-फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन टेक्नॉलॉजी (आरएफआयडी) वर आधारित एक सोपा आणि पुन्हा वापरण्यायोग्य टॅग आहे. जो वाहनाच्या विंड स्क्रीनवर लावला जाईल. टोल शुल्काची त्वरित ऑटोमॅटिक कपात सुलभ करण्यासाठी प्रत्येक फास्टॅग रजिस्टर्ड बजाज पे वॉलेटसह लिंक केले आहे. हा प्रोग्राम नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (एनएचएआय) आणि इंडियन हायवे मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड (आयएचएमसीएल) च्या गाईडलाईन्सनुसार एनपीसीआय द्वारे सुरू केलेल्या नॅशनल इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन (एनईटीसी) पुढाकाराचा भाग आहे.

एखाद्या विशिष्ट वाहनासाठी एका वेळी फक्त एकच फास्टॅग जारी केला जाऊ शकतो. कस्टमर नवीन फास्टॅग मिळवण्यासाठी बीएफएल कडे येत असल्यास, त्याच वाहनासाठी पूर्वी जारी केलेला फास्टॅग नष्ट आणि निष्क्रिय केला गेला आहे याची खात्री कस्टमरने करणे आवश्यक आहे. जर कस्टमर फास्टॅग नष्ट करण्यात अपयशी ठरला, तर त्याच्यावर दोन्ही फास्टॅग वरून शुल्क आकारले जाईल, जोपर्यंत त्यापैकी एक फास्टॅग नष्ट/निष्क्रिय केले जात नाही आणि आधीचा फास्टॅग जारीकर्ता संस्थेला ते नष्ट झाल्याचे सूचित केले जात नाही. खालील अटी व शर्ती बीएफएल द्वारे तुम्हाला ("कस्टमर") उपलब्ध करून दिलेल्या आरएफआयडी सक्षम प्रीपेड फास्टॅग ("फास्टॅग") सुविधेवर लागू आहेत जे बजाज फिनसर्व्ह ॲपच्या वापरायच्या अटी आणि बजाज पे वॉलेटच्या अटी व शर्तींसह संयुक्तपणे वाचले

जाईल, जोपर्यंत वापरायच्या अटी आणि बजाज पे वॉलेटच्या अटी खाली नमूद केलेल्या अटींशी विसंगत नसतील:

1. ॲप्लिकेशन सबमिट करण्याद्वारे, कस्टमरने संबंधित अटी व शर्ती मान्य केल्या आहेत आणि स्वीकारल्या आहेत, असे समजले जाईल. बीएफएल केवळ फास्टॅगसाठी ॲप्लिकेशन करणाऱ्या आणि वेळोवेळी बीएफएलने विहित केलेल्या फॉर्म आणि पद्धतीने लागू अटी व शर्तींशी सहमत असलेल्या कस्टमर्सना बजाज पे फास्टॅग जारी करू शकते.

2. बीएफएल कडून फास्टॅग सर्व्हिसेसचा लाभ घेण्यापूर्वी बजाज पे फास्टॅग धारक योग्य सल्ला प्राप्त करेल आणि फास्टॅग सर्व्हिसशी संबंधित संबंधित जोखीम आणि सर्व अटी व शर्तींसह स्वत:ला परिचित करेल. फास्टॅग धारक सर्व तथ्ये आणि वैधानिक तरतुदींची पडताळणी करतो आणि संबंधित टॅक्स परिणामांसह योग्य प्रोफेशनल सल्ला घेतो.

3. फास्टॅगचा वापर इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन ("ईटीसी") सक्षम लेनद्वारे हायवेवरील नियुक्त टोल प्लाझावर लागू टोल पेमेंट करण्याच्या उद्देशाने केला जाईल. नियुक्त टोल प्लाझाची लिस्ट https://www.netc.org.in/netc-ecosystem-statistics येथे उपलब्ध केली आहे.

4. फास्टॅगचा वापर निवडक पार्किंग लॉट्सवर पार्किंग फीसाठी पेमेंट करण्यासाठी केला जाऊ शकतो जे फास्टॅगद्वारे पेमेंट स्वीकारतात आणि/किंवा निवडक इंधन स्टेशनवर इंधनासाठी जे एनपीसीआय द्वारे वेळोवेळी अनुमती असलेल्या फास्टॅग किंवा इतर रिटेल पेमेंट मार्फत पेमेंट स्वीकारतात.

5. फास्टॅग प्राप्त करू इच्छिणाऱ्या कस्टमरकडे बजाज पे वॉलेट असणे आवश्यक आहे.

6. बजाज पे वॉलेट वापरून फास्टॅग धारकाने केलेल्या खरेदीवर आकारले जाणारे कोणतेही शुल्क अशा बजाज पे वॉलेट धारकाद्वारे थेटपणे आस्थापनेसोबत सेटल केले जाईल आणि बीएफएल त्यासाठी जबाबदार असणार नाही.

7. वॉलेट मधून फास्टॅगसाठी बजाज पे वॉलेट धारकाद्वारे सर्व खर्च लागू कायद्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

8. बजाज पे फास्टॅग बजाज फिनसर्व्ह ॲप आणि यूआरएल www.bajajfinserv.in वर स्थित वेबसाईटद्वारे ऑनलाईन ई-कॉमर्स चॅनेलद्वारेही खरेदी केले जाऊ शकते. एकदा कस्टमर तपशील प्रदान केल्यानंतर, कस्टमर द्वारे प्रदान केलेल्या ॲड्रेसवर कुरिअर सर्व्हिसेसद्वारे कस्टमरला फास्टॅग पाठविला जाईल.

9. ऑनलाईन ॲप्लिकेशन फॉर्मद्वारे कस्टमरने प्रदान केलेल्या माहितीच्या आधारित, कस्टमरचे बजाज पे फास्टॅग वाहनाला वाटप केले जाईल, ज्याचे तपशील कस्टमरने प्रदान केले आहेत.

10. कस्टमरला बीएफएलकडे आवश्यक असताना फास्टॅग जारी करण्यासाठी खालील डॉक्युमेंट्सची वैध कॉपी/डिजिटल कॉपी प्रदान करावी लागेल.

- वाहन रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट (आरसी) पुढील आणि मागील बाजू;
- वाहन आणि फास्टॅगची स्पष्ट व वाचनीय पुढील व बाजूची प्रतिमा. पुढील प्रतिमेमध्ये फास्टॅग लावलेले असल्याचे आणि वाहन रजिस्ट्रेशन नंबर स्पष्टपणे दिसणे आवश्यक आहे. साईड

फोटोमध्ये वाहन ॲक्सल्स कॅप्चर केले जातील. जारी केलेल्या टॅगचा स्पष्ट फोटो कॅप्चर केलेला असेल.

11. डॉक्युमेंट्स प्रमाणित करण्यासाठी बजाज पे फास्टॅग ॲक्टिव्हेशनसाठी बीएफएल वेळोवेळी कस्टमरकडून वाहन तपशील, त्यावर लावलेल्या फास्टॅगसह वाहनाचा फोटो इ. सह परंतु त्यापुरते मर्यादित नाही अशा इतर कोणत्याही आवश्यक तपशिलाची मागणी करू शकते.

12. फास्टॅग जारी केल्यानंतर, कस्टमरला 3 दिवसांच्या आत वर नमूद केल्याप्रमाणे अनिवार्य डॉक्युमेंट्स सबमिट करणे आवश्यक आहे. असे डॉक्युमेंट्स सबमिट करण्यात अयशस्वी ठरल्यास बीएफएलला फास्टॅग हॉटलिस्ट किंवा बंद करण्याचा अधिकार मिळेल.

13. बीएफएल कधीही कस्टमरला वाहनाच्या फोटो/छायाचित्र सादर करण्यासाठी फोन द्वारे संपर्क साधू शकते. कस्टमरने बीएफएल द्वारे ठरवलेल्या कालावधीत आणि निकषांनुसार अशा फोटो/प्रतिमा प्रदान करण्यात अपयश आल्यास, कस्टमरच्या वरीलप्रमाणे झालेल्या अपयशामुळे बीएफएलला झालेला किंवा सोसलेला कोणताही खर्च किंवा नुकसान भरून काढण्यासाठी, बीएफएलकडे कस्टमरच्या नावावर असलेल्या कोणत्याही रकमेतील आवश्यक रक्कम सेट-ऑफ, ॲडजस्ट किंवा त्यात तदनुरूप वापरण्याचा बीएफएलला पूर्ण अधिकार असेल.

14. कस्टमर याद्वारे समजतो आणि मान्य करतो की, जर बीएफएलला एनईटीसी अधिग्रहण करणाऱ्या बँकेकडून/टोल प्लाझाकडून वाहन वर्गातील विसंगती/चुकीच्या टोल शुल्कावरील विवाद प्राप्त झाला आणि उपलब्ध पुरावे तपासल्यानंतर बीएफएल कस्टमरच्या वॉलेटमधील कमी बॅलन्समुळे विवादित रक्कम डेबिट करण्यास असमर्थ असेल, तर बीएफएलला तत्काळ त्या फास्टॅगला हॉटलिस्ट, ब्लॅकलिस्ट आणि/किंवा बंद करण्याचा अधिकार असेल, ज्यावर अशी देय रक्कम असेल, तसेच सिक्युरिटी डिपॉझिट मधून थकित देय रिकव्हर करण्याचा अधिकार असेल यासाठी कोणतीही पूर्वसूचना किंवा पुढील सूचना देण्याची आवश्यकता नसेल. परिणामी, कस्टमरकडून विवादित रक्कम रिकव्हर होईपर्यंत कस्टमर फास्टॅगवर पुढील कोणतेही ट्रान्झॅक्शन करण्यास असमर्थ असेल.

15. बजाज फास्टॅग केवळ ज्या वाहनासाठी ऑर्डर करण्यात आले आहे. त्या वाहनावर लावले असल्याची खात्री करण्यासाठी कस्टमर जबाबदार आहे. कस्टमर सहमत आहे की जर कस्टमर वाहनावर वैध फास्टॅग न लावता फास्टॅग लेन मध्ये प्रवेश करत असेल तर कस्टमर वाहनांच्या कॅटेगरीला लागू असलेल्या शुल्काच्या दुप्पट शुल्क भरण्यास जबाबदार असेल.

16. फास्टॅग ॲक्टिव्हेशनला जारी केल्यानंतर 24-48 कामकाजाचे तास लागतात.

17. फास्टॅग धारकाने बजाज पे फास्टॅग ऑर्डर/ॲक्टिव्हेट करताना बीएफएल कडे सबमिट केलेल्या कम्युनिकेशनसाठी त्याच्या/तिच्या ॲड्रेसमध्ये कोणत्याही बदलाबाबत त्वरित बीएफएलला सूचित करावे. कम्युनिकेशनसाठी बीएफएलला अचूक ॲड्रेसची माहिती दिली गेली आहे याची खात्री करण्यासाठी जबाबदारी पूर्णपणे फास्टॅग धारकाची असेल.

18. बीएफएल त्या फास्टॅगसाठी रजिस्टर्ड मोबाईल नंबरवर शॉर्ट मेसेजिंग सिस्टीम मेसेजद्वारे ट्रान्झॅक्शनल अलर्ट्स प्रदान करेल.

19. फास्टॅग धारक बीएफएल सोबतच्या सर्व व्यवहारांच्या संदर्भात सर्व वेळी सद्भावनेने कार्य करेल.

20. फास्टॅग धारक हे बजाज पे फास्टॅगच्या चुकीच्या वापरासाठी पूर्णपणे जबाबदार असेल .

21. कस्टमरला बजाज पे फास्टॅगचे कोणतेही नुकसान किंवा चोरी बीएफएलला सूचित करणे आवश्यक आहे. जर कस्टमरला हरवलेला किंवा चोरीला गेलेला फास्टॅग आढळला तर कृपया त्वरित बीएफएलला सूचित करा. फास्टॅगचे कोणतेही नुकसान किंवा चोरी त्वरित बीएफएलला सूचित केले जाईल.

22. जर कस्टमर बीएफएलला फास्टॅग हरवणे किंवा चोरीला गेल्याचे रिपोर्ट करण्यात अयशस्वी झाला तर बीएफएल कोणत्याही कस्टमर किंवा त्यांच्या प्रतिनिधीद्वारे फास्टॅगचा गैरवापर झाल्यामुळे किंवा त्यासंबंधी उद्भवणाऱ्या कोणत्याही दायित्वासाठी जबाबदार असणार नाही. कस्टमरला जारी केलेला फास्टॅग नेहमीच बीएफएलची प्रॉपर्टी राहील. फास्टॅग रिप्लेसमेंटच्या बाबतीत, कस्टमरला रु. 100/- पर्यंत रिप्लेसमेंट फी आकारली जाईल. फास्टॅग नॉन-ट्रान्सफरेबल आहे परंतु बीएफएलच्या पॉलिसीजनुसार रद्द केले जाऊ शकते.

23. कोणत्याही टप्प्यावर टोल प्लाझावर झालेल्या ट्रान्झॅक्शनमुळे कस्टमरच्या वॉलेटमधील थ्रेशोल्ड बॅलन्स संपल्यास आणि वॉलेट देय बॅलन्स स्थितीत पोहोचल्यास, फास्टॅग जारी करताना जमा केलेल्या कस्टमरच्या सिक्युरिटी रकमेमधून देय बॅलन्स ॲडजस्ट केला जाऊ शकतो. कस्टमरला बजाज पे कस्टमर सपोर्ट किंवा वेब पोर्टलद्वारे अपेक्षित कालावधीसाठी/कायमस्वरुपी फास्टॅग सर्व्हिसेस निलंबित/समाप्त करण्याचा अधिकार आहे.

24. फास्टॅगच्या टर्मिनेशन नंतर, कोणतीही थकित रक्कम, ती स्टेटमेंटमध्ये आधीच दर्शविली गेली असो किंवा नसो, तसेच टर्मिनेशन नंतर उद्भवलेली रक्कम/शुल्क, कस्टमरद्वारे त्वरित देय आणि देययोग्य होईल, जसे ती आधीच स्टेटमेंटमध्ये दर्शविली गेली असती आणि बीएफएलच्या पॉलिसी किंवा प्रोसेसच्या संदर्भात वेळोवेळी लागू होणारे इंटरेस्ट जमा होईल.

25. टर्मिनेशन पूर्वी फास्टॅगवर झालेल्या सर्व शुल्कासाठी कस्टमर बीएफएल साठी पूर्णपणे जबाबदार असेल.

26. टर्मिनेशनचे कम्युनिकेशन किंवा फास्टॅग सरेंडर करण्याची विनंती बीएफएल द्वारे एसएमएस आणि/किंवा ॲप नोटिफिकेशनद्वारे जारी केली जाईल आणि जेव्हा बीएफएलच्या रेकॉर्डनुसार कस्टमरला त्याच्या रजिस्टर्ड मोबाईल नंबरवर असे कम्युनिकेशन प्राप्त होईल तेव्हा कस्टमरला दिले जाईल असे मानले जाईल. कस्टमर असे करण्याची विनंती केल्यावर बीएफएल किंवा त्यांच्या प्रतिनिधीला फास्टॅग नष्ट करण्यास आणि/किंवा सरेंडर करण्यास सहमत आहे. कस्टमर त्याला/तिला टर्मिनेशनचे कम्युनिकेशन प्राप्त झाल्यानंतर फास्टॅगचा वापर करू शकत नाही.

27. बजाज पे फास्टॅग केवळ भारतात वैध आहे.

28. कस्टमरला बीएफएल द्वारे जारी केलेला फास्टॅग अनिवार्यपणे कस्टमर किंवा बीएफएलच्या अधिकृत प्रतिनिधीद्वारे परवाना प्लेट नंबर किंवा ॲप्लिकेशनमध्ये कस्टमरने निर्दिष्ट केलेल्या चेसिस

नंबरसह कस्टमरच्या वाहनावर लावला जाईल. फास्टॅग ट्रान्सफरेबल नाही आणि केवळ विशिष्ट वाहनासाठी वापरले जाईल ज्यावर फास्टॅग बीएफएलच्या अधिकृत प्रतिनिधीद्वारे लावलेला आहे.

29. कस्टमरला फास्टॅग फी अधिक लागू टॅक्स आणि सिक्युरिटी डिपॉझिटसाठी विशिष्ट रक्कम भरावी लागेल जी वाहनाच्या प्रकारानुसार निर्धारित केली जाईल (कृपया शुल्क पाहण्यासाठी https://www.bajajfinserv.in/all-fees-and-charges वर क्लिक करा).

30. फास्टॅग बीएफएल द्वारे ॲप्लिकेशनच्या मंजुरी आणि कस्टमरद्वारे फास्टॅगवर लोड केलेल्या किमान रकमेच्या अधीन ॲक्टिव्हेट केला जाईल, लागू असलेल्या शुल्क/फी इत्यादींची कपात करून, फास्टॅग सर्व्हिस घेण्यासाठी बीएफएलला कस्टमरकडून देय असलेली रक्कम वजा केल्यानंतर उर्वरित फंड बजाज पे वॉलेटमध्ये लोड केला जाईल.

31. कस्टमरने फास्टॅग सुरक्षित ठेवण्याची खात्री करावी. कस्टमर या अटी व शर्ती आणि फास्टॅगच्या संबंधात बीएफएलद्वारे वेळोवेळी निर्धारित सर्व पॉलिसींचे पालन करण्यास बांधील असेल. बीएफएल, त्यांच्या विवेकबुद्धीनुसार, ॲप्लिकेशन स्वीकारण्यास नकार देऊ शकते आणि सदस्याला फास्टॅग जारी करू शकते.

32. टोलवर आकारलेल्या कोणत्याही सरचार्ज आणि डेबिटसाठी बीएफएल कोणत्याही वेळी जबाबदार असणार नाही.

33. सहभागी टोल प्लाझा, पार्किंग लॉट किंवा इंधन स्टेशनवर करण्यात आलेले सर्व ट्रान्झॅक्शन हे कस्टमरने बजाज पे फास्टॅग वापरून संबंधित रकमेचा शुल्क आकारला गेला आहे किंवा अशी मागणी योग्य प्रकारे करण्यात आली आहे याचा अंतिम पुरावा मानला जाईल. मात्र फास्टॅग हरवलेला, चोरीला गेलेला किंवा फसवणुकीने वापरलेला असल्यास त्याचा पुरावा देण्याची जबाबदारी कस्टमरवर राहील.

34. कस्टमरने त्याच्या वॉलेटमध्ये उपलब्ध असलेल्या रकमेपेक्षा टोल प्लाझा, पार्किंग लॉट किंवा इंधन स्टेशनवर कधीही जास्त खर्च करू नये.

35. बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार कोणत्याही देय बॅलन्ससाठी कस्टमरला बिल देण्याचा अधिकार राखून ठेवते.

36. कस्टमर हे देय बॅलन्ससाठी तत्काळ बीएफएलला देय करण्यास सहमत आहे.

37. कस्टमरने फास्टॅगसह एक किंवा अधिक देय बॅलन्स तयार केल्यास फास्टॅग रद्द/समाप्त करण्याचा अधिकार बीएफएल स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार राखून ठेवते.

38. बीएफएल कोणतेही कारण न देता, फास्टॅग वरील ट्रान्झॅक्शन विनंत्या मान्य करण्यास नकार देण्याचा विवेकबुद्धीनुसार अधिकार राखून ठेवते.

39. बीएफएलला आवश्यक असलेले डॉक्युमेंट्स आणि माहिती सबमिट केल्यानंतर कस्टमरला कोणत्याही वेळी त्याचा/तिचा फास्टॅग रद्द करण्याचा आणि तसेच, वाहनामधून फास्टॅग हटवण्याचा आणि फास्टॅग नष्ट करण्याचा अधिकार आहे. बॅलन्स रक्कम (जर असल्यास) कस्टमरला त्याच्या बजाज पे वॉलेटमध्ये परत केली जाईल. बजाज पे वॉलेट बंद केल्याने ऑटोमॅटिकरित्या फास्टॅग बंद होईल.

40. फास्टॅग संबंधित कोणत्याही चौकशीसाठी बीएफएल कस्टमर केअरशी संपर्क साधला जाऊ शकतो. जर कस्टमरला फास्टॅगसह केलेल्या कोणत्याही ट्रान्झॅक्शनमध्ये कोणतीही अनियमितता किंवा विसंगती आढळल्यास त्वरित बीएफएलला सूचित करावे.

41. कस्टमर कडून बीएफएलला देय असलेली सर्व थकित रक्कम मागणी केल्यानंतर कस्टमर बीएफएलला देय करण्यास जबाबदार असेल.

42. फास्टॅग होल्ड करणे आणि वापरणे यासाठी शुल्क आकारले जाईल जे बजाज पे वॉलेट अकाउंटमध्ये उपलब्ध बॅलन्स मधून डेबिट केले जाईल.

43. फास्टॅग जारी करणे किंवा रिप्लेसमेंट शुल्क हे नॉन-रिफंडेबल आहे

44. सर्व जारी केलेले टॅग जे 5 वर्षांपेक्षा जास्त जुने आहेत, ते बदलले जाणे आवश्यक आहे.

45. जर कस्टमरने ज्या वाहनावर फास्टॅग आधीच जारी केला आहे त्या वाहनासाठी नवीन फास्टॅगची विनंती केली असेल, तर वाहनाला मॅप केलेला जुना फास्टॅग कमी बॅलन्समध्ये जोडला जाईल आणि त्यानंतर 15 दिवसांच्या आत टॅग बंद होईल.

46. फास्टॅग संदर्भात देय असलेले कोणतेही सरकारी शुल्क, डेबिटवरील शुल्क किंवा इतर कोणताही टॅक्स भरण्याची जबाबदारी कस्टमरची असेल. असे शुल्क किंवा टॅक्स बीएफएलवर (प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष) लादले गेल्यास, बीएफएल उपलब्ध फास्टॅग बॅलन्स मधून ते शुल्क, ड्युटीवरील टॅक्स डेबिट करेल. अशा सुविधांसाठी बीएफएल वेळोवेळी जाहीर करेल त्या अनुसार स्वतंत्र सर्व्हिस शुल्क आकारले जाईल आणि तेही फास्टॅग वर उपलब्ध बॅलन्समधून कपात केले जाईल. फास्टॅगवर उपलब्ध बॅलन्स अशा फी कपात करण्यासाठी पुरेसानाही अशा परिस्थितीत, बीएफएल पुढील ट्रान्झॅक्शन नाकारण्याचा अधिकार राखून ठेवते. कस्टमर बीएफएलला अधिकृत करतो की फास्टॅग साठी आवश्यक असलेले किमान थ्रेशोल्ड बॅलन्स राखण्यासाठी कस्टमरच्या बजाज पे वॉलेट मध्ये उपलब्ध असलेली रक्कम बीएफएल डेबिट करू शकेल. तसेच, फास्टॅग संदर्भात कस्टमर कडून प्रलंबित असलेल्या रकमेची वसुली करण्यासाठी बीएफएलने केलेला कोणताही खर्च बीएफएलला भरपाई म्हणून देण्याची कस्टमरची जबाबदारी राहील. (यामध्ये, परंतु त्यापुरते मर्यादित न राहता, योग्य कायदेशीर फी चा समावेश आहे). बीएफएल फास्टॅगच्या वापरासाठी सर्व्हिसेस आणि इतर शुल्क आकारू शकते, जे या अटी व शर्ती अपडेट करून कस्टमरद्वारे वेळोवेळी सूचित केले जाईल. कस्टमर बजाज पे वॉलेटवर उपलब्ध बॅलन्स डेबिट करून वेळोवेळी बीएफएलद्वारे निर्धारित केल्याप्रमाणे फास्टॅगशी संबंधित सर्व शुल्क रिकव्हर करण्यास अधिकृत करतो. बीएफएलद्वारे निर्धारित लागू फी आणि शुल्काचा तपशील प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित केला जाईल.

- जर बीएफएलला संशय किंवा माहिती असेल की कोणताही कस्टमर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही फसव्या किंवा बेकायदेशीर कृतीत गुंतला आहे आणि/किंवा बजाज कॉईन्स किंवा प्रोमो पॉईंट्स निगेटिव्ह बॅलन्स मध्ये गेला आहे, बीएफएल अशा कस्टमरला अयोग्य ठरविण्याचा अधिकार राखून ठेवते किंवा अशा अकाउंटला संशयित फसवणूक म्हणून चिन्हांकित करते.
- अशा कस्टमरला अपात्रतेच्या कालावधी दरम्यान कोणतेही रिवॉर्ड कमवणे किंवा रिडीम करणे शक्य होणार नाही.
- बीएफएल अशा कस्टमरच्या अपात्रता पूर्वी कस्टमरने कमावलेला कोणताही रिवॉर्ड जप्त करण्यासाठी विवेकबुद्धीचा वापर करू शकते.
- बीएफएल बजाज कॉईन्स / कॅशबॅक कमाई आणि रिडेम्पशनची कमाल मर्यादा निश्चित करण्याचा अधिकार राखून ठेवते.
- बीएफएल पॉलिसी नुसार जर कस्टमर दोषी आढळल्यास त्याला/तिला अपात्र ठरविण्याचा अधिकार बीएफएलकडे राखीव आहे. असे कस्टमर्स रिवॉर्ड प्रोग्रामसाठी पात्र असणार नाहीत.

**4) पात्रता:**

तुमचा लॉयल्टी प्रोग्राम/रिवॉर्ड प्रोग्राम प्राप्त करण्याचा हक्क पात्रता निकष पूर्ण करण्याच्या अधीन असेल जे तुमच्यावर बंधनकारक प्रत्येक बीएफएल प्रॉडक्ट्स / सर्व्हिसेस सह उपलब्ध आणि प्रदर्शित केले जातील, जे समजते की:

(क) तुम्ही यशस्वीरित्या बजाज फिनसर्व्ह ॲप डाउनलोड आणि इंस्टॉल केले आहे

(ख) तुम्ही बजाज फिनसर्व्ह ॲप वापरण्यासाठी यशस्वीरित्या रजिस्टर्ड आहात आणि तुमचे प्रोफाईल तपशील पूर्ण केले आहे

(ग) बीएफएल पॉलिसीनुसार तुम्ही दोषी कस्टमर नाही

(घ) तुम्हाला रिवॉर्ड प्रोग्राम अंतर्गत फ्रॉड कस्टमर म्हणून फ्लॅग केलेले नाही

बीएफएल त्यांच्या विवेकबुद्धीनुसार कस्टमरला गुडविल पॉईंट्स देऊ शकतात, जर अशा कस्टमरने बीएफएल टीमने निर्धारित केलेल्या निकषांची पूर्तता केली असेल. खालील परिस्थितींमध्ये गुडविल पॉईंट्स दिले जाऊ शकतात:

- कस्टमरला त्याचा रिवॉर्ड प्राप्त झाला नाही;
- रिवॉर्ड जारी करणे जुळले नाही;

**5) क्लेम प्रोसेस / युटिलायझेशन रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम:**

ऑफर केलेल्या विविध रिवॉर्ड प्रोग्रामच्या वापरायच्या अटीसह क्लेमची प्रोसेस उपलब्ध असेल आणि जर तुम्ही रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम नुसार लॉयल्टी प्रोग्राम लाभांचा क्लेम करण्यास पुढे सुरू ठेवल्यास येथे असलेल्या अटी व्यतिरिक्त तेच तुमच्यावर बंधनकारक असेल.

**6) तक्रार निवारण:**

जर असल्यास, तुमच्या तक्रारींचे प्रभावी निवारण करण्यासाठी संबंधित रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम्समध्ये नमूद केल्याप्रमाणे तुम्ही विवाद किंवा तक्रार निवारण प्रक्रियेचा आधार घ्याल.

**7) कोणतेही एक्स्चेंज नाही:**

बीएफएल रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम्सच्या एक्स्चेंजसाठी कोणतीही विनंती स्वीकारणार नाही.

**8) रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम इन प्रोसेस:**

कस्टमरने कमावलेले रिवॉर्ड लॉक केलेल्या स्थितीत असलेले काही इव्हेंट असू शकतात आणि रिवॉर्ड अनलॉक करणे विशिष्ट इव्हेंट पूर्ण करण्यावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत, निर्धारित इव्हेंट यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतरच रिवॉर्ड अनलॉक होईल आणि रिडेम्पशनसाठी उपलब्ध होईल. उदाहरणार्थ: कस्टमरने बजाज पे वॉलेट तयार करण्यासाठी रिवॉर्ड मिळवला, तथापि असे रिवॉर्ड लॉक केले आहे कारण अशा रिवॉर्डच्या रिडेम्पशन कस्टमरद्वारे बजाज पे वॉलेटमध्ये पैसे लोड केल्यासारख्या नंतरच्या कृतीवर अवलंबून असते. कस्टमर बजाज फिनसर्व्ह ॲपच्या 'रिवॉर्ड्स इन प्रोसेस' सेक्शन द्वारे लॉक केलेले रिवॉर्ड्स ॲक्सेस करू शकतात.

**9) रिवॉर्ड प्रोग्राम स्कीमचा विस्तार / रद्दीकरण / मागे घेणे:**

बीएफएलकडे तुम्हाला कोणतीही पूर्वसूचना न देता रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम विस्तार करण्याचा किंवा रद्द करण्याचा, विद्ड्रॉ किंवा टर्मिनेट करण्याचा अधिकार राखीव आहे.

10) बीएफएल कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय कोणत्याही वेळी या सर्व अटी व शर्ती जोडण्याचा / फेरफार करण्याचा / सुधारित करण्याचा / बदलण्याचा किंवा बदल करण्याचा किंवा रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम अंतर्गत असलेली ऑफर अन्य सारख्याच असलेल्या किंवा नसलेल्या ऑफरने पूर्णपणे किंवा अंशतः रिप्लेस करण्याचा अधिकार राखून ठेवते.

11) रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम अंतर्गत असलेल्या ऑफर्स, विशेषत: नमूद केल्याशिवाय, रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम अंतर्गत इतर कोणत्याही ऑफर्स सह एकत्रित केल्या जाऊ शकत नाहीत.

12) कस्टमर समजतो की लागू होणारे सर्व टॅक्स, फी आणि लेव्ही ('गिफ्ट' टॅक्स किंवा सोर्सवर वर कपात केलेले टॅक्स वगळून, जिथे लागू असेल तिथे) यांचा भार पूर्णपणे कस्टमरद्वारे उचलला जाईल..

13) जेव्हा असे आढळून येते की कस्टमरने रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम प्राप्त करण्यासाठी रजिस्ट्रेशनच्या वेळी आणि/किंवा त्याचे/तिचे लॉयल्टी प्रोग्राम लाभ घेताना कोणतीही चुकीची/खोटी/दिशाभूल करणारी माहिती प्रदान केली आहे तेव्हा बीएफएल ला त्याचे/तिचे हक्क/ रजिस्ट्रेशन रद्द करण्याचा अधिकार असेल.

14) कस्टमर मान्य करतो की रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम मिळविण्यासाठी बीएफएल कस्टमरने खरेदी केलेल्या प्रॉडक्टचा सप्लायर/मॅन्युफॅक्चरर/इश्यूअर नाही आणि थर्ड पार्टीद्वारे प्रदान केलेल्या प्रॉडक्ट किंवा लॉयल्टी प्रोग्रामच्या कोणत्याही हेतूसाठी किंवा कोणत्याही पैलूसाठी गुणवत्ता, व्यापारक्षमता किंवा फिटनेसशी संबंधित कोणतेही दायित्व स्वीकारणार नाही.

15) बीएफएल, त्यांच्या ग्रुप संस्था/सहयोगी किंवा त्यांचे संबंधित डायरेक्टर्स, ऑफिसर्स, कर्मचारी, एजंट, विक्रेते इ. कोणत्याही नुकसान किंवा हानीसाठी जबाबदार असणार नाहीत, किंवा प्रॉडक्ट्स / सर्व्हिसेसचा वापर करून किंवा वापर न करून किंवा कोणत्याही प्रकारे रिवॉर्ड प्रोग्राम स्कीमचे लाभ प्राप्त करण्यासाठी सहभागी होणे या कारणासह कस्टमरला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे झालेल्या कोणत्याही वैयक्तिक दुखापतीसाठी जबाबदार असणार नाही.

16) बीएफएल कोणत्याही अनपेक्षित घटना (महामारीच्या परिस्थिती / सिस्टीम बिघाड) मुळे कोणत्याही रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम्स लाभांच्या टर्मिनेशन किंवा विलंब किंवा अनुपलब्धतेसाठी जबाबदार असणार नाही आणि कोणत्याही परिणामांसाठी जबाबदार असणार नाही.

17) यामध्ये या रिवॉर्ड अटींव्यतिरिक्त, संबंधित रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम अंतर्गत संबंधित ऑफरच्या वापरायच्या अटी आणि अटी व शर्ती लागू असतील आणि तुमच्यावर बंधनकारक असतील. रिवॉर्ड प्रोग्राम स्कीम्समध्ये सहभागी होण्याद्वारे, तुम्ही येथे अटी व शर्ती वाचल्या, समजल्या आणि बिनशर्तपणे स्वीकारल्या असल्याचे मानले जाईल.

18) रिवॉर्ड प्रोग्राम स्कीममुळे किंवा त्याच्या कनेक्शन मध्ये किंवा त्याच्या परिणामी उद्भवणारे कोणतेही विवाद, पुणे मधील सक्षम न्यायालयांच्या विशेष अधिकारक्षेत्राच्या अधीन असतील.

19) या रिवॉर्ड अटी भारतीय कायद्यांनुसार नियंत्रित केल्या जातील.

### ञ. म्युच्युअल फंडसाठी अटी व शर्ती:

### ओव्हरव्ह्यू

बजाज फायनान्स लिमिटेड ("बीएफएल/म्युच्युअल फंड वितरक"), एएमएफआय रजिस्टर्ड म्युच्युअल फंड डिस्ट्रीब्युटर (रजिस्ट्रेशन नं. एआरएन - 90319). कॉर्पोरेट ॲड्रेस:, **.6th फ्लोअर बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट ऑफिस, ऑफ पुणे-अहमदनगर रोड, विमान नगर, पुणे - 411014**. हा म्युच्युअल फंड प्लॅटफॉर्म (**"प्लॅटफॉर्म"**) त्यांच्या युजरला येथे नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे

अनुपालन करण्याच्या अधीन आहे, सर्व डॉक्युमेंट्ससह; ज्यामध्ये ॲप्लिकेशन्स फॉर्म आणि अंडरटेकिंग यांचा समावेश आहे परंतु त्यापुरते मर्यादित नाही आणि बीएफएलच्या वेबसाईट/मोबाईल ॲप्लिकेशन वर समाविष्ट असलेल्या **"वापरायच्या अटी", "प्रायव्हसी पॉलिसी", "अस्वीकृती", "तक्रार"** आणि **"प्रकटीकरण"** यांसारख्या कोणत्याही अटी/संमती/पॉलिसीसह वाचून घ्याव्यात (वरील सर्वांचा एकत्रित उल्लेख **"वापरायच्या संयुक्त अटी"** असा केला जातो आणि ते येथे संदर्भाद्वारे समाविष्ट मानले जातात).

या अटींच्या उद्देशासाठी, "क्लायंट", "तुम्ही" किंवा "तुमचे" याचा अर्थ असा कोणताही नैसर्गिक किंवा कायदेशीर व्यक्ती ज्यांनी बीएफएलच्या वेबसाईट/मोबाईल ॲप्लिकेशनला भेट दिली आहे, त्यांनी या प्लॅटफॉर्मद्वारे ऑफर केलेल्या म्युच्युअल फंडमध्ये इन्व्हेस्टमेंट करण्यासाठी बीएफएल कडे अकाउंट उघडण्यासाठी रजिस्टर केले आहे/ रजिस्टर करण्यासाठी इच्छा दर्शविली आहे किंवा ऑन-बोर्डिंग प्रोसेस सुरू केला आहे. प्लॅटफॉर्मचा वापर आणि या अटींची स्वीकृती हे तुम्ही "वापरायच्या अटींना" स्पष्ट स्वीकृती दिली आहे असे समजले जाईल आणि विद्यमान कायद्यानुसार तुमच्या आणि बीएफएल मधील बंधनकारक आणि अमलात येणाऱ्या (**"स्वीकृत अटी"**) म्हणून ठरतील.

कृपया नोंद घ्या की येथे दिलेली माहिती कोणतीही पूर्वसूचना न देता बदलू शकते. प्लॅटफॉर्मचा सातत्याने वापर करण्यासाठी तुम्हाला वापरायच्या अटी वेळोवेळी तपासण्याचा सल्ला दिला जातो. कोणतेही बदल पोस्ट केल्यानंतर तुमचा प्लॅटफॉर्मचा सतत वापर किंवा ॲक्सेस हा त्या बदलांचा स्वीकार मानला जाईल.

### 1. सर्व्हिसेसचा वापर

- लागू असलेल्या कायद्यांनुसार, क्लायंट याद्वारे बीएफएलला केवळ त्याच्या/तिच्या/त्यांच्या जोखमीवर आवश्यक सर्व्हिसेस "स्वीकृत अटी" मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींनुसार प्रदान करण्यासाठी नियुक्त करतो.

तुम्ही याद्वारे प्रतिनिधित्व करता की:

- तुमच्याकडे या स्वीकृत अटींमध्ये पार्टी म्हणून पूर्ण कायदेशीर क्षमता आणि अधिकृतता आहे आणि ते तुमच्यावर कायदेशीर, वैध आणि बंधनकारक दायित्व तयार करेल.
- तुम्ही मान्य करता की तुम्ही स्वीकृत अटी आणि सर्व्हिसेसच्या स्वरूपाशी तसेच या स्वीकृत अटींच्या अंतर्गत होणाऱ्या ट्रान्झॅक्शनशी संबंधित सर्व जोखमींबाबत पूर्णतः सजग आहात, त्या स्वीकृत अटींमध्ये स्पष्टपणे नमूद असो किंवा नसो आणि याबाबत तुम्ही बीएफएल किंवा बीएफएलने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीला जबाबदार धरणार नाही.
- तुम्ही समजता की प्लॅटफॉर्मचा वापर तुमच्या स्वतःच्या जोखमीवर आणि इच्छेने पूर्णपणे ऐच्छिक आहे. प्रदान केलेल्या सर्व्हिसेसमध्ये प्लॅटफॉर्मद्वारे उपलब्ध करून दिलेल्या म्युच्युअल फंड आणि इतर सिक्युरिटीजमध्ये इन्व्हेस्ट करण्याचा ॲक्सेस समाविष्ट असेल (ज्याला "सर्व्हिसेस" म्हणून संबोधले जाते).
- या स्वीकृत अटी पार्टीची विषयाशी संबंधित संपूर्ण समजूतीचे प्रतिनिधित्व करते आणि यापूर्वी झालेल्या कोणत्याही लिखित किंवा मौखिक समजुती किंवा स्वीकृत अटींचे स्थान घेतात.

- या स्वीकृत अटींमध्ये नमूद केलेल्या सर्व्हिसेस व्यतिरिक्त जोपर्यंत पार्टींनी स्पष्टपणे सहमती दर्शवलेली नाही, तोपर्यंत इतर कोणतीही सर्व्हिस अभिप्रेत किंवा हमीपूर्ण नाही.
- तुम्ही समजता आणि मान्य करता की या स्वीकृत अटी अंतर्गत नमूद केलेली संबंध व्यवस्था सर्व्हिसेसच्या गैर-विशेषता यावर आधारित आहे. तुम्हाला सर्व इन्व्हेस्टमेंट आणि अंमलबजावणी निर्णयांवर पूर्ण स्वतंत्र निर्णय क्षमता राखण्याचा अधिकार असेल.
- या थर्ड-पार्टी ॲप्लिकेशन्स आणि वेबसाईटच्या युजर्सना सर्व्हिसेस देण्यासाठी, हा प्लॅटफॉर्म इतर थर्ड-पार्टी मोबाईल ॲप्लिकेशन्स आणि वेबसाईट सह एकत्रित केला जाऊ शकतो. तथापि, असे थर्ड-पार्टी एकत्रीकरण बीएफएलद्वारे या थर्ड पार्टीसोबत बीएफएल करू शकणाऱ्या करार व्यवस्थेनुसार मंजूर केले जातील. असे एकत्रीकरण बीएफएल रजिस्ट्रेशन नंबरसह प्रदर्शित केले जातील.
- वितरण सर्व्हिसेस घेऊ इच्छिणारे/घेत असलेले विद्यमान क्लायंट ग्रूपमध्ये ॲडव्हायजरी सर्व्हिसेस मिळविण्यास पात्र राहणार नाहीत.
- तुम्ही या स्वीकृत अटी अंतर्गत सर्व्हिसेस वापरण्यापूर्वी, वितरण सर्व्हिसेस बाबत कोणत्याही बजाज ग्रुप संस्थेशी कोणतेही संबंध तुम्ही ठेवलेले नाहीत, हे तुम्ही कन्फर्म करता. अधिक स्पष्टतेसाठी,बजाज ग्रुप संस्था म्हणजे, बीएफएल ची होल्डिंग कंपनी, सहाय्यक कंपनी, सहयोगी कंपनी किंवा बीएफएल च्या होल्डिंग कंपनीची सहाय्यक किंवा सहयोगी कंपनी.
- भारताबाहेरील रहिवासी, अनिवासी भारतीय, भारताशिवाय इतर देशातील नागरिक, पॉलिटिकली एक्सपोज्ड पर्सन यांना बीएफएलच्या इंटर्नल पॉलिसीनुसार प्लॅटफॉर्म आणि त्याच्या सर्व्हिसेसचा वापर करण्याची परवानगी नाही.
- या स्वीकृत अटींची मुदत तुम्ही म्युच्युअल फंड वापरायच्या अटी स्वीकारलेल्या तारखेपासून सुरू होईल आणि ती समाप्त होईपर्यंत वैध राहील.

## 2. सर्व्हिसेसची व्याप्ती

### 2.1 क्लायंट ऑनबोर्डिंग:

- प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असलेल्या सर्व्हिसेसचा लाभ घेण्यासाठी, तुम्हाला ऑनबोर्डिंग प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. यात, आवश्यक कायदे आणि रेग्युलेशन्सनुसार, केवायसी पडताळणी, बँक तपशील, रिस्क प्रोफाईल आणि एफएटीसीए घोषणा यांची पडताळणी समाविष्ट आहे परंतु त्यापुरते मर्यादित नाही. तुम्ही मान्य करत आहात की, या घोषणा आणि पडताळणी साठी आवश्यक असलेल्या बीएफएलच्या अंतर्गत अटी तुम्ही पूर्ण न केल्यास, बीएफएल तुम्हाला सर्व्हिसेस देण्यास नकार देऊ शकते.
- बीएफएल तुमची केवायसी माहिती सीकेवायसी रजिस्ट्री मधून प्राप्त करून ती आपल्या एमएफ पार्टनर्ससह शेअर करेल. जर तुमचे केवायसी रजिस्ट्रेशन नसल्यास, बीएफएल सीकेवायसी रजिस्ट्री वर तुमचे केवायसी रजिस्ट्रेशन करण्यास सुलभ करेल.
- बीएफएल तर्फे पेनी ड्रॉप प्रमाणीकरण प्रोसेसद्वारे तुम्ही प्रदान केलेल्या बँक माहितीची मालकी प्रमाणित केली जाईल किंवा आवश्यक वाटल्यास तुम्हाला वैध बँक स्टेटमेंट किंवा बँकेचे सर्टिफिकेट देण्यास सांगितले जाईल. तुम्ही समजता की तुमच्या नावाच्या बँक अकाउंट शिवाय इतर कोणत्याही अकाउंटमधून इन्व्हेस्टमेंट करण्यास परवानगी नाही. तुम्ही प्रदान केलेल्या

माहितीबाबत केलेल्या कृती व चुकांसाठी तुम्ही स्वतः जबाबदार असाल. जर दिलेली बँक अकाउंटची माहिती तुमची नसल्याचे आढळले, तर बीएफएल ला प्लॅटफॉर्मवरील तुमचा ॲक्सेस सस्पेंड किंवा टर्मिनेट करण्याचा अधिकार असेल.

- तुम्ही सहमत आहात आणि कन्फर्म करता की तुम्ही ऑनबोर्डिंग प्रोसेस पूर्ण करण्यासाठी सत्य, अचूक आणि सर्व आवश्यक तपशील प्रदान कराल ज्यात वैयक्तिक ओळख तपशील, ॲड्रेस, अकाउंट तपशील इ. समाविष्ट आहेत परंतु त्यापुरते मर्यादित नाही. बीएफएल हे सीईआरएसएआय, एनएसडीएल आणि इतर पार्टनर्स ("एमएफ पार्टनर्स") यांच्याकडे आपल्या क्लायंट्सच्या केवायसी रेकॉर्डच्या पडताळणीसाठी इंटरमीडियरी म्हणून रजिस्टर्ड आहे. देशातील लागू कायदे आणि रेग्युलेशन्स यांचे पालन करण्याकरिता रजिस्ट्रेशनसाठी किंवा केवायसी रेकॉर्ड अपडेट करण्यासाठी आवश्यक माहिती आणि डॉक्युमेंट प्रदान करणे आवश्यक असू शकते.
- तुम्ही प्लॅटफॉर्मवर आवश्यकतेनुसार, बीएफएलला दिलेल्या माहितीनुसार सहाय्यक डॉक्युमेंट्स पुरावा उपलब्ध करून देण्यास सहमत आहात. तसेच बीएफएल/ रेग्युलेटरी प्राधिकरणांना आवश्यक असल्यास अतिरिक्त डॉक्युमेंट प्रदान करण्यासही तुम्ही सहमती देत आहात.
- तुम्ही पुढे बीएफएलला अधिकृत करता की ते तुमची माहिती, ज्यामध्ये तुमची केवायसी माहितीही समाविष्ट आहे परंतु त्यापुरते मर्यादित नाही, हे त्यांच्या पार्टनर्सशी, संबंधित म्युच्युअल फंडांच्या ॲसेट मॅनेजमेंट कंपन्यांशी, वैधता आणि लागू नियमांचे पालन करण्याच्या उद्देशाने शेअर करू शकतात.
- तुम्ही प्रदान केलेल्या ईमेल आयडीची पडताळणी करणे देखील आवश्यक असेल. सर्व्हिसेसचा वापर सुलभ करण्यासाठी तुम्ही तुमच्या बँक अकाउंटशी लिंक असलेल्या मोबाईल नंबरसह प्लॅटफॉर्मवर रजिस्टर करावे असा सल्ला देखील दिला जातो. येथे दिलेल्या सर्व्हिसेसशी संबंधित सर्व कम्युनिकेशन्स रजिस्टर्ड आणि व्हेरिफाईड ई-मेल ॲड्रेसवर आणि मोबाईल नंबरवर केले जातील.
- तुम्ही सतत तुमच्याद्वारे प्रदान केलेली माहिती पूर्ण, अचूक आणि अप-टू-डेट ठेवण्यास आणि ऑनबोर्डिंगच्या वेळी दिलेल्या माहितीत कोणताही बदल झाल्यास, तो प्लॅटफॉर्मवरील कस्टमर पोर्टलद्वारे बीएफएलला सूचित करण्यास सहमत आहात. सर्व बदल बीएफएलच्या आवश्यक तपासणी आणि पडताळणीच्या अधीन राहतील.

**2.2 रिस्क प्रोफाईल:**

- तुम्ही हे देखील समजता की रिस्क प्रोफाईलर मूल्यांकन फक्त आपण इन्व्हेस्टमेंट करण्यास तयार झाल्यावरच सक्षम केले जाईल. रिस्क प्रोफाईल्स प्रश्नावली आणि रिपोर्ट्स काही विशिष्ट गृहीतकांवर आधारित असतात आणि एखाद्या व्यक्तीशी संबंधित अनेक बदलणारे घटक किंवा विशिष्ट बाबींचा विचार करत नाहीत, त्यामुळे दिलेल्या शिफारसींची अचूकता हमी पूर्वक सांगता येत नाही आणि त्यांना इन्व्हेस्टमेंट सल्ला म्हणून मानू नये.
- आणखीन अपडेटेड शिफारसी प्रतिबिंबित करण्यासाठी रिस्क प्रोफाईलचे मापदंड तयार करणाऱ्या परिस्थितींमध्ये काही बदल असल्यास ते एन्टर करण्याचा, बदलण्याचा, अपडेट करण्याचा सल्ला तुम्हाला देण्यात येत आहे.

- तुम्ही समजता की प्लॅटफॉर्मचा वापर तुमच्या स्वतःच्या जोखमीवर आणि इच्छेने पूर्णपणे ऐच्छिक आहे.
- या प्लॅटफॉर्मद्वारे प्रदान केलेल्या सर्व्हिसेसमुळे म्युच्युअल फंड्स आणि इतर सिक्युरिटीजमध्ये गुंतवणूक करण्याची सुविधा उपलब्ध होईल. इन्व्हेस्ट करण्यासाठी, प्लॅटफॉर्मवर रिस्क प्रोफाईल अंतर्गत उपलब्ध असलेल्या प्रश्नावलीत तुम्ही दिलेल्या उत्तरांच्या आधारे प्लॅटफॉर्म काही माहिती, टूल, रिसर्च कंटेंट, शिफारशी उपलब्ध करून देऊ शकतो; तुम्हाला तुमच्या इन्व्हेस्टमेंटचे ध्येय आणि रिस्क क्षमतेवर आधारित इन्व्हेस्टमेंट पर्याय निवडता येतील. प्लॅटफॉर्मवर दिलेली माहिती, टूल, रिसर्च कंटेन्ट आणि शिफारसी कोणत्याही प्रकारचा इन्व्हेस्टमेंट सल्ला, टॅक्स सल्ला किंवा कायदेशीर सल्ला असे मानले जाणार नाही. तुम्ही समजता की, प्लॅटफॉर्मवर दिलेल्या शिफारसी सेल्फ हेल्प टूल आहेत आणि तुम्ही केलेले कोणतेही इन्व्हेस्टमेंट पूर्णपणे तुमच्या विवेकबुद्धीनुसार असेल.
- तुम्ही हे देखील समजता आणि सहमत आहात की एखाद्या फंडचा मागील ट्रेंड भविष्यातील कामगिरीचे कोणत्याही प्रकारे संकेत देत नाही. प्लॅटफॉर्मवर उपलब्ध इन्व्हेस्टमेंट संबंधित माहिती आणि/किंवा शिफारसींवर आपण ठेवलेल्या अवलंबित्वामुळे किंवा प्लॅटफॉर्मद्वारे उपलब्ध सर्व्हिसेसमध्ये तुम्ही केलेल्या इन्व्हेस्टमेंटच्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या कोणत्याही कृती, चुका किंवा कमिशन यासाठी बीएफएल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
- रिस्क प्रोफाईलरची शिफारस आणि/किंवा बीएफएल कडून प्रदान केलेल्या मूल्यांकनावर सेल्फ हेल्प टूल म्हणून कृती करायची की नाही, याचा निर्णय घेण्याचे एकमेव तारतम्य तुमच्याकडे असेल.
- कोणताही इन्व्हेस्टमेंटचा निर्णय घेण्यापूर्वी तुम्ही इन्व्हेस्टमेंट संबंधित डॉक्युमेंट्स जसे की, की इन्फॉर्मेशन मेमोरेंडम (केआयएम), स्कीम इन्फॉर्मेशन डॉक्युमेंट (एसआयडी), जोखीम घटक परंतु त्यापुरते मर्यादित नाही, हे पूर्णपणे आणि काळजीपूर्वक पाहण्याचा सल्ला दिला जातो.

**2.3 ट्रान्झॅक्शन:**

- तुम्ही मान्य करता की ट्रान्झॅक्शन हे पूर्णपणे तुमच्या विवेकबुद्धी/निर्णयानुसार आहेत आणि तुमचे ट्रान्झॅक्शन इन्व्हेस्ट करण्याच्या तुमच्या क्षमतेवर आधारित असतील. त्यामुळे, तुम्ही एकतर लंपसम इन्व्हेस्टमेंट करू शकता किंवा सिस्टीमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) निवडू शकता, जिथे ऑटोमॅटिक मासिक इन्व्हेस्टमेंट कपातीसाठी तुमच्या संमतीनंतर तुमच्या पेमेंट पद्धतीद्वारे मँडेट रजिस्टर केले जाईल.
- प्लॅटफॉर्मवर दिलेल्या अंमलबजावणी सर्व्हिसेस बीएसईस्टारएमएफ मार्फत प्लॅटफॉर्मवर प्रदान केल्या जातात, ज्याद्वारे तुम्ही बीएसई द्वारे उपलब्ध केलेल्या म्युच्युअल फंडमध्ये ट्रान्झॅक्शन करू शकता.
- प्लॅटफॉर्म बीएसई च्या Integrated Capital Services Ltd, (ICSL) क्लिअरिंग कॉर्पोरेशन वरील एनईएफटी/आरटीजीएस, यूपीआय आणि ई-एनएसीएच मँडेटसह आरबीआय मंजूर पेमेंट पद्धतींद्वारे ऑर्डर आणि पेमेंट करणे उपलब्ध आहे, तुम्ही हे मान्य करता की पेमेंट केल्यानंतरच ऑर्डर झाली असे समजले जाईल आणि त्यानंतर युनिट्सचे अलॉटमेंट करून आरटीए (रजिस्ट्रार ट्रान्सफर एजंट्स) द्वारे ट्रान्झॅक्शन पूर्ण केले जाईल. एनएव्हीचे अलॉटमेंट/रिडेम्पशन हे एक्स्चेंजद्वारे प्रकाशित केलेल्या कट-ऑफ नुसारच केले जाईल. अ-

कामकाजीय दिवशी किंवा कामकाजाच्या दिवशी कट-ऑफ वेळेनंतर केलेल्या कोणत्याही ट्रान्झॅक्शन विनंतीवर पुढील कामकाजाच्या दिवशी प्रक्रिया केली जाईल आणि संबंधित एनएव्ही ही त्या म्युच्युअल फंडच्या एसआयडी नुसार लागू होईल. तुम्हाला चुकीचा एनएव्ही लागू झाल्यास किंवा युनिट्स अलॉटमेंट मध्ये उशीर झाल्यास त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही नुकसानीसाठी बीएफएल जबाबदार राहणार नाही.

- रिडेम्प्शन आणि डिव्हिडंड हे ऑन-बोर्डिंगच्या वेळी किंवा नंतर अपडेट केलेल्या माहितीनुसार तुम्ही प्लॅटफॉर्मवर दिलेल्या बँक अकाउंटमध्ये थेट जमा केले जातील.
- तुमच्या ॲक्सेस क्रेडेन्शियल्स सह लॉग-इन केल्यानंतर, तुम्हाला तुमचा पोर्टफोलिओ प्लॅटफॉर्मवर पूर्णपणे पाहता येईल.
- तुम्ही याद्वारे घोषित करता की तुम्हाला प्लॅटफॉर्मवर दिल्या गेलेल्या सर्व सर्व्हिसेस घेण्याचे अधिकार आहेत आणि म्युच्युअल फंड स्कीममध्ये इन्व्हेस्ट करण्यासाठी किंवा तुम्ही घेतलेल्या कोणत्याही प्रॉडक्ट किंवा सर्व्हिसेससाठी वापरलेली रक्कम केवळ कायदेशीर स्रोतांद्वारे प्राप्त आहे, तसेच ती कोणत्याही अधिनियम, नियम, रेग्युलेशन्स किंवा वेळोवेळी जारी केलेल्या कोणत्याही सांविधिक, रेग्युलेटरी किंवा सरकारी प्राधिकरणाच्या आदेशांचे उल्लंघन करण्यासाठी किंवा ते टाळण्यासाठी तयार केलेली नाही.
- तुम्ही मान्य करता की प्लॅटफॉर्मवरील अनेक सर्व्हिसेस इतर थर्ड-पार्टी संस्थांच्या पार्टनरशिपमध्ये दिल्या जातात ज्या त्यांच्या विशिष्ट अटी व शर्तींच्या अधीन असू शकतात. कोणतेही ट्रान्झॅक्शन सुरू करण्यापूर्वी तुम्हाला या अटी व शर्ती पाहणे आवश्यक आहे. प्लॅटफॉर्मद्वारे केलेले सर्व ट्रान्झॅक्शन बीएफएल एआरएन कोड 90319 अंतर्गत टॅग केले जातील.
- तुम्ही स्वीकार करता की, बीएफएल आणि त्यांचे पार्टनर्स, प्लॅटफॉर्मद्वारे तुमच्याद्वारे केलेल्या विनंत्या आणि तुमच्या क्रेडेन्शियल्स द्वारे प्रमाणित केलेल्या विनंत्या चांगल्या विश्वासाने, ट्रान्समिट करतील, अंमलात आणतील. या संदर्भात तुम्हाला झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी, हानीसाठी, बीएफएल आणि त्यांचे पार्टनर जबाबदार राहणार नाहीत.

**3. सर्व्हिसेसचे विभाजन:**

- बीएफएल आपल्या वितरण सर्व्हिसेस मध्ये आणि बजाज समूहातील कोणत्याही संस्थेद्वारे दिल्या जाणाऱ्या इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायजरी सर्व्हिसेसमध्ये (असल्यास) पूर्णपणे स्वतंत्र आणि निष्पक्ष संबंध राखेल.
- सध्या बीएफएल कोणताही टॅक्स, कायदेशीर किंवा इन्व्हेस्टमेंट सल्ला देत नाही. म्हणून, बीएफएलद्वारे उपलब्ध केलेल्या कोणत्याही सर्व्हिसेसचा लाभ घेणाऱ्या सर्व यूजर्सना ॲडव्हायजरी क्लायंट म्हणून वर्गीकृत केले जाणार नाही आणि ते फक्त क्लायंट द्वारेच अंमलात आणले जातील.

**4. सुधारणा:**

- संयुक्त वापरायच्या अटींमध्ये सुधारणा, चुकीची दुरुस्ती, अस्पष्टतेचे स्पष्टीकरण, सर्व्हिसेसच्या स्वरूपातील बदल, संस्थांची पुनर्रचना इत्यादींसह येथील अटींमध्ये बदल करण्याचा बिनशर्त अधिकार बीएफएल राखून ठेवते.

- तुम्ही सहमत आहात आणि समजून घेता की कोणत्याही बदलांसाठी किंवा सुधारणांसाठी वेळोवेळी अटी व शर्ती तपासणे ही तुमची जबाबदारी आहे. तुमच्याकडून सर्व्हिसेसचा सतत वापर करणे म्हणजे स्वीकृत अटींमध्ये केलेल्या बदलांना स्पष्ट संमती म्हणून अर्थ लावला जाईल/मानले जाईल, जे तुमच्यावर कायदेशीररित्या बंधनकारक आणि अंमलात आणण्यायोग्य असेल.
- एकत्रित वापरायच्या अटींबद्दल सविस्तर माहितीसाठी बीएफएल तुम्हाला दिलेल्या लिंकचा वापर करण्याची शिफारस करते : https://www.bajajfinserv.in/terms-of-use

**5. गोपनीयता:**

- तुम्ही हे मान्य करता आणि स्वीकार करता की प्लॅटफॉर्म वापरण्याचा अधिकार तुमचा वैयक्तिक आहे आणि तो कोणत्याही परिस्थितीत इतर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला नियुक्त, ट्रान्सफर, उप-परवानाकृत करता येणार नाही. तुम्ही पुष्टी करता की क्रेडेन्शियल्सची गोपनीयता पूर्णपणे तुमची आहे. तुम्ही हे देखील मान्य करता आणि सहमत आहात की क्रेडेन्शियल्स च्या गोपनीयतेचा कोणताही भंग झाल्यास, बीएफएल जबाबदार राहणार नाही.
- तुमच्याकडून बीएफएलला मिळालेल्या डाटाची गोपनीयता राखण्यासाठी बीएफएल सर्व व्यावसायिकदृष्ट्या वाजवी पावले उचलेल आणि अकाउंट राखेल आणि ऑनबोर्डिंग प्रोसेससाठी प्रदान केलेला सर्व डाटा/माहिती हाताळेल आणि त्यानंतर येथे दिलेल्या सर्व्हिसेस देण्यासाठी, लागू कायद्यांनुसार राखण्यासाठी आवश्यक असलेल्या बीएफएल प्लॅटफॉर्मद्वारे तुम्ही घेऊ शकता अशा इतर कोणत्याही सर्व्हिसेस प्रदान करण्यासाठी अत्यंत काळजीपूर्वक हाताळेल.
- तुम्ही मान्य करता की, जर योग्य सरकारी प्राधिकरणाला किंवा रेग्युलेटरला कोणतीही माहिती आवश्यक असेल तर तुम्ही बीएफएलला ही गोपनीय माहिती उघड करण्यास बिनशर्त अधिकृत करता.

**6. अकाउंट सस्पेन्शन:**

तुम्ही समजता आणि सहमत आहात की खालील परिस्थितीत तुमचे अकाउंट बीएफएलच्या एकमेव विवेकबुद्धीनुसार निलंबित केले जाऊ शकते:

- तुम्ही स्वीकृत अटींमधील कोणत्याही अटी व शर्तींचे किंवा त्यातील कोणत्याही बदलांचे पालन केले नसल्यास.
- जर बीएफएलला असे ठरविण्याचे कारण आढळले किंवा वाटले की कोणतीही कृती किंवा ट्रान्झॅक्शन हे फसवणूक, धोका, किंवा सिस्टीम व सॉफ्टवेअरचा गैरवापर करण्याच्या उद्देशाने केला गेला आहे.
- बीएफएल/ रेग्युलेटर्स यांना असे वाटल्यास की तुमच्याकडून केलेली कोणतीही ऑर्डर आणि/किंवा ट्रान्झॅक्शन हे प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉन्डरिंग ॲक्ट, 2002 (पीएमएलए) च्या विरोधात आहे
- नियामक आदेशांचे पालन करण्यासाठी.

- या स्वीकृत अटींच्या कालावधीत क्लायंटचा मृत्यू, दिवाळखोरी, विघटन किंवा संपुष्टात आल्यास आणि अशा घटनेची लेखी सूचना मिळाल्यावर, त्या अशा क्लायंटच्या संदर्भात या स्वीकृत अटी त्या घटनेच्या तारखेपासून समाप्त मानल्या जातील.
- तुम्ही सहमत आहात की, कोणत्याही कारणामुळे बीएफएल सोबतचे तुमचे संबंध समाप्त झाल्यास, तुम्ही प्लॅटफॉर्मवरील तुमच्या अकाउंटचा ॲक्सेस करू शकणार नाहीत. अशा परिस्थितीत, तुमचे अकाउंट सस्पेंड/टर्मिनेट केले असल्यास, तुम्ही CAMS किंवा Karvy सारख्या आरटीए मार्फत तुम्ही इन्व्हेस्ट केलेल्या म्युच्युअल फंडचे युनिट्स ॲक्सेस करू शकता. तसेच, प्लॅटफॉर्मद्वारे खरेदी केलेल्या विद्यमान म्युच्युअल फंड्सचे युनिट्स तुम्ही संबंधित एएमसी कडून थेट रिडीम, स्विच, विद्ड्रॉ करू शकता किंवा नॉमिनीला ट्रान्समिट करू शकता.

## 7. तक्रार निवारण:

- बीएफएल त्यांच्या कस्टमर्सना बीएफएल सोबत संपर्क साधण्यासाठी अनेक चॅनेल्स उपलब्ध करून देते. तुम्ही तक्रार निवारण प्रक्रिया खालील वेबसाईटवर पाहू शकता :- https://www.bajajfinserv.in/grievance-redressal
- बीएफएल लवकरात लवकर शंकांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करेल, तथापि तुम्ही हे मान्य करता की काही निराकरणे बीएसई स्टार एमएफ आणि आरटीए सारख्या थर्ड-पार्टीवर अवलंबून असू शकतात ज्यांच्याद्वारे सर्व्हिसेसचा लाभ घेतला गेला आहे, अशा परिस्थितीत निराकरणासाठी लागणारा कालावधी संबंधित पार्टीद्वारे प्रतिसादाच्या कालावधीनुसार असेल. अशा म्युच्युअल फंड योजनांमध्ये तुमच्या इन्व्हेस्टमेंटशी संबंधित कोणत्याही समस्या सोडवण्यासाठी आणि आवश्यक असलेले कोणतेही स्पष्टीकरण मागण्यासाठी तुम्ही थेट म्युच्युअल फंड/एएमसी सह संपर्क साधू शकता.

## 8. वॉरंटी, दायित्वाची मर्यादा, क्षतिपूर्ती यांची अस्वीकृती

- तुम्ही याद्वारे स्पष्टपणे स्वीकारता आणि सहमत आहात की, म्युच्युअल फंडमधील सर्व इन्व्हेस्टमेंट ही जोखमींच्या अधीन आहे, ज्यामध्ये मर्यादेशिवाय मार्केट रिस्क, लिक्विडिटी रिस्क, फंड मॅनेजर रिस्क, एकाग्रता रिस्क, महागाई रिस्क इ. चा समावेश आहे आणि कोणत्याही परिस्थितीत या प्लॅटफॉर्मच्या वापरामुळे किंवा प्लॅटफॉर्मद्वारे केलेल्या कोणत्याही इन्व्हेस्टमेंटमुळे तुम्हाला झालेल्या कोणत्याही नुकसानासाठी बीएफएल जबाबदार राहणार नाही.
- म्युच्युअल फंड प्रॉडक्ट्समध्ये बीएफएल कस्टमर्सचा सहभाग हा पूर्णपणे स्वैच्छिक आहे, आणि ही माहिती त्यांच्या सर्व प्रचार साहित्यामध्ये ठळकपणे नमूद केली जाईल. एनबीएफसीद्वारे त्यांच्या कस्टमर्सना दिल्या जाणाऱ्या फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये आणि म्युच्युअल फंड प्रॉडक्ट्सच्या वितरणात कोणताही थेट किंवा अप्रत्यक्ष प्रकारचे 'लिंक'असणार नाही.
- बीएफएल, आपल्या सर्व्हिसेस पार पाडताना, कोणतेही हमीयुक्त रिटर्न किंवा किमान रिटर्न किंवा टार्गेट रिटर्न किंवा अचूक टक्केवारी किंवा टार्गेट रिटर्न प्राप्त होईपर्यंत सर्व्हिस देणारा असा कोणताही इन्व्हेस्टमेंटचा सल्ला देत नाही किंवा इन्व्हेस्टमेंट सल्ला रिस्क फ्री आहे

आणि/किंवा मार्केट जोखीमांसाठी संवेदनशील नाही आणि किंवा तो कोणत्याही लेव्हलच्या हमीसह रिटर्न निर्माण करू शकतो अशी भावना देणारे इतर कोणतेही पत्रक देत नाही.

- तुम्ही याद्वारे सहमत आहात आणि मान्य करता की प्लॅटफॉर्मवर प्रदान केलेला डाटा आणि माहिती कोणत्याही प्रकारचा सल्ला देण्यासाठी नाही. कोणत्याही इन्व्हेस्टमेंट निर्णयांसाठी आणि प्लॅटफॉर्मवरील कोणत्याही म्युच्युअल फंडच्या खरेदीसाठी आणि प्लॅटफॉर्मवर प्रदान केलेल्या माहितीवर अवलंबून राहण्यासाठी तुम्ही पूर्णपणे जबाबदार असाल.
- तुम्हाला माहिती आहे की, युजर त्याला नियुक्त केलेल्या ॲक्सेस क्रेडेन्शियल्ससह लॉग इन करत असल्यास, ज्या आयपी ॲड्रेसद्वारे ट्रान्झॅक्शन्स केली जातात तो आयपी ॲड्रेस बीएफएल रेकॉर्ड करणार नाही किंवा त्याची पडताळणी करणार नाही; आणि ट्रान्झॅक्शन तुमच्याकडून झाले आहेत असे गृहीत धरण्यासाठी बीएफएल जबाबदार राहणार नाही.
- हा प्लॅटफॉर्म एक ऑर्डर कलेक्शन प्लॅटफॉर्म आहे आणि पेमेंट Integrated Capital Services Ltd, (ICSL), बीएसई च्या क्लिअरिंग कॉर्पोरेशन मार्फत सोयीस्कर केला जाईल. तुम्ही स्पष्टपणे सहमती देत आहात की, बीएफएल कोणत्याही नुकसानासाठी जबाबदार नाही किंवा प्रतिनिधित्व करत नाही आणि प्लॅटफॉर्मचा वापर करून निवडलेल्या फंडांसाठी केलेल्या ऑर्डरच्या अंमलबजावणी न होण्याबाबत किंवा चुकीच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही हमी देत नाही. यात कोणत्याही लिंक/सिस्टीम अयशस्वीता, तुमच्या बाजूने पुरेसे/अपुरे फंड, बीएफएल किंवा एक्स्चेंज प्लॅटफॉर्म यांचा समावेश होतो, पण यापुरते मर्यादित नाही.
- बीएफएल हमी देत नाही की तुम्ही प्लॅटफॉर्मद्वारे केलेले सर्व ट्रान्झॅक्शन संबंधित एमएफ पार्टनर्स, आरटीए, बीएसई आणि एएमसी द्वारे स्वीकारले जातील. जर ट्रान्झॅक्शन्स संबंधित म्युच्युअल फंडच्या एसआयडी, केआयएम यांच्याशी सुसंगत नसतील किंवा एमएफ पार्टनर्स, आरटीए बीएसई आणि एएमसीद्वारे ठरवलेल्या इतर कारणास्तव असतील, तर ते नाकारले जाऊ शकतात
- प्लॅटफॉर्मवर मर्यादित संख्येत योजना उपलब्ध असल्याने, बीएफएल कोणत्याही एएमसी किंवा म्युच्युअल फंड स्कीमच्या गुणवत्तेबद्दल, कामगिरीबद्दल किंवा स्वरूपाबद्दल किंवा अशा म्युच्युअल फंड स्कीम/एएमसीच्या संदर्भात इतर कोणतेही प्रतिनिधित्व, वॉरंटी किंवा हमी, स्पष्ट किंवा अंतर्निहित, कोणतेही प्रतिनिधित्व किंवा क्लेम करत नाही. तसेच, प्लॅटफॉर्मद्वारे केलेल्या ट्रान्झॅक्शनसाठी बीएफएलला म्युच्युअल फंड/एएमसी कडून कोणतेही कमिशन मिळत नाही. कोणत्याही म्युच्युअल फंड स्कीममध्ये ट्रान्झॅक्शन करण्याच्या तुमच्या निर्णयांमुळे होणाऱ्या नुकसानासाठी बीएफएलचे कोणतेही दायित्व असणार नाही.
- सल्ल्यानुसार ठेवलेल्या मालमत्तेच्या मूल्यातील चढ उतारामुळे, सिक्युरिटीज/फंड्सची कमी कामगिरी किंवा अपयश, तसेच मार्केटच्या कोणत्याही परिस्थितींमुळे तुम्हाला होणाऱ्या नुकसानीबद्दल बीएफएल कोणतेही दायित्व स्वीकारणार नाही.
- प्लॅटफॉर्मवरील तुमचा अकाउंट अनेक प्रकारच्या फसवणूक, दुरुपयोग, फिशिंग, हॅकिंग आणि इतर कृतींसाठी संवेदनशील असू शकतो, जे बीएफएलकडे पाठवलेल्या आणि बीएफएल कडून प्राप्त सूचनांवर परिणाम करू शकतात. बीएफएल अशा इंटरनेट फसवणूक, फिशिंग, हॅकिंग किंवा इतर कृतींसाठी कोणतीही गॅरंटी प्रदान करत नाही.

- तुम्ही सहमत आहात आणि हे मान्य करता की पुढील बाबींमध्ये तुम्ही बीएफएल, त्याचे सर्व्हिस प्रोव्हायडर्स आणि एमएफ पार्टनर्स यांना जबाबदार धरणार नाही:

1. तुमच्याकडून केलेल्या ट्रान्झॅक्शनचे प्रोसेसिंग कोणत्याही सिस्टीमच्या बिघाडामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे विलंबित होणे किंवा अयशस्वी होणे.
2. कोणत्याही कारणास्तव उद्भवलेल्या किंवा झालेल्या व्यवहारातील कोणत्याही त्रुटी, दोष, बिघाड किंवा व्यत्यय यामुळे तुम्हाला झालेल्या कोणत्याही नुकसानीसाठी किंवा हानीसाठी.
3. तुमच्याकडून झालेल्या कोणत्याही फसवणूक, निष्काळजीपणा/चूक किंवा गैरवर्तनासाठी, ज्यामध्ये केआरए/केवायसी नियमांचे पालन न करणे किंवा वैध पॅन किंवा पीएमएलए आवश्यकतांचे पालन न करणे यांचा समावेश आहे.
4. तुम्हाला या सुविधेचे विद्ड्रॉल, टर्मिनेशन किंवा सस्पेन्शन कोणत्याही कारणास्तव झाल्यामुळे झालेले किंवा तुम्ही भोगलेले कुठलेही नुकसान किंवा हानी.

- येथे दिलेल्या कोणत्याही विपरीत बाबींचा विचार न करता, प्लॅटफॉर्मवरील सर्व्हिस, इंटरफेस आणि एपीआय तसेच त्यांची संबंधित माहिती, डाटा, किंमत आणि उपलब्धता या सर्वांवर मानवी, मॅकेनिकल किंवा टायपोग्राफिकल चुका, दुर्लक्ष, त्रुटी, मर्यादा, विलंब, सर्व्हिस व्यत्यय आणि इंटरनेट किंवा इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशनच्या वापराशी निगडित इतर अंतर्गत किंवा संभाव्य समस्या परिणाम करू शकतात. यामध्ये, मर्यादा न ठेवता, अनपेक्षित घटना, सरकारी/रेग्युलेटरी कारवाई, ऑर्डर, परिपत्रके, अधिसूचना इ.आणि/किंवा थर्ड पार्टीच्या कृती इ. चा समावेश आहे ज्यामुळे सर्व्हिस, इंटरफेस किंवा एपीआय कार्य,त्यातील माहिती व डाटा किंवा संबंधित कम्युनिकेशन वर परिणाम होतो किंवा प्रभावित होतो. बीएफएल असे ट्रान्समिशन सुरक्षित, त्रुटी विरहीत आणि सायबर धमक्या किंवा हल्ल्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना करत आहे. तरीदेखील अशा कोणत्याही विलंब, अयशस्वी व्यवहार किंवा इतर नुकसानासाठी, जे पूर्णपणे किंवा अंशतः अशा समस्या किंवा एररमुळे उद्भवते, त्यासाठी बीएफएल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
- बीएफएल आणि त्यांचे सर्व्हिस प्रोव्हायडर्स, एमएफ पार्टनर्स आणि आरटीए यांना नुकसानभरपाई देण्यास आणि एमएफ प्लॅटफॉर्मच्या सर्व्हिसेस वापरल्यामुळे आणि/किंवा वापरायच्या अटींनुसार किंवा म्युच्युअल फंडमध्ये ऑनलाईन व्यवहार करण्याशी संबंधित कोणत्याही सूचनांनुसार किंवा बीएफएलद्वारे प्रदान केलेल्या इतर कोणत्याही सर्व्हिसेसशी संबंधित कोणत्याही कारणामुळे, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, कोणत्याही वकिलांच्या शुल्कासह, सर्व आर्थिक आणि इतर नुकसान, हानी, खर्च, तोटा, दायित्वे, नुकसानभरपाई, शुल्क, कायदेशीर कारवाई, प्रक्रिया, खर्च किंवा इतर परिणामा यांपासून नेहमीच सुरक्षित ठेवण्यास तुम्ही सहमत आहात.

## 9. बौद्धिक संपदा

प्लॅटफॉर्मवरील आणि सर्व्हिसेस वरील सर्व हक्क लागू असल्याप्रमाणे बीएफएलकडे किंवा त्याच्या भागीदारांकडे राखीव आहेत. येथे किंवा प्लॅटफॉर्मवर ज्या प्रमाणात स्पष्टपणे परवानगी दिली आहे त्याव्यतिरिक्त, बीएफएलची पूर्वलिखित परवानगी मिळाल्याशिवाय प्लॅटफॉर्मवरील कोणतेही साहित्य कोणत्याही स्वरूपात किंवा कोणत्याही माध्यमातून, इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग किंवा इतर कोणत्याही प्रकारे, कॉपी, पुनरुत्पादित, वितरित, पुन्हा प्रकाशित, डाउनलोड, प्रदर्शित,

पोस्ट, ट्रान्सफर किंवा ट्रान्समिट केले जाऊ शकत नाही, परंतु त्यापुरते मर्यादित नाही. याशिवाय, प्लॅटफॉर्मवर दिलेल्या सामग्रीवर आधारित कोणतेही ट्रान्सफर, रिव्हर्स इंजिनीअर, डी-कम्पाईल, डिसअसेंबल, बदल किंवा डेरिव्हेटिव्ह कामे तयार करणे यांना देखील तुम्हाला परवानगी नाही.

जगातील कोणत्याही देशात उद्भवणाऱ्या किंवा अस्तित्वात असलेल्या प्लॅटफॉर्मशी संबंधित लोगो, कॉपीराईट, ट्रेडमार्क, सर्व्हिस मार्क्स, रजिस्टर्ड डिझाईन्स, डाटाबेस अधिकार, पेटंट्स आणि अशा प्रकारचे सर्व तत्सम हक्क, तसेच त्यातील माहिती हे बीएफएल, त्यांचे परवानाधारक किंवा संबंधित थर्ड-पार्टी सर्व्हिस प्रोव्हायडर यांच्या मालकीचे आहेत. या स्वीकृत अटींमधील कोणतीही बाब बीएफएल किंवा त्यांचे पार्टनर्स/संबंधित सहयोगी यांची लेखी परवानगी नसताना बीएफएलच्या वेबसाईट/मोबाईल ॲप्लिकेशनवरील कोणत्याही ट्रेडमार्कचा वापर करण्याचा परवाना किंवा अधिकार प्रदान करते असे समजले जाणार नाही.

तुम्ही प्लॅटफॉर्मवरील उपलब्ध कोणतीही माहिती बेकायदेशीर हेतूसाठी वापरणार नाही, आणि माहितीतील संबंधित अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी जर असल्यास जारी केलेल्या सर्व सूचना आणि निर्देशांचे तुम्ही पालन कराल यास तुम्ही सहमती देत आहात.

**10. अनपेक्षित घटना:**

बीएफएल सर्व्हिस मधील व्यत्यय कमी करण्याचा प्रयत्न करेल तरीही, त्यांच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे ज्यात नैसर्गिक आपत्ती, महामारी, युद्ध, आग, नागरी अडथळे, राष्ट्रीय आपत्कालीन परिस्थिती, इंटरनेटसह कोणत्याही कम्युनिकेशन सिस्टीमची अनुपलब्धता, उल्लंघन किंवा व्हायरस, तोडफोड, सरकारी कायदे, कॉम्प्युटर हॅकिंग, कॉम्प्युटर डाटा आणि स्टोरेज डिव्हाईसेसचा अनधिकृत ॲक्सेस, कॉम्प्युटर क्रॅश, सिक्युरिटी आणि एन्क्रिप्शन कोडचे उल्लंघन यांचा समावेश असलेल्या, परंतु त्यापुरते मर्यादित नसलेल्या कारणांमुळे, त्यांच्या कामगिरीला विलंब झाल्यास, प्रतिबंध झाल्यास, निर्बंधित झाल्यास किंवा त्यात व्यत्यय आल्यास बीएफएल आणि त्यांचे पार्टनर्स या स्वीकारलेल्या अटींच्या अन्वये, जबाबदार असणार नाहीत आणि त्यांच्या कामगिरीसाठी उत्तरदायी असणार नाहीत.

**11. शासित कायदा आणि अधिकारक्षेत्र**

या स्वीकृत अटी भारताच्या कायद्यांनुसार नियंत्रित केल्या जातील आणि पुण्यातील न्यायालयांकडे या स्वीकृत अटींशी संबंधित सर्व बाबींवर निर्णय घेण्याचा विशेष अधिकारक्षेत्र असेल.

## जोडपत्र ट: बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेस अटी

1. अचूक आणि अपडेटेड माहितीचे संकलन, पडताळणी, ऑडिट आणि मेंटेनन्स हा एक सतत चालणारी प्रोसेस आहे आणि बीएफएलकडे कोणत्याही वेळी लागू कायदे/नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचा अधिकार राखून आहे. रजिस्ट्रेशनच्या वेळी किंवा इतर कोणत्याही वेळी तुम्ही दिलेल्या माहितीत आणि/किंवा डॉक्युमेंटेशनमध्ये तफावत आढळल्यास, कोणत्याही/सर्व बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेसचा वापर बंद करण्याचा/ॲप्लिकेशन्स नाकारण्याचा अधिकार बीएफएल राखून ठेवते.

2. बीएफएलच्या सर्व्हिसेसचा लाभ घेण्याच्या उद्देशाने बीएफएलला प्रदान केलेली कोणतीही माहिती बीएफएल कडेच राहील आणि लागू कायदे किंवा रेग्युलेशन नुसार, तसेच या अटींच्या अनुषंगाने, बीएफएलच्या विवेकबुद्धीनुसार वापरली जाऊ शकते.
3. बीएफएलला लागू कायद्यांनुसार आवश्यक असलेले अतिरिक्त डॉक्युमेंट्स/माहिती मागण्याचा अधिकार आहे.
4. तुम्ही, बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेसचा ॲक्सेस/लॉग-इन, ब्राउजिंग किंवा अन्यथा वापर करून याद्वारे प्रतिनिधित्व करता आणि हमी देता की, तुम्ही:
   (i) भारताचे नागरिक आहात
   (ii) 18 वयाचे असून सज्ञानपणाचे वय गाठले आहे;
   (iii) एकतर तुमच्या वैयक्तिक क्षमतेमध्ये किंवा संस्थेचे अधिकृत स्वाक्षरीकर्ता असण्याच्या क्षमतेच्या अंतर्गत योग्यरित्या अधिकृत आहात;
   (iv) कायदेशीररित्या बंधनकारक करार करण्यास सक्षम आहात; आणि
   (v) बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेस ॲक्सेस करण्यापासून किंवा वापरण्यापासून प्रतिबंधित किंवा अन्यथा कायदेशीररित्या प्रतिबंधित केलेले नाही.
   (vi) बजाज फिनसर्व्ह अकाउंटचे एकमेव मालक आहात आणि कोणत्याही वेळेस एका पेक्षा जास्त बजाज फिनसर्व्ह अकाउंट ठेवू शकत नाही आणि जर तुम्ही कोणत्याही व्यक्तीस आपले बजाज फिनसर्व्ह अकाउंट वापरण्यास परवानगी दिल्यास, अशा प्रकारचा वापर बीएफएलकडून कोणत्याही स्वरूपात योग्य किंवा परवानगीयोग्य मानला जात नाही, आणि अशा वापरामुळे उद्भवणाऱ्या सर्व परिणामांसाठी तसेच बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेसमधून किंवा त्याद्वारे घेतल्या जाणाऱ्या सर्व कृतींसाठी तुम्हीच पूर्णपणे जबाबदार राहाल.
5. तुम्ही याद्वारे सहमत आहात की बीएफएलला सबमिट केलेल्या एकतर रजिस्टर्ड मोबाईल फोन नंबरद्वारे किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक/वेब प्लॅटफॉर्मद्वारे आणि/किंवा तुमच्या ईमेल आयडीद्वारे, बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेसमध्ये साईन इन करण्यासाठी पासवर्ड आणि/किंवा बीएफएल पासकोडसह, वन-टाइम इलेक्ट्रॉनिक स्वीकृती/पुष्टीकरण/प्रमाणीत याद्वारे तुमची पडताळणी करण्यासाठी बीएफएलने इंडस्ट्री स्टँडर्ड सिक्युरिटी प्रक्रिया स्वीकारल्या आहेत. तुम्ही याद्वारे बीएफएलद्वारे अनुसरण केलेल्या वर नमूद सिक्युरिटी प्रक्रियेची तुमची पूर्ण समजूत आणि स्वीकृती व्यक्त करता आणि पुढे सहमत आहात आणि समजता की कोणतेही अनधिकृत प्रकटीकरण, ॲक्सेस, उल्लंघन आणि/किंवा त्याचा वापर तुमच्या अकाउंटची सिक्युरिटी रिस्क मध्ये आणू शकते.
6. बीएफएलकडे असलेली प्रलंबित करार दायित्वे, जर असतील तर, पूर्ण केल्यानंतर आणि अशा विद्ड्रॉलसाठी लागू असलेल्या प्रचलित कायद्यानुसार/रेग्युलेशन नुसार, तुमची संमती मागे घेण्याचा पर्याय तुमच्याकडे असेल. करार दायित्वे पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेसचा वापर न करण्याचे स्वातंत्र्य आहे. तथापि, तुम्ही बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेसचा सतत वापर करणे/सुविधा घेणे या वापरायच्या अटी आणि येथे नमूद केलेल्या संबंधित पॉलिसी, तसेच त्यामध्ये केलेल्या कोणत्याही सुधारणा, स्वीकारल्याचे समजले जाईल.

7. तुम्ही बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेसचा पुढील गोष्टी करण्यासाठी वापर करणार **नाही**: (i) कोणतेही फसवणूकीचे ट्रान्झॅक्शन करण्यासाठी, आणि (ii) कोणत्याही अशा उद्देशांसाठी जे लागू असलेल्या कायद्यांनुसार किंवा या वापरायच्या अटींनुसार बेकायदेशीर, अनधिकृत किंवा प्रतिबंधित आहेत. बीएफएल आपल्या विवेकबुद्धीनुसार, केव्हाही आणि कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा कोणत्याही दायित्वाशिवाय, अतिरिक्त अटी व निर्बंध लादू शकते किंवा तुमच्या बजाज मॉल लिस्टिंग सर्व्हिसेस (किंवा त्यातील कोणताही भाग) वरील ॲक्सेस निलंबित, समाप्त किंवा प्रतिबंधित करू शकते.
8. तुम्ही येथे कोणतेही ट्रान्झॅक्शन पूर्ण करू शकणार नाही आणि हे माहिती असावे की बजाज मॉल हा ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म नाही आणि फक्त मर्चंट/डीलर्सद्वारे दिलेल्या प्रॉडक्ट्स आणि सर्व्हिसेस विषयी माहिती प्रदान करेल.
9. वरीलप्रमाणे नमूद केलेल्या व्यतिरिक्त, तुम्ही ______________ येथे दिलेल्या तुमच्यावर बंधनकारक असलेल्या वापरायच्या अटींशी सहमत आहात.

## अस्वीकृती

बजाज मॉल हा बीएफएलचा एक इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्म आहे जो मर्चंट/मॅन्युफॅक्चरर/डीलर्स यांच्याद्वारे त्यांच्या संबंधित प्रॉडक्ट्स संबंधी दिल्या जाणाऱ्या ऑफर्सची माहिती देण्यासाठी वापरला जातो. बीएफएल मर्चंट/मॅन्युफॅक्चरर/डीलर्स यांच्याकडून दिलेल्या ऑफर्सबाबत कोणतीही गॅरंटी देत नाही किंवा कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही. याशिवाय, बीएफएल स्वतःच्या बजाज मॉलद्वारे कोणत्याही प्रॉडक्ट्सची/सर्व्हिसेसची विक्री करत नाही/प्रदान करत नाही. बजाज मॉलवर दिलेल्या लिंकद्वारे ॲक्सेस केलेल्या या मर्चंट/मॅन्युफॅक्चरर/डीलर्स यांच्या बाह्य वेबसाईटवरील प्रॉडक्ट्सचे कंटेंट किंवा सामग्री प्रदर्शित करण्यासाठी बीएफएल जबाबदार नाही. बीएफएल अशा बाह्य वेबसाइटच्या वैधतेविषयी कोणतीही स्पष्ट किंवा अप्रत्यक्ष वॉरंटी, देत नाही. म्हणून, कस्टमरनी बजाज मॉलवर खरेदीसाठी निवडलेल्या प्रॉडक्टची/सर्व्हिसेसची विक्री/गुणवत्ता/वैशिष्ट्ये/पूर्तता यासाठी बीएफएल जबाबदार नाही. कोणतीही ऑनलाईन एंड-टू-एंड खरेदी ट्रान्झॅक्शनची परवानगी नाही आणि कस्टमरनी खरेदीची औपचारिकता पूर्ण करण्यासाठी मर्चंट/मॅन्युफॅक्चरर/डीलर्स यांच्या आउटलेट्स/शोरूम मध्ये संपर्क साधावा.

मर्चंट्स /मॅन्युफॅक्चरर्स/डीलर्स द्वारे ऑफर केलेल्या/फंड केलेल्या (आंशिक/पूर्णपणे) कोणत्याही कॅशबॅकच्या प्रोसेसिंगसाठी बीएफएल जबाबदार नाही. मर्चंट्स /मॅन्युफॅक्चरर्स/डीलर्स कॅशबॅक/सवलत बाबत कोणताही वाद असल्यास तो थेट संबंधित मर्चंट्स /मॅन्युफॅक्चरर्स/डीलर्स यांच्याकडे थेट उपस्थित करावा लागेल आणि बीएफएलची या संदर्भात कोणतीही भूमिका नाही. बीएफएलला अशा विवादासाठी जबाबदार धरता येणार नाही किंवा पार्टी म्हणून समाविष्ट केले जाऊ शकत नाही.

बीएफएलचे मर्चंट्स/मॅन्युफॅक्चरर्स/डीलर्सच्या वेबसाईट/ॲप्लिकेशन्सवर कस्टमरने शेअर केलेल्या कोणत्याही डाटावर नियंत्रण असत नाही. मर्चंट्स/मॅन्युफॅक्चरर्स/डीलर्स, त्यांचे एजंट्स इ. कडून अशा कस्टमर डाटाचा वापर झाल्यास बीएफएल किंवा त्यांच्या संलग्न कंपन्या जबाबदार नाहीत.

या लिंकवर क्लिक केल्यास, तुम्हाला मर्चंट/मॅन्युफॅक्चरर/डीलर्स यांच्या थर्ड-पार्टी कंटेंट/वेबसाईटवर रीडायरेक्ट केले जाईल, जिथे विविध कारणांसाठी त्यांच्या वेबसाईट/यूआरएल वर कुकीज असू

शकतात. त्यासाठी बीएफएल जबाबदार नाही. पुढे तुमची ॲक्टिव्हिटी ट्रॅक केली जाऊ शकते. अधिक माहितीसाठी, कृपया संबंधित वेबसाइटवरील कुकीज पॉलिसी / प्रायव्हसी पॉलिसी पाहावी.

मी सहमत आहे या बटणावर क्लिक करताच, तुम्ही या अस्वीकृती मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींना सहमती देता आणि तुम्हाला मर्चंट कंटेंट/वेबसाईटवर पुनर्निर्देशित केले जाईल.

**अस्वीकृती: "वेबसाईट (https://www.bajajfinserv.in/terms-of-use), वर अपडेट केलेल्या इंग्रजी भाषेतील वापरायच्या अटी आणि स्थानिक भाषेतील भाषांतरित व्हर्जनमध्ये कोणताही विरोधाभास असल्यास, इंग्रजी व्हर्जन ग्राह्य धरले जाईल."**

**शेड्यूल I**

**(फी आणि शुल्क)**

| **बजाज फिनसर्व्ह सर्व्हिसेस – फी आणि शुल्क** | |
|---|---|
| **सर्व्हिस** | **शुल्क (रु.)** |
| नवीन कस्टमर्ससाठी अकाउंट उघडणे किंवा अपग्रेड करणे (संपूर्ण केवायसी वॉलेट) | रु. 50/- पर्यंत (लागू टॅक्ससहित) |
| **पैसे भरणे** | **शुल्क (रु.)** |
| क्रेडिट कार्डद्वारे | प्रति ट्रान्झॅक्शन 5% पर्यंत (लागू टॅक्ससहित) |
| डेबिट कार्डद्वारे | प्रति ट्रान्झॅक्शन 5% पर्यंत (लागू टॅक्ससहित) |
| यूपीआयद्वारे | रु. 0/- |
| यूपीआयद्वारे (रुपे क्रेडिट कार्डद्वारे) | प्रति ट्रान्झॅक्शन 5% पर्यंत (लागू टॅक्ससहित) |
| नेट बँकिंगद्वारे | प्रति ट्रान्झॅक्शन 5% पर्यंत (लागू टॅक्ससहित) |

| | |
|---|---|
| * हे नियामक मार्गदर्शक तत्त्वांनुसार मंजूर शुल्कांच्या अधीन असून वेळोवेळी त्यात बदल होऊ शकतो | |
| **पेमेंट** | **शुल्क (रु.)** |
| मर्चंटकडे पेमेंट | रु. 0/- |
| युटिलिटी बिल/रिचार्ज/डीटीएच साठी पेमेंट | प्रति ट्रान्झॅक्शन 5% पर्यंत (लागू टॅक्ससहित) |
| * हे नियामक मार्गदर्शक तत्त्वांनुसार मंजूर शुल्कांच्या अधीन असून वेळोवेळी त्यात बदल होऊ शकतो | |
| **ट्रान्सफर** | **शुल्क (रु.)** |
| बजाज पे वॉलेट ते वॉलेट | रु. 0/- |
| बजाज पे वॉलेट (फक्त संपूर्ण केवायसी) ते बँक | प्रति ट्रान्झॅक्शन 5% पर्यंत (लागू टॅक्ससहित) |
| *अयशस्वी ट्रान्झॅक्शनसाठी, शुल्क आणि टॅक्ससह एकूण रक्कम रिव्हर्स केली जाते. | |
| *राज्यांच्या विशिष्ट कायद्यांनुसार अतिरिक्त सेस लागू होईल. | |
| *नवीन कस्टमर्स म्हणजे असे कस्टमर्स ज्यांचे बजाज फायनान्स लिमिटेडसह कोणतेही विद्यमान संबंध नाहीत आणि यात लहान पीपीआय होल्डर यांचाही समावेश होतो. | |

| **बजाज पे फास्टॅग - फी आणि शुल्क आणि कस्टमर सुविधा शुल्क** | |
|---|---|
| **फी चे प्रकार** | **शुल्क (रु.) (लागू टॅक्ससहित)** |

| | |
|---|---|
| जारी करण्याचे शुल्क (व्हीसी04) | रु. 100 |
| जारी करण्याचे शुल्क (अन्य वाहने) | अधिकतम रु. 500 |
| पुन्हा जारी करण्याचे शुल्क (व्हीसी04) | रु. 100 |
| पुन्हा जारी करण्याचे शुल्क (अन्य वाहने) | अधिकतम रु. 500 |

**उदा: फंड भरा**

जर तुम्ही तुमच्या वॉलेटमध्ये रु. 1,000 भरत असाल तर त्या वेळी आकारल्या जाणाऱ्या शुल्काच्या संदर्भात खालील रक्कम देय असेल:

| **सी. नं** | **पद्धत** | **जीएसटीसह शुल्क** | **देय रक्कम*** |
|---|---|---|---|
| 1. | क्रेडिट कार्ड | 2% | 1,020 |
| 2. | डेबिट कार्ड | 1% | 1,010 |
| 3. | यूपीआय | 0% | 1,000 |
| 4. | नेट बँकिंग | 1.5% | 1,015 |

*हे निवडलेल्या पेमेंट इन्स्ट्रुमेंटवर आधारित आणि वेळोवेळी पुनरावृत्तीच्या अधीन असलेल्या मर्चंट आणि ॲग्रीगेटर सह शुल्क आधार करार आहेत आणि ट्रान्झॅक्शन सुरू करण्यापूर्वी ते पडताळण्याची जबाबदारी कस्टमरची आहे.

**बिल पेमेंट सर्व्हिसेस**

जर तुम्ही ॲपवर बिलरसाठी 1,000 भरत असाल तर त्या वेळी आकारल्या जाणाऱ्या शुल्काच्या संदर्भात खालील रक्कम देय असेल:

| सी. नं | पद्धत | जीएसटीसह शुल्क | देय रक्कम* |
|---|---|---|---|
| 1. | क्रेडिट कार्ड | 2% | 1,020 |
| 2. | डेबिट कार्ड | 0% | 1,000 |
| 3. | यूपीआय | 0% | 1,000 |
| 4. | नेट बँकिंग | 0% | 1,000 |
| 5. | बजाज पे वॉलेट | 0% | 1,000 |
| 6. | पेमेंट पद्धत म्हणून क्रेडिट कार्ड वापरून भाड्याचे पेमेंट | 2% | 1,020 |
| 7. | प्रीपेड मोबाईल रिचार्ज | रु. 5/- | 1,005 |

*हे निवडलेल्या पेमेंट इन्स्ट्रुमेंटवर आधारित आणि वेळोवेळी पुनरावृत्तीच्या अधीन असलेल्या मर्चंट आणि ॲग्रीगेटर सह शुल्क आधार करार आहेत आणि ट्रान्झॅक्शन सुरू करण्यापूर्वी ते पडताळण्याची जबाबदारी कस्टमरची आहे.

**बजाज पे वॉलेट**

जर तुम्ही तुमच्या वॉलेटमधून रु. 1,000 ट्रान्सफर करीत असाल तर त्या वेळी आकारल्या जाणाऱ्या शुल्काच्या संदर्भात खालील रक्कम देय असेल:

| सी. नं | पद्धत | जीएसटीसह शुल्क | देय रक्कम* |
|---|---|---|---|
| 1. | बजाज पे वॉलेट ते वॉलेट | 0% | 1,000 |
| 2. | बजाज पे वॉलेट ते बँक अकाउंट | 5% पर्यंत | 1,050 |

*हे निवडलेल्या पेमेंट इन्स्ट्रुमेंटवर आधारित आणि वेळोवेळी पुनरावृत्तीच्या अधीन असलेल्या मर्चंट आणि ॲग्रीगेटर सह शुल्क आधार करार आहेत आणि ट्रान्झॅक्शन सुरू करण्यापूर्वी ते पडताळण्याची जबाबदारी कस्टमरची आहे. वॉलेटमधून बँक अकाउंटमध्ये ट्रान्सफर केवळ फूल केवायसी कस्टमर्सच्या बाबतीतच होऊ शकते. अयशस्वी ट्रान्झॅक्शनसाठी, शुल्कासह एकूण रक्कम रिव्हर्स केली जाते परंतु टॅक्स नाही.